पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ । अंक १ ला । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ सप्टेंबर

# द पीपल्स पोस्ट : रुजवणुकीची चार वर्षे



पाक्षिक **द पीपल्स पोस्ट** समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक १ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ सप्टेंबर २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.
**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822
● **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ६००/- रुपये फक्त**

● **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय : द पीपल्स पोस्ट** : रुजवणुकीची चार वर्षे - ३ / रुजवणुकीची चार वर्षे - **मान्यवरांचे मनोगत** - ५/ रोहित वेमुला ते इंद्र मेघवाल : विश्वगुरु बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारताची दरिद्रगाथा - **सुरेश गायकवाड** - १३ / **हवा दिल्लीची :** ''लोकासांगे ब्रह्मज्ञान'' - **विजय नाईक** - १६ / 'अशी जिंकली ओबीसी राजकीय आरक्षणाची लढाई' - **प्रा. हरी नरके** - १९ / २०२५ : चिंतेचे साल - **ज. वि. पवार** - २२ / हर घर तिरंगा, हर घर संविधान - **सुभाष वारे** - २४ / **रेषा आणि फटकारे :** समान शत्रूविरोधात तरी समान मित्र बना! - **संजय पवार** - २६ / भारतीय संविधानाचा वैज्ञानिक दृष्टिकोन - **अरूण वाघ** -२९ / **दिल्ली दरबार :** मोदी-शहांना गडकरी नकोसे का? - **विचक्षण बोधे** - ३१ / मराठवाड्याचे मागासलेपण कधी पुसले जाणार? - **डॉ. सोमीनाथ घोळवे** - ३४ / **ग्रंथ परिचय** - आंबेडकरवादी जाणिवांचा ऊर्जास्रोत : गनीम - **प्रा. डॉ. शंकर विभुते** - ३८ / **आज-कालचे प्रश्न** - **पंक्चरवाला** - ४०/ **कविता** - अभिनंदन ! तुम्ही केस जिंकली... - **अमोल विनायकराव देशमुख**, / बेटा... - **बुद्धभूषण साळवे**, / ...पण उरायचे आहेच पुरून - **श्रीपाद भालचंद्र जोशी** - ४३.

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

# द पीपल्स पोस्ट : रुजवणुकीची चार वर्षे

समाज विचारांनी कधीच रिता नसतो. समाजात कधीच कायम दुष्काळ पडत नसतो. कधीच कायमची पानगळ नसते. ऋतू येतात-जातात, बदल घडतात, मावळतात पुन्हा उगवतात... बुद्धाच्या अनित्य तत्त्वज्ञानात किंवा सिद्धांतात हे सारे बसत असते... याच सिद्धांताचा हात घेऊन पुढे जात असते... समाजातील काही विचारी, परिवर्तनवादी, पुरोगामी आणि व्यवस्था बदलू शकते, तिला प्रश्न विचारला जाऊ शकतो यावर विश्वास असणाऱ्या लेखक, विचारवंत, समीक्षक, कवी यांच्या सहकार्याने किंवा त्यांच्या हातात हात घालून 'द पीपल्स पोस्ट' या मराठीतील पाक्षिकाचा प्रारंभ केला. हे पाक्षिक कोणत्याही गटातटाचे न करता परिवर्तनाची स्वप्ने बाळगणाऱ्या माणसाचे केले. समाज आणि राष्ट्राच्या नवनिर्मितीचे ते एक सोपान बनवले. फुले, शाहू आणि अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भरभक्कम पाया या पाक्षिकासाठी तयार केला. गांधी-आंबेडकर, मार्क्स-गांधी-आंबेडकर आदी महापुरुषांच्या झुंजी न लावता नव्या काळासाठी त्यांच्या समन्वय, समझोता आणि मैत्रीच्या जागा कोठे आहेत, याचा डोळ्यावरील चष्मा बदलून विचार केला. शत्रू कोण आणि मित्र कोण, कुणाला कुणाविरुद्ध वैचारिक लढाई लढायची आहे, हेही जाणतेपणाने ठरवले. राष्ट्र आणि समाजाच्या नवरचनेसाठी परिवर्तनाचे गाणे गाणाऱ्या आणि त्यासाठी बांधीलकी ठेवणाऱ्या, बाळगणाऱ्या सर्वांशी एक स्निग्ध नाते जोडण्याचा प्रयत्न केला. या आमच्या प्रयत्नांना साथ देण्याचा प्रयत्न डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. सुखदेव थोरात, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. गोपाळ गुरू, विलास वाघ, प्रा. जयदेव डोळे, दत्ता देसाई, मुक्ता मनोहर, भालचंद्र कांगो, समाजवादी प्रबोधिनीचे कुलकर्णी, धरणग्रस्तांचे नेते डॉ. भारत पाटणकर, माया पंडित, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, अशा अनेक ज्येष्ठांनी मनमोकळेपणे आणि सढळ हाताने केला. याचा आम्हाला आनंद वाटतो. त्यांचे ऋण घेऊन प्रवास करण्यात आनंद वाटतो.

'द पीपल्स पोस्ट'चा जन्म झाला तेव्हा माध्यमांसाठी चालायला, बागडायला पूरक आणि आरोग्यदायी वातावरण नव्हते. नवी भांडवलशाही, विशिष्ट विचारसरणी आपल्या विळख्यात माध्यमांना घेत होती. काही माध्यमे पर्याय नाही म्हणून, काही स्वेच्छेने या विळख्यात गुंतत जात होती किंवा गुंतवली जात होती. माध्यमांचे काही खरे नाही, त्यांच्या भूमिकांचे काही खरे नाही, अशा वातावरणात 'द पीपल्स पोस्ट'ने पाऊल टाकले ते चार वर्षांपूर्वी राजधानी मुंबईत... 'द पीपल्स पोस्ट'चा प्रकाशन सोहळा रावसाहेब कसबे, सुखदेव थोरात, ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हस्ते झाला. माध्यमांचा आणि विशेषतः पाक्षिक-मासिकांचा ऋतू क्षीण होत असल्याच्या काळात जनतेचा आवाज बनण्याचा प्रयत्न करण्यासाठीच जन्माला आलेले पाक्षिक कसे काय तग धरून राहणार याविषयी अनेकांना शंका होती. काहींनी भुवयाही उंचावल्या होत्या. त्यांच्या-त्यांच्या पातळीवर ते स्वाभाविकही होते;



पण या सर्व शंकांचा पडदा दूर सारीत 'द पीपल्स पोस्ट' अल्पावधीतच वाचकांच्या मनात रुजला. नव्या मासिकांना प्रारंभीच्या काळात वाचक मिळणे कठीण असते; पण 'द पीपल्स पोस्ट'ला ही चणचण कधी जाणवली नाही. पहिल्या अंकापासूनच त्याला वाचकांचा एक प्रचंड मोठा गोतावळा लाभला. या गोतावळ्याचा विश्वास संपादने, त्याला टिकवून ठेवणे, त्याच्या अंतरंगात सतत संचार करणे या सर्व अवघड वाटाव्यात अशा गोष्टी होत्या; पण त्या आम्ही पार पाडल्या. नव्या पिढीसाठी जगभर हा अंक ऑनलाइन उपलब्ध करून देण्यास प्रारंभ केला. या ऑनलाइन अंकाला आणखी प्रतिसाद लाभला. व्यवस्थाबदलाच्या प्रक्रियेत, विचार प्रक्रियेत शक्य तेथे ठाम भूमिका घेणे, नवा समाज आणि नवे राष्ट्र घडवण्याच्या प्रक्रियेत अतिशय शक्तिशाली आणि वैचारिक रसद पुरवणे आदी गोष्टींमध्ये कधी खंड पडू दिला नाही. मजकूर आणि अंकाची निर्मिती यांचा दर्जा वाढवत नेला. तेथे कधीही तडजोड केली नाही. कधी कागद निकृष्ट वापरला नाही, की छपाई निकृष्ट केली नाही. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरही शोभावा असाच अंक सातत्याने देण्याचा प्रयत्न वाचक आणि लेखकांच्या पाठबळावर केला. त्यातही वाचकांनी आम्हाला यशाकडे नेले. जगभरातील वैचारिक घडामोडी, जगाचे बदलते स्वरूप, भांडवलशाही आणि मूलतत्त्वांच्या टाचांखाली विचारांचा होणारा संकोच, लढणाऱ्यांना प्रोत्साहन, नव्या पिढीसाठी नवे दीपस्तंभ आदी प्रयत्न करत 'द पीपल्स पोस्ट'ने चार वर्षे पूर्ण केली आणि पाचव्या वर्षात पाऊल टाकले आहे. सध्याचा भोवताल पाहता हा सर्व प्रवास अगदी सहज झाला असावा, असे कोणी समजण्याचे कारण नाही. चक्रव्यूह तयारच केले जातात म्हणून काही कोणी योद्धा लढाई बंद करत नाही. चक्रव्यूह भेदण्याचे आणि बाहेर पडण्याचे मार्गही तो शोधतोच. विश्वासार्हता हे सर्वांत मोठे भांडवल 'द पीपल्स पोस्ट'च्या मुठीत आहे आणि ते वाचक आणि आमच्या हितचिंतकांनी दिले आहे. 'द पीपल्स पोस्ट'चा प्रत्येक अंक संग्रही ठेवावा किंवा ठेवला जावा यासाठी आमचे प्रयत्न सातत्याने असतात. असे अनेक अंक वाचकांनी संदर्भाच्या तिजोरीत मोठ्या आनंदाने ठेवले आहेत. दलित पँथरच्या पन्नाशीचा अंक तर पुन्हा छापून वाचकांना पुरवावा लागला. इतकी आनंददायी गोष्ट एखाद्याला खचितच मिळत असावी. 'द पीपल्स पोस्ट'ला ती लाभली, याचा आम्हाला खूप आनंद आहे.

'द पीपल्स पोस्ट'चा जन्म झाला तेव्हा राष्ट्रवादाच्या, धर्मवादाच्या नव्या व्याख्या रुजत होत्या. रुजवल्या गेल्या होत्या. अनेक गोष्टींना पवित्र गाईचे स्वरूप प्राप्त झाले आहे. कोणत्या शब्दाने कशाला तडा जाईल, हे सांगता येऊ नये, अशी स्थिती आहे आणि तिचा सर्वांत अधिक फटका माध्यमांना बसतो. प्रश्न विचारणाऱ्या, तो जागवणाऱ्या, चिकित्सा करणाऱ्यांना अधिक फटका बसतो. या काळात माध्यमातील किती जणांवर खटले भरले आहेत, याची गणती करता येणार नाही. अनेक माध्यमे बंद पडली आहेत. काही त्या मार्गावर आहेत, तर डझनभर चॅनल अंबानीने विकत घेतली आहेत. माध्यमे भांडवलशाही आणि मूलतत्त्ववाद्यांच्या, नव्या राष्ट्रवाद्यांच्या, धर्मवाद्यांच्या हातात एकवटत आहेत आणि ते जे सांगतील तेच राष्ट्रहिताचे, धर्महिताचे असे समजले जावे, यासाठी प्रयत्नही सुरू आहेत. आणीबाणीच्या काळातही इतकी नाजूक स्थिती नसावी. अशा परिस्थितीत समाज आणि राष्ट्राच्या नवनिर्मितीचे स्वप्न बाळगत, टिकवत पुढे जायचे आहे. 'द पीपल्स पोस्ट' अनेकांना शिक्षक, मित्र आणि नेत्यासारखा वाटतो. तो भूमिका घेतो, प्रबोधन करतो, संघटनेसाठी विधायक, वैचारिक मार्गदर्शन करतो आणि सर्वांत मुख्य म्हणजे दुधाला दूध, पाण्याला पाणी आणि घातकाला घातकच म्हणतो. हे सर्व हवे असणारा एक जाणता वर्गही आपल्याकडे आहे. तो लिहीत राहतो, बोलत राहतो, आपापल्या परीने मार्गदर्शन करत राहतो आणि हे सर्व 'द पीपल्स पोस्ट'चे बळ बनले आहे, याचाही आनंद अधोरेखित करावासा वाटतो.

काळ कठीण असला तरी तो कायमस्वरूपी तसाच राहणारा नसतो. व्यवस्था बदलता येते हे महापुरुषांनी सिद्ध करून दाखवले आहे आणि दुःखे कधी कायमस्वरूपी मुक्कामाला येत नसतात हे अण्णाभाऊंनी सांगितले आहे. चार्वाक, बुद्ध, कबीर यांच्यापासून ते फुले-शाहू-आंबेडकर यांच्यापर्यंत एक दीर्घ परंपरा आपल्याकडे आहे. होय जग बदलू शकते या स्वप्नाला ही परंपरा बळ तर देतेच, शिवाय प्रात्यक्षिकेही करून दाखवते. या सर्वांचे एक सम्यक दर्शन 'द पीपल्स पोस्ट'मध्ये पाहायला मिळते. इतिहासातील महापुरुषांच्या कर्तृत्वाच्या अनेक खुणा पाहायला मिळतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जगण्या-लढण्यासाठी धीर मिळतो. बी.जी. वाघ, भास्कर नाशिककर, विजय नाईक आदी अनेकांनी आपले प्रभावी कॉलम सातत्याने चालवले आहेत. रावसाहेबांचे मार्गदर्शन शिदोरीसारखे बाळगत 'द पीपल्स पोस्ट'चा प्रवास सुरू आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर नेमके भाष्य करण्याचा आणि त्यातील वाटा-आडवाटा दाखवण्याचा प्रयत्न अर्थतज्ज्ञ तुळजापूरकर, देसरडा आणि श्रीनिवास खांदेवाले आदी काहींनी सातत्याने केला आहे. जगण्याच्या सर्वच मार्गांवर 'द पीपल्स पोस्ट' जणू काही जागल्याची भूमिका करतो आहे. म्हणूनच अगदीच अल्पावधीत त्याने स्वतःचे छोटे-मोठे स्थान निर्माण केले आहे.

पाचवे पाऊल टाकण्याच्या वेळीही आपला सभोवताल गेल्या दहा-बारा वर्षांप्रमाणे गुंतागुंतीचा असणार आहे. आपली राज्यघटना, घटनात्मक संस्था, लोकशाही, राजकारण, मूल्ये, अभिव्यक्ती आदींवर सातत्याने कोणत्या ना कोणत्या सावल्या पडत राहणार आहेत, हे वेगळे सांगायला नको. नवा समाज आणि नव्या राष्ट्रनिर्मितीच्या मार्गातील हे सर्व गतिरोधक आहेत. काही गतिरोधक मुद्दाम उंच, तर काही मुद्दाम टोकदार बनवले जात आहेत. या सर्वांतून मार्ग काढत आपल्याला महापुरुषांच्या स्वप्नातील भारताकडे जायचे आहे. ज्याचे हिंदू राष्ट्र करण्याची घाई अनेकांना झाली आहे. या सर्व प्रवासात आपापल्या भूमिका नीट आणि प्रामाणिकपणे पार पाडल्या, की सावल्यांच्या टोळ्या हुसकून लावता येऊ शकतात, हा सर्व जगाचा अनुभव आहे. 'द पीपल्स पोस्ट'चाही तोच आहे. आपल्या सर्वांच्या हातात हात घालून सुरू केलेला प्रवास दीर्घकाळ चालावा अशा आपल्या सर्वांकडून शुभेच्छा हव्या आहेत. लेखन सहकार्य करून, मार्गदर्शन करून, पाठिंबा देऊन, वर्गणीदार होऊन आपण आम्हाला आणखी पावले टाकण्यासाठी बळ द्यावे, हीच अपेक्षा.

●●●

# ‘द पीपल्स पोस्ट’ची लढत महत्वाची

**समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा घेऊन चार वर्षांअगोदर मोठ्या गांभिर्याने आणि दिमाखाने सुरू झालेले ‘द पीपल्स पोस्ट’ हे पाक्षिक आता पाचव्या वर्षात मोठ्या आत्मविश्वासाने पदार्पण करीत आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. गेल्या चार वर्षांचा काळ हा समाज, राष्ट्र आणि नागरिकांच्या दृष्टीने अस्थिरतेचा, गोंधळाचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी चिंता व्यक्त करणारा, तत्त्वज्ञानाच्या भ्रष्टाचाराचा आणि ‘जिसकी लाठी उसकी भैस’ याप्रमाणे चालणारा होता. या कठीण काळात समाजाचे, लोकांचे प्रबोधन करून त्याला दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करण्याचे, त्याला प्रशिक्षित करण्याचे काम सातत्याने ‘द पीपल्स पोस्ट’या पाक्षिकाने केले आहे. विद्यमान परिस्थितीत अशा पाक्षिकाची खूप गरज आहे आणि भविष्यात ती तीव्र असणार आहे. या पाक्षिकाच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त मान्यवरांनी व्यक्त केलेल्या या काही प्रतिक्रिया प्रातिनिधिक स्वरूपात देत आहोत.**

**– संपादक.**

## प्रबोधनाच्या दृष्टीने एक आवश्यक माध्यम : ‘द पीपल्स पोस्ट’!

‘द पीपल्स पोस्ट’ या पाक्षिकाला चार वर्षे पूर्ण होत आहेत, याबद्दल मनस्वी आनंद होतोय. या पाक्षिकाने नवी जागृती समाजात आणलेली आहे. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांवर उभे असलेले हे पाक्षिक भारतीय समाजाला प्रबोधनाच्या दृष्टीने एक आवश्यक माध्यम बनले आहे. अलीकडे सर्व नियतकालिके ही सर्वसामान्यपणे प्रवाहपतीत झालेली आहेत. यातून मुक्त अशी पत्रकारिता मराठी वाचकांची आवश्यकता होती, ती पूर्ण करण्याचे काम ‘द पीपल्स पोस्ट’ या पाक्षिकाने केलेले आहे. त्याचे संपादक मा. चेतन शिंदे आणि त्यांचे मार्गदर्शक या सर्व मंडळींनी जिद्दीने हे पाक्षिक चालू ठेवले, त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. हे पाक्षिक असेच चालू राहावे आणि भारतातील लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता मूल्यांची जोपासना व्हावी, म्हणून जनतेने त्याला आर्थिक आणि इतर सर्व प्रकारची मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यांना ही मदत समाजाकडून मिळेल, अशी अपेक्षा आहे.



**डॉ. रावसाहेब कसबे**
ज्येष्ठ साहित्यिक
व विचारवंत

## रॅडिकल डिस्कोर्स !



**यशवंत मनोहर**
मराठी कवी, लेखक आणि
साहित्य समीक्षक

**प्रिय चेतन,**

‘द पीपल्स पोस्ट’ चार वर्षांचे झाले; पण ‘द पीपल्स पोस्ट’ बाळ कधीच नव्हते. ते जन्मतःच प्रौढत्व घेऊन आले आणि पुढे क्रमाने ते नवनव्या बौद्धिक प्रगल्भतेने प्रज्ञानी होत आहे. याचे श्रेय तुमच्या युगसाक्षी संपादकत्वाला आहे. लेखकांचा पाठपुरावा करण्याची विनम्र चिकाटी तुमच्यात आहे. असा पाठपुरावा करण्याचे एक मधस्वी पद्धतिशास्त्रच तुम्ही विकसित केले आहे.

प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्या प्रज्ञावंतांची एक छावणीच तुम्ही तयार केली. मूलतत्त्ववाद्यांचे अभिजात वेगळे असते आणि संपूर्ण समाजव्यवस्थाच नव्याने मांडू इच्छिणारांचे अभिजात पूर्णतः वेगळेच असते. मूठभर अभिजनांचे अभिजात वेगळे असते आणि दैन्यजनांच्या प्रवक्त्यांचे संघर्षशील अभिजात वेगळे असते. ‘द पीपल्स पोस्ट’मध्ये तुम्ही जाणिवपूर्वक या दोन अभिजातांमधला संग्राम पायाभूत पातळीवरून सुरू केला. याचे कारण बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर हेच तुमचे जीवनाच्या निरंतर नवरचनेचे सर्वानुकंपाय प्रमाणशास्त्र आहे. तुमच्या ज्वलंत अभिरूचीच्या कार्यशाळेचे महासंचालक उत्तम कांबळे यांनाही मी धन्यवाद द्यायला हवे. ‘द पीपल्स पोस्ट’ हे पत्र खरे म्हणजे लोकपत्रच आहे. हे बाबासाहेबांच्या जनताचेच आजचे कालसंगत रूप आहे. केवळच भारतीय असण्याचा निर्धार करणाऱ्या लोकांच्या बंडखोर आवाजांना नायक करणारे हे लोकपत्र आहे. या पत्रातून तुम्ही एक रॅडिकल डिस्कोर्स गंभीरपणे सुरू ठेवलेला आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा सर्वच क्षेत्रांमधे पायाभूत बदल घडवू इच्छिणारी मने निर्माण करण्याचा निर्धार हा ‘द पीपल्स पोस्ट’ने माथ्यात घेतलेला आहे. म्हणून मला ‘द पीपल्स पोस्ट’चा गौरव वाटतो. चार वर्षे वयाच्या प्रौढ आणि प्रगल्भ ‘द पीपल्स पोस्ट’चं मी त्यामुळेच मनापासून अभिनंदन करतो आणि त्याच्या पुढील झगमगत्या आणि सर्जनशील वाटचालीसाठी हार्दिक सदिच्छा देतो.

# Opinion about The People's Post on compilation of four year



The People's Post has entered into its fifth year. In a short period it has made a distant place in the media for itself for discussion on relevant contemporary issues. themes, quality of writings and above all the expression with fearlessness and straightforwardness on a variety of issues of national importance and those related to the marginalized groups.

**- Pro. Sukhadeo Thorat.**
(Former Chairman of University Grants Commission and
Former Chairman of Indian Council of Social Science Research)

---



## Best wishes for you

I have gone through some the issues of the People's Post given t to me by you. You seem to have collected gems of writers to present thought provoking views. Your editorials show that you are shaping yourself to be an editor without fear or favor. I wish you success to make the People's Post a force to recon with.

**Shesharao chavan**
Aurangabad

---

## सर्व पुरोगामी विचारांचा जागर, आग्रह धरणारे पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'

गेल्या दशकापासून जाणिवपूर्वक आणि सत्तेच्या जोरावर संकुचित केले जात असलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सर्वच माध्यमांची होत असलेली गळचेपी, प्रश्न विचारण्यास आणि उत्तरे मागण्यास आलेल्या मर्यादा या पार्श्वभूमीवर 'द पीपल्स पोस्ट'ने चार वर्षांपूर्वी आपला प्रवास माध्यमक्षेत्रात करून एका अर्थाने धाडशी पाऊल टाकले आहे. म. फुले, शाहू आणि डॉ. आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत, यांच्या स्वप्नातील स्वातंत्र्य, बंधुता आदींचा आग्रह धरणारे आणि समाजाला त्या दिशेने नेण्याचा निर्भिड प्रयत्न करणारे हे पाक्षिक आहे. गेली चार वर्षे कृतीतून या पाक्षिकाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सर्व पुरोगामी विचारांचा जागर करत आणि त्यांचा आग्रह धरत हे पाक्षिक पुढे जात आहे. काळाच्या गरजेतून ज्याचा जन्म झाला ते 'द पीपल्स पोस्ट' असे म्हणावे लागेल. भावी वाटचालीस माझ्या शुभेच्छा.



**उत्तम कांबळे**
(अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व
सकाळ माध्यम समूहाचे माजी संचालक संपादक)

# जनसामान्यांशी घनिष्ट नाते सांगणारे नियतकालिक ‘द पीपल्स पोस्ट’



डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
ज्येष्ठ साहित्यिक
व माजी कुलगुरु

नियतकालिक चालविणे दिवसेंदिवस अवघड होत चाललेल्या काळात ‘द पीपल्स पोस्ट’ पाचव्या वर्षात प्रवेश करीत आहे, ही अतिशय आनंदाची आणि अजून सारे काही संपले नाही, याची जाणीव करून देणारी गोष्ट आहे. ‘द पीपल्स पोस्ट’ हे जनसामान्यांशी घनिष्ट नाते सांगणारे नियतकालिक आहे. जनसामन्यांचे प्रश्न त्यांना समजतील अशा भाषेत मांडणे व वाचकांना वास्तवाचे तीव्र भान आणून देणे, हे ‘द पीपल्स पोस्ट’चे खास वैशिष्ट्य आहे. संपादकीय अतिशय विचारप्रवर्तक असते, तसेच विविध सदरे नव्या समस्यांची जाणीव करून देतात. आंबेडकरी मूल्यांसह सर्वच उदारमतवादी मूल्यांचा आग्रह ‘द पीपल्स पोस्ट’मधून व्यक्त होताना दिसतो. आणखी एक विशेष असे, की कुठल्याही प्रकारची तडजोड कुठल्याही कारणासाठी ‘द पीपल्स पोस्ट’ करीत नाही. मला वाटते, त्यांच्या या निष्ठेमध्येच त्यांच्या यशाचे रहस्य आहे. पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.

# महाराष्ट्राचा एक वैचारिक अन् रोखठोक मंच ‘द पीपल्स पोस्ट’

मराठी पत्रकारितेत पाक्षिकांना क्वचितच स्थान मिळाले. साप्ताहिके व मासिके यांना रुळलेला मराठी वाचक पाक्षिकांना जवळ करणे अस्वाभाविक होते; पण ‘द पीपल्स पोस्ट’ने सारे समज उलटवले. त्याचे नाव, प्रकाशन काल, वाचकवर्ग अशा सर्व घटकांसह त्याचे संपादक चेतन शिंदे यांच्याशी माझा जवळून संबंध आला. चेतन माझा सख्खा विद्यार्थी. त्याचा वर्गबाह्य शिक्षकही मी बनलो तो या पाक्षिकामुळे. आता ते महाराष्ट्राचे एक वैचारिक अन् रोखठोक मंच म्हणून स्थिरावल्याचे मी पाहतो आहे. त्यात मलाही लिहिता येते म्हणून नव्हे, तर सुखदेव थोरात, रावसाहेब कसबे, विजय नाईक, उत्तम कांबळे अशा विचारकांनाही महाराष्ट्र पाहतो, याने त्याची उंची व गांभीर्य लाभल्याचेही दिसते. ‘द पीपल्स पोस्ट’मुळे नि:पक्षपाती, तटस्थ अथवा संतुलित पत्रकारिता असा काही प्रकार नसतो, हा समज दृढ होतो आहे. तात्विक आणि वैचारिक बाजू मराठी पत्रकारितेतून लुप्त झालेल्या काळात ‘द पीपल्स पोस्ट’ अवतरले. त्याचे असणेच आमच्यासारख्यांना फॅसिझम अन् धर्मांधता यांच्याशी चार हात करायला आणि त्यांचा पाडाव करायला मोठी प्रेरणा देते. ती सदैव मिळो...



प्रा. जयदेव डोळे
ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ

# कुणाचीही भिड मुरवत न बाळगणारे निर्भीड पाक्षिक ‘द पीपल्स पोस्ट’



विजय नाईक
ज्येष्ठ पत्रकार,
नवी दिल्ली

‘द पीपल्स पोस्ट’ पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे. मराठी वाचकांसाठी ते प्रत्येक अंकात नवनवीन राजकीय, सामाजिक, आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत उत्तमोत्तम लेख घेऊन प्रकाशित होत आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक मंथनात ‘द पीपल्स पोस्ट’ने गेल्या चार वर्षांत मोलाची भर टाकली आहे. ताज्या घडामोडींचे विश्लेषण, भाष्य हे या अंकाचे आणखी एक वैशिष्ट्य. त्यातील लेखकांची नावे पाहता अंकाच्या दर्जाची कल्पना तर येतेच; पण प्रत्येक अंक आपल्याला विचार करावयास काहीतरी नवीन देऊन जातो. त्यातील कविता आशयघन असतात. तसंच, ‘दलित पँथर’सारखे अंक संग्रही ठेवण्याजोगे असतात. त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दलितांच्या उत्थानाचे ‘द पीपल्स पोस्ट’ने डोळ्यापुढे ठेवलेले उद्दिष्ट! दलितांवरील दिवसागणिक वाढणारी अत्याचारांची संख्या पाहता, त्या विरुद्धचा लढा कायम ठेवला पाहिजे, याची जाणीव ‘द पीपल्स पोस्ट’ करून देते. अंकाला ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांचे लाभलेले नेतृत्व व मार्गदर्शन व कुणाचीही भिड मुरवत न बाळगता सडेतोडपणे लिहिणारे संपादक चेतन शिंदे यांच्यामुळे दिवसेंदिवस अंकाचा दर्जा उंचावत तर आहेच; पण वाचक वर्गातही भर पडत आहे. पुढील वर्ष व आगामी वर्षांच्या वाटचालीसाठी ‘द पीपल्स पोस्ट’ला माझ्या मनापासून शुभेच्छा.

# मृत झालेल्या चळवळीला चेतना देणारे ‘द पीपल्स पोस्ट’



**जी.के. ऐनापुरे**
ज्येष्ठ कादंबरीकार व समीक्षक

‘द पीपल्स पोस्ट’ या पाक्षिकाची वाटचाल अभिनंदपर अशीच आहे. एखादे पाक्षिक चालवणे हे जितके जिकीरीचे आणि कष्टप्रद आहे, तितकेच ते सामान्यांपर्यंत पोहोचवणे अवघड बनले आहे. ‘द पीपल्स पोस्ट’मधील सर्वच लेखन हे चिकित्सक पातळीवर जाणारे असून, अनेक दिग्गजांचा त्यातील सहभाग हा अर्थपूर्ण आणि मृत झालेल्या चळवळीला चेतना देणारा असा आहे. वर्तमानकाळातील समस्या, सातत्याने अतार्कीक घडणाऱ्या घडामोडी, साहित्यातून जाणाऱ्या अराजकतेच्या प्रवासाला केलेला विरोध इत्यादी महत्त्वपूर्ण गोष्टी ‘द पीपल्स पोस्ट’ वाचताना, त्याला सहकार्य करताना ध्यानात येत राहतात. ‘इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया’ या खुशवंत सिंग या ग्रेट माणसाने चालवलेल्या अंकाबरोबर ‘द पीपल्स पोस्ट’ची तुलना करावीशी वाटते. ‘द पीपल्स पोस्ट’च्या भावी वाटचालीस शुभेच्छा...

# एक वैचारिक नियतकालिक ‘द पीपल्स पोस्ट’



**बी.व्ही. जोंधळे**
आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक

आपल्या कुशल संपादनाखाली प्रसिद्ध होणाऱ्या ‘द पीपल्स पोस्ट’चा मी सुरुवातीपासून वाचक आहे. गत चार वर्षांतील ‘द पीपल्स पोस्ट’चे अंक वाचताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती अशी, की फुले-आंबेडकरवादी, तसेच डाव्या पुरोगामी विचारांचा प्रसार-प्रचार करण्यासाठी ज्या एका नियतकालिकाची अत्यंत गरज होती, ती आपण ‘द पीपल्स पोस्ट’ला जन्म देऊन मोठ्या प्रमाणात भागविली आहे. प्रख्यात विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, कवी, समीक्षक, लेखक डॉ. यशवंत मनोहर, अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे, अर्थशास्त्रज्ञ प्रा. डॉ. सुखदेव थोरात व याशिवाय इतर अभ्यासू लेखकांचे लेखन आपण नियमित प्रसिद्ध करीत असल्यामुळे ‘द पीपल्स पोस्ट’ला एक वैचारिक नियतकालिक म्हणून प्रतिष्ठा मिळाली आहे, याविषयी शंकाच नाही. फुले-आंबेडकरी विचार, हिंदुत्वाची परखड चिकित्सा, धम्माचे सार, प्रचलित प्रश्नांवरील ‘पंक्चरवाला’चे भाष्य, आंबेडकर जयंती विशेषांक, हे आपले सारेच संपादकीय प्रयोग अफलातून ठरले आहेत. दलित पँथरच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने अलिकडेच प्रसिद्ध झालेला ‘द पीपल्स पोस्ट’चा अंक संग्राह्य ठरला आहे. आपल्या भावी वाटचालीस मंगल कामना व्यक्त करून ‘द पीपल्स पोस्ट’ची अशीच भरभराट होवो व वाचकांना अभ्यासपूर्ण, कसदार लेखनाचा खुराक मिळो, अशी अपेक्षा व्यक्त करून थांबतो. धन्यवाद!

# अस्तंगत होत असलेल्या नियतकालिकांच्या परंपरेत एक नवे दमदार पाऊल



**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी,**
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष

‘द पीपल्स पोस्ट’ने मराठी नियतकालिकांच्या इतिहासात चारच वर्षांत आपलं जे वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण स्थान निर्माण केलं आहे ते लक्षणीय आहे. सध्या अस्तंगत होत असलेल्या मराठीतील प्रागतिक नियतकालिकांच्या परंपरेत तर हे नियतकालिक एक नवे दमदार पाऊल असून, त्याने ही परंपरा पुनरूज्जीवित होत आहे. अल्पकाळातच आपले स्थान निर्माण करणाऱ्या या नियतकालिकाला पुढील प्रवासाच्या अनेक शुभेच्छा...

# पुरोगामी विचारांना आणि लेखकांना प्रोत्साहन देणारं पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'



अत्यंत कठिण प्रसंगी भारतीय जनता पार्टीचं केंद्रात आणि राज्यात सरकार अस्तित्वात आहे आणि सर्व पुरोगामी विचारांभोवती हल्ले होत आहेत. त्यांना माघार घ्यावी लागत आहे. अशा वेळेस मोठ्या जिद्दीने 'द पीपल्स पोस्ट'सारखे पाक्षिक महाराष्ट्रामध्ये पुरोगामी आवाज बुलंद करण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत आहे. हे असेच काम 'द पीपल्स पोस्ट'ने धडाडीने करावे, त्यांच्या कामाला यश मिळावे, असे मला वाटते. 'द पीपल्स पोस्ट'च्या चौथ्या वर्धापन दिनाला माझ्या शुभेच्छा आहेत. महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांना आणि लेखकांना 'द पीपल्स पोस्ट'मुळे प्रोत्साहन मिळालेलं आहे आणि त्यांची लिहिण्याची जिद्द वाढलेली आहे. हे महत्त्वाचं काम 'द पीपल्स पोस्ट'ने चालू ठेवावं, ही अपेक्षा.

**कॉम्रेड डॉ. भालचंद्र कांगो**
भा.क.प. ज्येष्ठ नेते, नवी दिल्ली

# पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'च्या पाचव्या वर्षातील पदार्पणाला परिवर्तनकारी शुभेच्छा!

सध्याच्या घुसमटून टाकू पाहणाऱ्या, अभिव्यक्ती आणि वाद-संवाद दडपू पाहणाऱ्या आणि बौद्धिक मांद्य पोसू पाहाणाऱ्या या वातावरणात 'द पीपल्स पोस्ट' एक मोठे काम पार पाडते आहे. गेल्या चार वर्षांत, ज्यात नवहिंदुत्वाबरोबरच कोरोना महामारीने आपले जीवन घेरण्याचे प्रयत्न अनुभवाला आले. सध्याची वैचारिक-सांस्कृतिक कोंडी फोडण्याच्या प्रयत्नात 'द पीपल्स पोस्ट'चा जो क्रियाशील सहभाग राहिला, तो आपल्या सर्वांचा आत्मविश्वास वाढवणारा आहे. समानता आणि सामाजिक न्याय, लोकशाही आणि एकाधिकारशाही, धर्म आणि धर्मनिरपेक्षता, विकास आणि अर्थकारण, संस्कृती आणि राजकारण यांसह अनेक विषयांना हाताळतानाच 'द पीपल्स पोस्ट'ने बहुविध दृष्टिकोन, विश्लेषणे आणि पर्याय यांना आवर्जून जे स्थान आणि जो मान दिला आहे, ते फार महत्त्वाचे आहे. अशा प्रगतीशील विचारांची आणि व्यापक दृष्टी दाखवणाऱ्या मराठी नियतकालिकांची संख्या आज अत्यल्प आहे. त्यामुळे तर 'द पीपल्स पोस्ट'ची गरज आज अधिकच अधोरेखित होते आहे. 'द पीपल्स पोस्ट'च्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !



**दत्ता देसाई**
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते

# 'द पीपल्स पोस्ट'चे यशस्वी पदार्पण!



आजच्या काळात एखादं नियतकालिक सुरू ठेवणं ही सोपी गोष्ट नव्हे. याचा अर्थ पूर्वीच्या काळी नियतकालिकांसाठी भरभराटीचे दिवस होते, असा नाही. अनेक बंद पडणाऱ्या नियतकालिकांची मराठीत मोठी परंपरा आहे. शिवाय सांप्रत काळात व्हाट्सॲप विद्यापीठाचा प्रभाव मोठा असल्यामुळे माणसाचं अवधान शतखंडित झालं आहे. वाचन नावाचा प्रकारच दुर्लक्षित होतो आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत 'द पीपल्स पोस्ट'सारखे पाक्षिक चार वर्षे सुरळीत सुरू आहे. पाचव्या वर्षात यशस्वी प्रवेश करताना संपादकीय धोरणांनी विधायक विचार, सामाजिक बांधिलकी, असहिष्णूतेचा धिक्कार, मानवता, शोषण विरोध, अशा मूल्यांना किंचितही ढळू दिले नाही. आंतरराष्ट्रीय विषयांपासून ते गावझोपडीपर्यंतच्या नवनव्या विषयांनी प्रत्येक अंक आशयसंपन्न असतो. छपाई, मांडणीही लक्षवेधी आहे. आजचे महत्त्वाचे लेखक आवर्जून या अंकासाठी लेखन करतायेत. संपादक चेतन शिंदे व त्यांच्या सक्रिय टीमला मनापासून शुभेच्छा आणि अभिनंदन!

**डॉ. दासू वैद्य**
मराठी विभागप्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

# प्रतिक्रांतीच्या तुफानातही प्रकाशमान 'द पीपल्स पोस्ट'



**डॉ. राजेंद्र गोणारकर**
लेखक स्वा. रा. ती. म. विद्यापीठातील माध्यम संकुल विभागात प्राध्यापक आहेत.

'द पीपल्स पोस्ट' पाचव्या वर्षांत पाऊल टाकत आहे, याचा मनस्वी आनंद वाटतो. भारतीय पत्रकारितेच्या ऱ्हासशील पर्वात नेटाने उभे राहून प्रागतिक विचारांचा ध्वज सतत उंचावत ठेवणे ही सोपी गोष्ट नाही; पण ही कौतुकास्पद कामगिरी हे पाक्षिक सातत्यपूर्वक करत आहे. विषयांचे वैविध्य, समकालीन प्रश्नांचे जागते भान आणि तितकीच अभ्यासपूर्ण मांडणी करणारे लेख हे 'द पीपल्स पोस्ट'मधील मजकुराचे प्रधान वैशिष्ट्य असल्याचे सतत जाणवत राहते. पाक्षिकाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेले विविध विषयांवरील विशेषांक औचित्यपूर्ण आणि लक्षवेधी होते. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून सचोटीने भूमिका पार पाडताना समाजमन विवेकशील करण्याच्या जबाबदारीची जाणीव ठेवणारे हे पाक्षिक आहे. संपादक चेतन शिंदे यांची मर्मग्राही दृष्टी आणि उत्कृष्ट व्यवस्थापन यामुळे प्रतिक्रांतीच्या तुफानातही 'द पीपल्स पोस्ट'चा दिवा प्रकाशमान आहे. सर्व तऱ्हेच्या अंधाराला जाळू पाहणारे हे पाक्षिक उद्याच्या मंगल पहाटेवर हार्दीक स्वाक्षरी करणारे ठरो, हीच मनापासून सदिच्छा.

# पुरोगामी, परिवर्तनवादी विचारांचा वेध घेणारे पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'

'द पीपल्स पोस्ट' हे पाक्षिक गेली चार वर्षे राज्यभरात पुरोगामी, परिवर्तनवादी विचारांचा वेध घेत राज्य व देश पातळीवरील समाजकारण, राजकारण, वैचारिक भूमिका व समाजाच्या सांस्कृतिक बदलाचे अचूकपणे वेध घेत वाचकांसाठी अतिशय वैचारिक लेखन पुरवत आहे. राज्यामध्ये अनेक मासिक व नियतकालकांमध्ये 'द पीपल्स पोस्ट' हे अतिशय कमी कालावधीत आपल्या वैशिष्ट्यपूर्ण, आकर्षक बांधणी व त्याचबरोबर वैचारिक भूमिका घेत लेखन करणाऱ्या लेखकांसाठी व वाचकांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. सातत्यपूर्ण मांडणी व सैद्धांतिक गांभीर्य टिकून महाराष्ट्रामध्ये फुले, शाहू, आंबेडकर, अण्णा भाऊ या परिवर्तनाच्या श्रृंखलेतील महापुरुषांच्या विचारांची बांधिलकी स्वीकारत अतिशय झपाट्यानं बदलणाऱ्या प्रसारमाध्यमांच्या काळात आपली वैचारिक स्वायत्तता टिकवत लेखक व वाचकांत महत्त्वपूर्ण मांडणी करत आहे. 'द पीपल्स पोस्ट'च्या पाचव्या वर्षांत होणाऱ्या पदार्पणाबद्दल संपादक आयुष्यमान चेतन शिंदे व 'द पीपल्स पोस्ट'चे सर्व सहकारी, वाचक व लेखक या सर्वांचे अभिनंदन व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा.



**डॉ. मिलिंद एकनाथ आवाड**
प्राध्यापक
जे.एन.यू.नवी दिल्ली

# भारतीय समाजाच्या व राष्ट्राच्या नवरचनेसाठी कटिबद्ध 'द पीपल्स पोस्ट'

'द पीपल्स पोस्ट' हे अत्यंत दर्जेदार पाक्षिक पाचव्या वर्षांत पदार्पण करीत आहे. याचा मनस्वी आनंद होतो. देश-विदेशातील जमिनीवरील माणसांशी, त्यांच्या दैनंदिन रोजच्या जगण्यांशी निगडित असलेल्या प्रश्नांची नोंद घेणाऱ्या व त्यांची कष्ट घेऊन उत्तरे शोधू पाहणाऱ्या ख्यातनाम समाज संशोधक व अभ्यासकांचे लेख आजपर्यंत 'द पीपल्स पोस्ट'ने जाणीवपूर्वक प्रकाशित केलेत, यासाठी तर त्याचे अभिनंदन केलेच पाहिजे.

भारतीय समाजाच्या व राष्ट्राच्या नवरचनेसाठी हे पाक्षिक पूर्णपणे कटिबद्ध आहे, असे अनेकांचे निरीक्षण आहे. आंबेडकरी व प्रबुद्ध भारताच्या निर्मितीसाठी अशा प्रतिकूल सामाजिक व राजकीय वातावरणातसुद्धा काही माणसं, समाजगट, सामाजिक व राजकीय संस्था-संघटन आग्रहीच आहेत; त्या सर्वांशी 'द पीपल्स पोस्ट'ची नाळ घट्टपणे जुळलेली आहे, हे पाहून अत्यंत समाधान वाटते.

मागील चार वर्षांपासून या पाक्षिकाने गुणवत्तेची कास सोडली नाही. विशेष म्हणजे या पाक्षिकाचे 'संपादकीय' अत्युच्य दर्जाचे व सारगर्भ दर्शविणारे आहे, नाविन्याचा ध्यास घेणारे आहे, याचा विशेष करून उल्लेख करावासा वाटतो. यास्तव 'द पीपल्स पोस्ट'ला पांचव्या वर्षांसाठीच काय तर पुढच्या अनेक वर्षांच्या प्रामाणिक वाटचालीसाठी हार्दिक मंगल कामना देणे प्रत्येक सुजाण वाचकाचे प्रथम कर्तव्य आहे, म्हणून ते प्रत्येकाने केलेच पाहिजे.



**डॉ. गौतम खु. कांबळे**
ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ज्ञ,
नागपूर

# वैचारिक स्तरावर विरोधी पक्षाची भूमिका पार पाडणारे पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'

महाराष्ट्रास वैचारिक नियतकालिकांची एक मोठी परंपरा आहे; पण ही वैचारिक नियतकालिके काही विशिष्ट वर्गापर्यंतच मर्यादित आहेत. लिहिणारे मोजके व वाचणारेही मोजके. अशा स्थितीत वैचारिकतेचा सूर कायम ठेवत हजारो वाचकापर्यंत पोहोचण्याचे काम 'द पीपल्स पोस्ट'ने केलेले आहे. दर्जेदार कागदावरील दर्जेदार लेखन बुद्धिवाद्यांपासून ते सामान्यांपर्यंत पोहोचवणे हे येड्या गबाळ्याचे काम नाही; पण चेतन शिंदे व त्यांची टीम अत्यंत यशस्वीपणे ही जबाबदारी पार पाडत आहेत म्हणून त्यांचे अभिनंदन!!

बदलत्या राजकीय परिस्थितीत अशा नियतकालिकांची खूपच गरज आहे. पूर्णपणे डी कास्ट झालेले हे पाक्षिक आज वैचारिक स्तरावर विरोधी पक्षाची भूमिका पार पाडत आहे. हे पाक्षिक टिकले पाहिजे, यासाठी आपण सर्वजण याच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे.



**सुर्यनारायण रणसुभे**
ज्येष्ठ विचारवंत, लातुर

---

# सामाजिक चळवळीचा आवाज : 'द पीपल्स पोस्ट'!



**डॉ. उत्तम अंभोरे**
इंग्रजी विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

'द पीपल्स पोस्ट' या पक्षिकाचं ब्रीदवाक्य हे 'समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी' असं आहे. चार वर्षांपासून हे पाक्षिक सुरू आहे. 'द पीपल्स पोस्ट'ने पाचव्या वर्षात पदार्पण केलंय. विविध प्रश्न अधोरेखित करून त्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण काम 'द पीपल्स पोस्ट' सध्या करीत आहे. यात प्रामुख्याने दोन अंकाचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, 'पँथरची पन्नाशी' हा पँथर विशेषांक आणि स्वातंत्र्य दिनाचा अंक 'स्वातंत्र्य ७५ फुले आणि काटे'. स्वातंत्र्य दिनाच्या अंकात स्वातंत्र्याचा विविध अंगाने विचार केलेला दिसतो आणि त्यानंतर 'पँथरची पन्नाशी' हा अंक भारतातील पहिला अंक असेल, ज्याने पँथर चळवळीची चिकित्सक चिकित्सा करण्याचे महत्त्वपूर्ण काम 'द पीपल्स पोस्ट'ने केलेले आहे.
दक्षिण भारतात 'दलित व्हाईस' नावाचे मासिक आहे, जे दिनदुबळ्यांचा, वंचित घटकांचा आवाज बुलंद करते, त्याचप्रमाणे 'द पीपल्स पोस्ट' सुद्धा हे काम करीत आहे, ही महत्त्वाची बाब आहे. 'द पीपल्स पोस्ट'चे सर्व अंक हे संग्रही ठेवण्यासारखेच आहेत आणि अंकामधील 'संपादकीय', 'हवा दिल्लीची', 'इतना सन्नाटा क्यू है भाई?', 'आज-कालचे प्रश्न' आणि 'पंक्चरवाला' ही सदरे निर्भीड, रोखठोक आणि वाचनीय आहेत. प्रत्येक अंकामागील कल्पकता आणि विषय, छपाई, अभिनंदनीय आहे! 'सामाजिक चळवळीचा वेगळा आवाज' या पाक्षिकाच्या माध्यमातून निघतो. त्यामुळे 'द पीपल्स पोस्ट'चे संपादक मा. चेतन शिंदे आणि संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन! हे सामाजिक काम असेच सुरू राहावे, यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

---

# व्यवस्था परिवर्तनाचे प्रभावी हत्यार : पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'

फॅसिझमच्या आव्हानांना सामोरे जाऊन प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध वैचारिक संघर्षाच्या लढ्याचा आवाज बुलंद करणारे आणि आमूलाग्र, व्यवस्था परिवर्तन चळवळीचे एक प्रभावी हत्यार म्हणून 'द पीपल्स पोस्ट' या पाक्षिकाकडे पाहिले जाते. कारण या नियतकालिकेत प्रसिद्ध होणारे लेख, काव्य, ग्रंथ व काव्य समीक्षन लेखन, व्यक्ती विशेष पर स्वंकथन इत्यादी वैचारिक व ललित साहित्य हे ज्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अभिव्यक्तीसाठी तमाम दलित, शोषित, वंचित, उपेक्षित समाज धडपडतो आहे, त्या अभिव्यक्तीला निश्चित अशी पार्श्वभूमी देऊ शकेल; यात शंका नाही. जीवनातील सभोवतालच्या वास्तवाचा वेध घेत-घेत सामान्यांच्या बाजूने सरकारच्या आणि असामाजिक तत्त्वांच्या विरोधात सनदशीर व अहिंसक मार्गाने विद्रोह पुकारण्याचे बळ हे पाक्षिक देऊन जाते. नव्हे, तर 'प्रबुद्ध भारत' राष्ट्र निर्मितीच्या आणि एकूणच महामानवाच्या स्वप्नपूर्तीसाठीच्या प्रक्रियेत या नियतकालिकेचे वैचारिक-नैतिक योगदान नाकारता येत नाही. सदर पाक्षिकातील संपादकीय लेख म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे झेपावणाऱ्या 'फिनिक्स' पक्षाप्रमाणे आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे 'अस्ताला गेलेल्या प्रज्ञासूर्याने अंधारातून बाहेर येण्यासाठी उजेड दिला आहे', असा संकेत अधोरेखित होतो. 'द पीपल्स पोस्ट' या नियतकालिकाच्या पुढील दमदार, यशस्वी वाटचालीस मैत्रीपूर्ण सदिच्छा व्यक्त करतो.



**निरंजन पाटील**
ज्येष्ठ विचारवंत, मुंबई

# ‘द पीपल्स पोस्ट’ एक दीपस्तंभ




**उर्मिला पवार**
ज्येष्ठ लेखिका, मुंबई

‘द पीपल्स पोस्ट’ या जाज्वल्य पाक्षिकाला या वर्षी ४ वर्षे पूर्ण होत आहेत. ‘द पीपल्स पोस्ट’ म्हणजे लोकांचे मत, संदेश, वार्ता. ‘द पीपल्स पोस्ट’ या नावातच संविधानातली उद्देशिका अंतर्भूत आहे. नागरिकास न्याय, स्वातंत्र्य, समानता, प्रतिष्ठा आणि बंधुता ही मूल्ये प्राप्त करून देण्याचा निर्धार आहे. संविधान निर्मात्यांनी हे संविधान स्वत:ला म्हणजे नागरिकांना व लोकांनाच अर्पण केले आहे. त्याप्रमाणेच या पाक्षिकाच्या निर्मात्यांनीही खरोखरच या पाक्षिकाची निर्मिती संविधानातीलच प्रगल्भ, परखड, निडर आणि शास्त्रीय दृष्टीकोन समोर ठेवून केलेली आहे.

प्रसार माध्यमाचा लौकिक मिरवणारे कोणतेही साहित्य हे लोकशाहीचा चौथा खांब असते. ते बिरूद ‘द पीपल्स पोस्ट’ने आपल्या निधड्या छातीवर डॉ. बाबासाहेबांच्या रक्ताने गोंदलेले आहे. धर्म ही अफूची गोळी घेवून बेताल झालेल्या राजकारण्यांवर टीका करणारे लेखन या पाक्षिकाने निडरपणाने केले आहे. देशात निरंतर आणीबाणी उभी करणारे आताचे सरकार सत्तेत आल्यापासून या सरकारपुढे मोठमोठे पत्रकार गुढघे टेकत आहेत. तिथे हे पाक्षिक संविधानाच्या धारदार हत्याराने टीकेचे घाव घालून बांधिलकी हा शब्द खऱ्या अर्थाने उजागर करत आहे. ‘द पीपल्स पोस्ट’ची नाळ समाजाशी जोडलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत पाक्षिकाने समाजातील दलित, पीडित, शोषित, आदिवासी, स्त्रिया या सर्वांच्याच जगण्याचे भीषण वास्तव, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचार लोकांपुढे ठेवलेले आहेत. या पाक्षिकाने केवळ वास्तवाचे चित्रच रेखाटले नाही, तर त्यावर उपाय आणि पर्यायही सुचवले आहेत. ‘द पीपल्स पोस्ट’च्या २९ ऑगस्ट २०१८ च्या पहिल्या अंकापासूनच फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचे मोठमोठे अभ्यासक, विचारवंत, लेखक, कवी, चित्रकार आणि हास्यचित्रकार यांनी ‘द पीपल्स पोस्ट’चा दीपस्तंभ आपल्या प्रतिभेने दैदिप्यमान केला आहे. या पाक्षिकाचा वाचकही सुजाण, बहुश्रुत आणि चिकित्सक आहे. अर्थात, असे बेधडक पाक्षिक सांभाळणे हे काम सोपे नाही. साहित्याच्या निवडीपासून वैचारीकदृष्ट्या मागासलेल्या वाचकांना तोंड देण्यापर्यंतच्या सर्व भूमिका अगदी कोर्ट कचेरीसुद्धा संपादकाला बोटीच्या कप्तानासारखी सांभाळावी लागते. ‘द पीपल्स पोस्ट’चे संपादक चेतन शिंदे हे गेली ४ वर्षे अशी जिकिरीची कामे करत पाक्षिकाचं जहाज अत्यंत निष्ठेने सांभाळत आहेत. त्यांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या निष्ठेला मनापासून सलाम आणि या जहाजाच्या पदराला खार लावून इंधन पुरवणाऱ्या भीम पुत्रांना त्रिवार वंदन. मला इथे एक गोष्ट अतिशय आनंदाने आणि नम्रपणाने सांगावीशी वाटते, की चिखलदरा, नाशिक येथे या पाक्षिकाच्या निर्मितीचा ठाम निर्णय घेण्यात आला. त्या पहिल्याच सभेला आदरणीय डॉ. रावसाहेब कसबे, उत्तम कांबळे, प्रा. आशालता कांबळे आणि बऱ्याच मान्यवरांसह मीही उपस्थित होते, याचा मला खूप अभिमान वाटतो. ‘द पीपल्स पोस्ट’ला चार वर्षांच्या कामगिरीसाठी खूप खूप धन्यवाद देताना, ऋण व्यक्त करून नतमस्तक होताना, मी मनापासून अपेक्षा करते, की आज ‘द पीपल्स पोस्ट’समोर असलेल्या अतिशय त्रस्त करणाऱ्या विषयांचे लवकरच समूळ उच्चाटन होवो आणि डॉ. बाबासाहेबांनी दूरदृष्टीने पेरलेल्या विकासाच्या अनेक विषयांचा दीपस्तंभ होऊन ‘द पीपल्स पोस्ट’ वंचितांना मार्ग दाखवत राहो. धन्यवाद!

# वंचितांचा चेहरा असलेले ‘द पीपल्स पोस्ट’



**प्रा. तुषार पाटील**
पुणे

सध्या आपला भोवताल हा भ्रामक होत चाललाय. तसेच दिवसेंदिवस दमनकारी व्यवस्थेला पाय फुटत आहेत. सत्तेच्या विरोधकांविरुद्ध कारवायांचे सत्र सध्या जोरदार सुरू आहे. वास्तवावर चादर टाकून अवास्तवाचा गवगवा करत देशभर गोंधळ घालणारा हा काळ आहे. अशा काळात लेखक, विचारवंत, संपादक, प्रकाशक, प्राध्यापक, माध्यमसमूह आदींनी भूमिका घेणे आवश्यक आहे; परंतु सर्व काही दुर्लक्षून जो तो आपापल्या सोयीने जगत आहे. समाजाचा चेहरा असलेली वृत्तपत्रे आणि नियतकालिकांनी तर भूमिका घेतलीच पाहिजे. मात्र आज फार थोडीच नियतकालिके भूमिका घेताना दिसत आहेत. यात फुले-शाहू-आंबेडकरवादी विचारांना आणि एकूणच पुरोगामी चळवळीला वाहिलेल्या ‘द पीपल्स पोस्ट’ या पाक्षिकाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वैचारिकता हे मूळ आशयकेंद्र असलेल्या ‘द पीपल पोस्ट’ला ४ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या ४ वर्षांत सातत्याने महत्त्वपूर्ण विषयांना स्थान देऊन सत्तेला प्रश्न विचारण्याचे काम ‘द पीपल्स पोस्ट’ने केलेच आहे. अच्छे दिन, भटक्या विमुक्त जमातींचे आरक्षण, भारतीय अर्थव्यवस्था, जातीयवाद, समकालीन राजकारण, विधवा प्रथा अशा विविध घटकांना ‘द पीपल्स पोस्ट’ने सातत्याने स्थान दिले आहे. प्रत्येकाच्या संग्रही असावेत असेच सर्व अंक आहेत. नुकताच प्रकाशित झालेला ‘पँथरची पन्नाशी’ हा अंक विशेष उल्लेखनीय ठरला. सुरुवातीच्या अंकांपासूनच वैचारिकतेला केंद्रस्थानी ठेवून ‘द पीपल्स पोस्ट’चा ४ वर्षांपासून शब्दप्रवास सुरु आहे. ‘द पीपल्स पोस्ट’च्या पुढील वाटचालीसाठी भरपूर शुभेच्छा!

# रोहित वेमुला ते इंद्र मेघवाल : विश्वगुरु बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारताची दरिद्रगाथा

**आपली तहान भागवण्यासाठी इंद्र मेघवालसारख्या दलित चिमुकल्याला आपला प्राण गमवावा लागतो, हे ‘आजादी का अमृत महोत्सव’ साजरा करणाऱ्या भारताचे धक्कादायक वास्तव आहे. या देशाला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली; पण या देशात वंचित समाजातील लोकांचे स्वातंत्र्य कुठंय? माठाला स्पर्श केल्याने एका लहान बालकाला आपला जीव गमवावा लागतो. हे कसले स्वातंत्र्य? ही कसली लोकशाही? कोणते लोक, कोणत्या लोकांसाठी आणि कोणत्या लोकांकडून चालवलेली ही शासनपद्धती आहे, जेथे पिण्याच्या पाण्यासाठी आजही दलितांना आपला जीव द्यावा लागत आहे?**



**सुरेश गायकवाड**

१४ ऑगस्टच्या संध्याकाळचे पाच वाजले होते. राजस्थानमधील जालोर जिल्ह्यातील इंद्र मेघवाल नावाच्या दलित चिमुकल्याच्या हत्येचा विरोध करण्यासाठी आयोजिलेल्या आंदोलनात भाग घेण्यासाठी मी निघालो. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दाट आणि हिरवीगार झाडी, झुडपे, गवत; वर स्वच्छ निळे आभाळ आणि दुपारच्या पावसाने तयार झालेल्या गारव्याने जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (जे.एन.यू.) रुंद डांबरी रोडवर मोटारसायकल चालवताना प्रसन्न वाटत होते. रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व मोटारसायकली, ऑटो, कार आणि दिल्ली सरकार संचालित लाल, पिवळ्या आणि हिरव्या रंगाच्या बसेसवर राष्ट्रध्वज दिमाखात फडकत होते. सर्वच बसेसवर आणि काही खाजगी गाड्यांवरदेखील ‘आजादी का अमृत महोत्सव’च्या जाहिराती भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हसऱ्या आणि गोऱ्या चेहऱ्यासहित होत्या. जे.एन.यू.च्या अधिवेशन केंद्र (Convention Centre) जवळ अमृत महोत्सवानिमित्त जे.एन.यू. प्रशासनाने उभा केलेला ७५ फूट उंच आणि विशाल राष्ट्रध्वज हिरव्यागार झाडीमधून एक किलोमीटर अंतरावरूनदेखील दिसत होता. तो उंच आणि विशाल राष्ट्रध्वज जे.एन.यू. परिसरातील आभाळावरून जाणाऱ्या विमानांना गवसणी घालणार की काय असे वाटत होते.



**दलित, वंचित समाजाच्या स्वातंत्र्याचा ते वाटा मागत होते**

मी हे सर्व बघत पुढे गेलो आणि थोड्याच वेळात आंदोलन स्थळी पोहोचलो जेथे एका बाजूला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विद्यार्थी शाखा ‘अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे’ (ABVP) विद्यार्थी राष्ट्रभक्तिपर गीते गात, अधूनमधून वंदे मातरम्‌च्या घोषणा देत, येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना लहान राष्ट्रध्वज वाटत होते, तर दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्षाची विद्यार्थी शाखा नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (NSUI) चे विद्यार्थी माईकवरून देशभक्तिपर

गाणी गात नाचत होते. त्यांच्या पाठीमागे भारताचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांचा हातात राष्ट्रध्वज घेऊन उभा असलेला मोठा फोटो लावलेला होता. एबीव्हीपी आणि एनएसयूआय या दोन्ही गटांचे विद्यार्थी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जल्लोषात साजरा करत होते. ते सगळे राष्ट्रध्वज हातात धरून आनंदाने गात होते, नाचत होते. सगळ्यात मोठा देशभक्त कोण याची जणू काही त्या दोन गटांमध्ये स्पर्धाच लागली होती; परंतु त्याचठिकाणी बिरसा आंबेडकर फुले स्टुडंट असोसिएशन (बापसा)च्या नेतृत्वाखाली अनेक दलित विद्यार्थी गोळा झाले होते. या तिसऱ्या गटात कोणीही आनंदी दिसत नव्हते. कुणाच्याही हातात राष्ट्रध्वज नव्हता. त्यांच्या हातात फुले-आंबेडकरांचे जातिअंताचे विचार लिहिलेले फलक होते. काही विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर राग होता, तर काही दुःखी दिसत होते. ७५ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राजस्थानमधील आपल्या दलित चिमुकल्या भावाच्या हत्येचा निषेध करण्यासाठी ते विद्यार्थी गोळा झाले होते. फुले-शाहू-आंबेडकरांचा जयघोष करत हत्याऱ्या शिक्षकाचा आणि राजस्थान सरकारचा प्रतीकात्मक पुतळा पेटवून देण्यासाठी ते एकत्र जमले होते. एका बाजूला एबीव्हीपी आणि एनएसयूआयचे विद्यार्थी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आनंदाने नाचत-गात साजरा करत होते, तर दुसऱ्या बाजूला दलित विद्यार्थी इंद्र मेघवाल या चिमुकल्याच्या हत्येचा निषेध करत आपल्या भाषणांमधून कोणा-कोणाला स्वातंत्र्य मिळाले आणि कोणाला किती स्वातंत्र्य मिळाले याचा हिशोब करत होते. दलित आणि वंचित समाजाच्या स्वातंत्र्याचा ते वाटा मागत होते.

**दलित समाज आजही सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यापासून वंचितच**

आंदोलन स्थळाच चित्र बघून मला भारताच्या शेवटच्या संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाची आठवण झाली. डॉ. आंबेडकरांनी अधोरेखित केलेली समस्या मला ७५ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येलादेखील जशास तशी स्पष्टपणे दिसत होती. डॉ. आंबेडकरांनी जातीय हिंसाचार, भेदभाव आणि दलितांना बहिष्कृत करण्याबद्दल आपली भीती व्यक्त केली होती. ते म्हणाले होते, २६ जानेवारी १९५० रोजी आपण विरोधाभासाच्या जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकारणात आपल्याला समानता असेल आणि सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता असेल. राजकारणात आपण एक माणूस एक मत आणि एक मत एक मूल्य हे तत्त्व ओळखणार/स्वीकारत आहोत. मात्र आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात, आपण आपल्या सामाजिक आणि आर्थिक रचनेच्या कारणास्तव, एक माणूस एक मूल्य हे तत्त्व नाकारत राहू. हे विरोधाभासाचे जीवन किती दिवस जगायचे? किती काळ आपण आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात समानता नाकारत राहणार?... हा विरोधाभास किती वर्षे चालणार अजून? दलित आणि वंचित समाजातील लोक कलेक्टर, डॉक्टर, प्राध्यापक, आमदार, खासदार, मंत्री आणि राष्ट्रपतीदेखील होत आहेत. एकापाठोपाठ एक वंचित समाजातील रामनाथ कोविंद आणि द्रौपदी मुर्मू हे दोघेही या देशाचे राष्ट्रपती झाले; परंतु ७५ वर्षे उलटूनदेखील दलित आणि वंचित समाज आजही बाबासाहेबांनी अधोरेखित केलेल्याप्रमाणे सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यापासून वंचितच आहे. हे अजून असेच किती आपण खपवून घेणार?

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेकरे आजही तहानलेलीच**

४ ऑगस्ट १९२३ रोजी, मुंबई विधान परिषदेने शिफारस केली, की अस्पृश्य वर्गांना सर्व सार्वजनिक पाणी पिण्याची ठिकाणे, विहिरी आणि धर्मशाळा, तसेच सार्वजनिक शाळा, न्यायालये, कार्यालये आणि दवाखाने वापरण्याची परवानगी द्यावी, ज्यांची बांधणी आणि देखभाल सरकारद्वारे नियुक्त केलेल्या किंवा कायद्याद्वारे तयार केलेल्या संस्थांद्वारे केली जाते. जानेवारी १९२४ मध्ये मुंबई प्रांताचा भाग असलेल्या महाडने या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या नगर परिषदेत ठरावही पारित केला; परंतु सवर्ण हिंदूंच्या विरोधामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. या ठरावानंतर तीन वर्षांनी डॉ. आंबेडकरांनी १९ मार्च १९२७ रोजी अस्पृश्य समाजातील हजारो सत्याग्रहींसह सध्याच्या महाराष्ट्रातील रायगड




जिल्ह्यातील महाड येथील सार्वजनिक चवदार तलावाच्या पाण्यावर आपला हक्क बजावण्यासाठी मोर्चा काढला. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील अस्पृश्यांचा सत्याग्रह उच्चवर्णीयांना सहन झाला नाही. त्यांनी सत्याग्रहींवर जोरदार हल्ला चढवला आणि लाठ्या-काठ्यांनी मारहाण केली. स्वातंत्र्यानंतर चवदार तळ्यावर बाबासाहेबांचा पुतळा उभा करण्यात आला आणि ज्या पाण्याला स्पर्श करण्याची मुभा अस्पृश्यांना नव्हती, ते पाणी आज आंबेडकरांच्या पायाखाली आहे. ही एक मोठी क्रांती आहे; परंतु आजही या देशातील अनेक ठिकाणी दलितांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्यास मुभा नाही. आजही डॉ. बाबासाहेबांची लेकरे देशाच्या अनेक भागांत तहानलेली आहेत. आजही आपली तहान भागवण्यासाठी इंद्र मेघवालसारख्या दलित चिमुकल्याला आपला प्राण गमवावा लागतो हे 'आजादी का अमृत महोत्सव' साजरा करणाऱ्या भारताचे धक्कादायक वास्तव आहे. या देशाला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली; पण या देशात वंचित समाजातील लोकांचे स्वातंत्र्य कुठंय? माठाला स्पर्श केल्याने एका लहान बालकाला आपला जीव गमवावा लागतो. हे

कसले स्वातंत्र्य? ही कसली लोकशाही? कोणते लोक, कोणत्या लोकांसाठी आणि कोणत्या लोकांकडून चालवलेली ही शासन पद्धती आहे, जेथे पिण्याच्या पाण्यासाठी आजही दलितांना आपला जीव द्यावा लागत आहे?

**हे प्रगतिशील समाजाचे लक्षण नाही**

पाण्याच्या माठाला शिवला म्हणून ९ वर्षे वयाचा बालक आपला प्राण गमावतो, तरीसुद्धा इथला समाज जातिव्यवस्थेविरुद्ध बंड न करता थंड पडला आहे. हे मागास समाजाचे लक्षण आहे. या थंडपणाला इंग्रजीत नॉर्मलायाजेशन (Normalization) म्हणतात. ब्राह्मणी व्यवस्थेचे प्रभुत्व शाबूत ठेवण्यासाठी नॉर्मलायाजेशन मोठी भूमिका बजावते. यामुळे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची गरजच वाटत नाही. नॉर्मलायजेशन अन्यायाविरुद्ध लढायची इच्छा मारून टाकते. अमेरिकेत जॉर्ज फ्लॉइड या कृष्णवर्णीय नागरिकाची हत्या एका श्वेतवर्णीय पोलीस अधिकाऱ्याकडून करण्यात आली. तेव्हा संपूर्ण अमेरिकेत आंदोलनाचा उद्रेक झाला. प्रगतिशील आणि उदारमतवादी श्वेतवर्णीय लोकसुद्धा कृष्णवर्णीय लोकांसोबत रस्त्यावर उतरले. इतकेच काय, तर भारतातील उच्चवर्णीय आणि बॉलीवूड कलाकारांनीदेखील जॉर्ज फ्लॉइडच्या हत्येचा निषेध केला; परंतु जातिगत भेदभाव आणि अत्याचारावर मात्र या देशातील सवर्ण जातीतील लोक मूग गिळून बसतात. दलित आणि वंचित समाजातील लोकांची हत्या ही एक सामान्य बाब आहे त्यांच्यासाठी. मुख्यमंत्र्यांनीसुद्धा त्याकडे सामान्य गोष्ट म्हणून पाहणे, हे प्रगतिशील समाजाचे लक्षण नाही.

**केवळ ते एका विशिष्ट जातीत जन्माला आले म्हणून...**

रोहित वेमुला या दलित तरुणाची संस्थानिक हत्या झाली तेव्हा मोदी सरकारविरुद्ध देशभर आंदोलने झाली. मात्र पाच वर्षे होऊनदेखील रोहित वेमुलाच्या परिवार आणि मित्रांना अजूनही न्याय मिळालेला नाही. शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव आणि अत्याचाराला आळा बसावा म्हणून 'Rohith Act' हा कायदा करावा, ही मागणी आजही बेदखल आहे. म्हणूनच रोहितनंतरदेखील अनेक दलित तरुणांच्या हत्या या देशातील शैक्षणिक संसाधनामध्ये झाल्या आणि होत आहेत. हत्या रोखण्यास या देशातील सरकारे सपशेल अपयशी ठरत आहेत. रोहितनंतर डेल्टा मेघवाल, पायल तडवी, अनिता अशा अनेक तरुणांना जातीय भेदभाव आणि अत्याचारामुळे आपला जीव गमवावा लागला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संसदेमध्ये दिलेल्या माहितीनुसार देशातील आयआयटी, एनआयटी अशा केंद्रीय संस्थांमध्ये दलित आणि वंचित समुदायातील ६८ विद्यार्थ्यांनी २०१४-२०२१ दरम्यान आपला जीव गमावला. या लांबलचक यादीत आता ९ वर्षे वयाच्या चिमुकल्या इंद्र कुमार मेघवालचे नाव जोडले जाईल. रोज या देशात शेकडो दलित आणि वंचित समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्थांमध्ये अत्याचार सहन करावा लागतो. केवळ ते एका विशिष्ट जातीत जन्माला आले म्हणून. केवळ विद्यापीठ, महाविद्यालये आणि शाळा नाही, तर बालवाडी आणि अंगणवाडीसारख्या ठिकाणीदेखील जातीयवाद माजलेला आहे. मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यात उत्तराखंड राज्यातील एका अंगणवाडी आणि शाळेत सुनीता देवी या दलित स्वयंपाकी



महिलेने बनवलेले जेवण जेवण्यास सवर्ण जातीतील मुलांनी नकार दिला. इतकेच नव्हे, तर सवर्ण मुले तिने शिजवलेले अन्न खात नाहीत म्हणून प्रशासनाने सुनीता देवीलाच नोकरीहून काढून टाकले. देशातील वेगवेगळ्या राज्यांतून अशा बातम्या नेहमी येत असतात. आठ-दहा वर्षांखालील लहान मुला-मुलींना दलित महिलांनी शिजवलेल्या अन्नावर बहिष्कार करण्यास कोण सांगत असेल? एवढ्या लहान मुलांमध्ये दलित आणि वंचित जातीतील लोकांविरुद्ध विष कोण पेरत असेल? किती भयंकर आहे हे सगळे!

**...तर कुठे जात आहे आपला देश?**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली असे म्हणतात; परंतु दलित आणि वंचित जातीतील लोकांना माणूस म्हणून जगण्याचे, खाण्याचे, पिण्याचे, मुक्तपणे बागडण्याचे स्वातंत्र्य कधी मिळणार? आधी खेडो-पाडी, वस्त्यांवर आणि झोपडपट्ट्यांत दलितांच्या हत्या होत. आता शिक्षण संस्था जातीय अत्याचाराची नवी केंद्रे बनली आहेत. हे असेच अजून किती वर्षे चालणार? ही भारतभूमी दलितांच्या रक्ताने कधी तृप्त होणार? अजून किती दलित आणि वंचितांचे मुडदे पडणार? 'मुले ही देवाघरची फुले' असतात, असा धिंडोरा पिटवणाऱ्या या सुसंस्कृत समाजात दलित आणि वंचित जातीतून येणारी मुले देवाघरची फुले कधी होणार? ९ वर्षे वयाच्या बालकाने पाण्याच्या माठाला स्पर्श केला म्हणून त्याचा जीव जाईल इतपत मारणे हा कसला जातीय अभिमान? हा कसला राक्षशी क्रूरपणा? आमची लहान चिमुकले आणि तरुण-तरुणींना असे निडरपणे शिक्षण संस्थांमध्ये जिवे मारत असाल, तर कुठल्या आणि कसल्या स्वातंत्र्याचा उत्सव आम्ही साजरी करायचा? विश्वगुरू बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देशातील शिक्षण संस्थामध्ये अशा प्रकारची जातीय मानसिकता असेल, तर कुठे जात आहे आपला देश? चिमुकल्यांच्या हत्या करणारे जातीयवादी मानसिकतेचे शिक्षक या देशात असतील, तर हा देश विश्वगुरू कसा बनेल? शिक्षण संस्थांना दलित आणि वंचितांच्या हत्येची केंद्रे बनवून हा देश विश्वगुरू होणार आहे का? जातीयवादमुळे हा देश कदापि विश्वगुरू बनणार नाही. हा जातियवाद असाच माजत राहिला, तर हा देश दरिद्री बनल्याशिवाय राहणार नाही. •••

**(लेखक जेएनयूमध्ये संशोधक विद्यार्थी आहेत.)**

# “लोकासांगे ब्रह्मज्ञान”

**केंद्र सरकारच्या संमतीशिवाय बिल्किस बानो प्रकरणातील ११ गुन्हेगारांची सुटका शक्यच नव्हती. गुन्हेगारांना सोडण्यासाठी गुजरात सरकारने नेमलेल्या समितीत भाजपचे दोन नेते होते, हे आता प्रकाशात आले आहे. यावरून, देशाने काय समजायचे? पंतप्रधानांची महिलांविषयक व्यथा खोटी होती, की ती केवळ हिंदू महिलांपुरती मर्यादित होती व आहे?**



**विजय नाईक**

मराठीमध्ये म्हण आहे, ‘लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण.’ उदाहरण पाहा. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याहून देशाला तब्बल एक तास बावीस मिनिटे संबोधन केले. गेल्या ७५ वर्षांचा आढावा घेतला व ‘‘येत्या २५ वर्षांत देशाला विकसित देश बनायचे आहे, हे उद्दिष्ट समोर ठेवावे लागेल,’’ असे ते म्हणाले. देशाच्या विकासात महिलांचा मोठा भाग आहे, असे सूचित करताना एके ठिकाणी ते म्हणाले, ‘‘हम नारी को नारायणी कहते हैं.’’ मनाची व्यथा व्यक्त करताना ते म्हणाले, ‘‘लाल किले की प्राचीरसे मैं अपना एक स्थायी दर्द भी साझा करना चाहता हूं. ये अपना दर्द बया करनेसे खुद को रोक नहीं पाता हूं. मुझे इस बात का ध्यान हैं, के यह लाल किले के मंच अनुरूप नहीं हो सकता है, लेकिन मैं देशवासियों के सामने अपनी गहरी पीड़ा व्यक्त करुंगा. मैं देशवासियों के सामने नहीं खुलुंगा, तो आखीर कहां कहूं? मैं जो साझा कर रहा हूं वह यह हैं, के अपने दैनिक बोलने और व्यवहार में विकृती देखी हैं. हम लपरवाहीसे ऐसी भाषा और शब्दोंका प्रयोग करते हैं, जो महिलाओं का अपमान करते हैं. क्या हम अपनी व्यवहार संस्कृती और रोज मर्रा की जिंदगी में महिलाओं को अपमानित करनेवाली हर चीज से छुटकारा पाने की प्रतिज्ञा नहीं कर सकते? देश के सपनों को पूरा करने में महिलाओं का गौरव बहुत बड़ी संपत्ती बनने जा रहा हैं. मैं इस शक्ती को देखना चाहता हूं, और इसलिये मैं इस पर अड़िग हूं.’’



यातील महिलांविषयीचे गौरवोद्‌गार व त्याचबरोबर त्यांचे एक वाक्य महत्त्वाचे आहे. ते म्हणजे, ‘अपने दैनिक बोलने और व्यवहार में विकृती देखी हैं.’ त्यांच्या या वाक्याचा पुरावा त्याच दिवशी गुजरात सरकारने दिला.

**पंतप्रधानांची महिलांविषयक व्यथा खोटी होती!**

भाजपच्या नेतृत्वाखालील गुजरात सरकारने बिल्किस बानोच्या अकरा बलात्कारी व खुनी गुन्हेगारांना गोध्राच्या तुरुंगातून सोडल्याचे वृत्त आले अन् देश सुन्न झाला. २००२ मध्ये गोध्रातील घटनेनंतर गुजरातमध्ये झालेल्या दंग्यांदरम्यान या अकरा जाणांनी २१ वर्षांच्या बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार केला होता. तेव्हा ती पाच महिन्यांची गर्भवती होती. तिच्या मुलीसह तिच्या कुटुंबातील सात जणांची हत्या त्यांनी केली होती. केंद्र सरकारच्या संमतीशिवाय त्यांची सुटका शक्यच नव्हती. गुन्हेगारांना सोडण्यासाठी गुजरात सरकारने नेमलेल्या समितीत भाजपचे दोन नेते होते, हे आता प्रकाशात आले आहे. यावरून, देशाने काय समजायचे? पंतप्रधानांची महिलांविषयक व्यथा खोटी होती, की ती केवळ हिंदू महिलांपुरती मर्यादित होती व आहे? स्वातंत्र्यदिनी त्या गुन्हेगारांना गुजरात सरकार सोडणार आहे, याची कल्पना केंद्राला नव्हती, हे कुणालाही पटणारे नाही. बलात्कारी खुन्यांना सोडल्यानंतर ते मिठाई खात आहेत, हार घालून त्यांचे स्व-ागत केले जात आहे, याचे चित्रण केलेल्या व्हिडीओंनी सत्ताधाऱ्यांचे मन किती विकृत झाले आहे, हे देशापुढे आले. धर्म आणि जातीच्या नावाखाली निर्घृण गुन्हे करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे भय उरलेले नाही. म्हणूनच गेल्या आठ वर्षांत सामाजिक समरसतेला जबरदस्त धक्का देणाऱ्या घटना नित्याने घडत आहेत. द्वेषमूलक वक्तव्य व घातक कृत्ये करणारे मोकाट सुटले आहेत. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना या विषाची पेरणी थांबविणारे

कुणी उरले आहे काय?

**सामाजिक तणावाचे वातावरण निर्माण करण्यास खतपाणी**

बिल्किस बानोचे कुटुंब भयभीत झाले आहे. २१ जानेवारी २००८ रोजी सीबीआयच्या खास न्यायालयाने तेरा जणांना गुन्ह्यासाठी जबाबदार धरून त्यापैकी वरील अकरा जणांना आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली होती. राज्य सरकारने त्यावर कार्यवाही करावी, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. तथापि, गुन्हेगारांना सोडल्याने बिल्किस बानोच्या कुटुंबाला धाकदपटशा करण्यासाठी त्यांना आता एक प्रकारे मुभा मिळाली आहे. बिल्किस बानोला पन्नास लाख रुपयांचा मोबदला देण्यात आला. तिचं जीवन नुकतेच सुरळीत होऊ पाहत होते. तेवढ्यात बलात्कारी खुन्यांची सुटका झाल्याने त्यांना आता चेव येणार, हे निश्चित. सामाजिक तणावाचे वातावरण निर्माण करण्यास खतपाणी मिळाले आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते काँग्रेसवर मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्याचा आरोप करतात, तसेच भाजपवर हिंदूंचे तुष्टीकरण, त्यांचे लांगुलचालन करण्याचा आरोप केल्यास त्यात गैर काय असेल?

**त्यांना कुणी वाली उरलेला नाही!**

गुन्हेगारांना सोडण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले, त्याचदिवशी 'द टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये प्रसिद्ध झालेले व्यंगचित्र बरेच काही सांगून जाते. स्वर्गातून ढगांच्या आड उभी राहून खाली पाहत निर्भया म्हणते आहे, 'हे कोणत्या देशात घडले आहे?' निर्भयाचा सामूहिक बलात्कार व त्यानंतर झालेल्या कठोर कायद्यानंतर परिस्थिती सुधारण्याऐवजी वेगाने चिघळत चालली आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्थेच्या २०१९ मधील आकडेवारीनुसार, त्यावर्षी देशात ३२,०३३ बलात्कारांची नोंद झाली. म्हणजे दिवसाकाठी ८८ बलात्कार होत आहेत, यावरून या गुन्ह्यांची गंभीरता ध्यानी यावी. राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, हरयाणा, छत्तीसगढ आदी राज्यांत लैंगिक गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. बिल्किस बानोचा बलात्कार व तिच्या कुटुंबातील सात जणांचे खून, याला हिंदू विरुद्ध मुस्लीम हा रंग तर आहेच; परंतु मुस्लिमांबरोबर दलितांवरही अशाच प्रकारचे अत्याचार रोज होत आहेत. त्यांना कुणी वाली उरलेला नाही. उत्तर प्रदेशातील उन्नाव येथे ४ जून १०१७ रोजी १७ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करणारा भाजपचा आमदार कुलदीपसिंग सेंगार याला २० डिसेंबर, २०१९ रोजी आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. सेंगारने त्या मुलीच्या वडिलांचाही खून केला.

जम्मू-काश्मीरमधील रसना गावातील (कथुआ) येथे ८ वर्षांच्या असिफा बानो या मुलीवर जानेवारी २०१८ रोजी आठ हिंदूंनी बलात्कार केला. त्यांच्या अटकेविरुद्ध तेथील पँथर पक्षाने निदर्शने केली. गुन्हेगारांना पाठिंबा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या निदर्शनात भाजपच्या दोन मंत्र्यांनी भाग घेतला होता. नंतर दोघांनीही राजीनामा दिला. या घटनेची देशात व देशाबाहेर बरीच चर्चा झाली. खुद्द पंतप्रधान मोदी, सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रसंघाचे महासरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी घटनेचा निषेध केला. १० जून २०१९ रोजी सातपैकी सहा जणांवर गुन्हा कायम करून त्यांना २५ वर्षांची जन्मठेप ठोठवण्यात आली.

ही तीन उदाहरणे दर्शवितात, की 'सत्तातुराणं न भयं न चिंता.' याचे ताजे उदाहरण म्हणजे, राजस्थानमधील भाजपचे माजी आमदार ग्यानदेव आहुजा यांनी २० ऑगस्ट रोजी लिंचिंगबाबात केलेले जाहीर विधान. ते म्हणाले, ''आजवर पाच लोकांना ठार मारले आहे. लालवंडीमध्ये एकाला, छाए बेहोमध्ये दुसऱ्याला असे पाच मारले.'' पुढे ते म्हणाले, ''मैंने खुल्लम खुल्ला छूट दे रखी है कार्यकर्ताओं को, मारो... को. जे आदेशाचे पालन करतील, त्यांना जामीन मिळवून देऊन आम्ही सुटकादेखील करून देऊ.'' आहुजा यांच्याविरुद्ध या वक्तव्याबद्दल गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यातून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते, की भाजपचे नेते व कार्यकर्ते निर्ढावलेले असून, त्यांना अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळत आहे. गेल्या आठ वर्षांत ज्या-ज्या वेळी अशा घटना घडत गेल्या, तेव्हा मोदी व शहा यांनी त्यांना वेळीच समज दिली नाही, की रोखले नाही.



***ही अत्यंत लांछनात्मक बाब...***

दलितांवर होणाऱ्या अत्याचारांवर 'नॅशनल कॉन्फेडरेशन ऑफ दलित अँड आदिवासी ऑर्गनायझेशन्स' या संघटनेचे अध्यक्ष अशोक भारती यांनी १८ ऑगस्ट रोजी 'द इंडियन एक्स्प्रेस'मध्ये लिहिलेल्या लेखात प्रकाश टाकलाय. ते म्हणतात, की ४ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबईच्या विधिमंडळाने शिफारस केली होती, की विहिरी, धर्मशाळा, सरकारी शाळा, न्यायालये, कार्यालये व दवाखाने, ज्यांचे अस्तित्व सार्वजनिक निधिवर अवलंबून असते, तेथे अस्पृश्यांना मुक्त प्रवेश मिळाला पाहिजे. त्यानंतर १९ मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो सत्याग्रहींना घेऊन महाडच्या चवदार तळ्याकडे जाऊन निदर्शने केली होती. त्यांच्यावर उच्चवर्णीयांनी हल्ला केला होता. भारती म्हणतात, की तसे हल्ले देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षातही होत आहेत. राजस्थानमधील जालोर येथे इंद्रा मेघवाल या अवघ्या नऊ वर्षांच्या दलित मुलाला झालेल्या बेदम मारहाणीमुळे

त्याला जीव गमवावा लागला, ही अत्यंत लांछनात्मक बाब होय.

**हा कातडी बचावण्याचा प्रकार होय?**

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्थेनुसार, (एनसीआरबी) ''१९९१ ते २०२० दरम्यान दलितांवर झालेल्या अत्याचारांची संख्या ७ लाख एवढी प्रचंड असून, त्यात दलित महिलांवर ३८ हजार बलात्कार झाले. गेल्या पाच वर्षांत दलितांविरुद्ध एका तासाला पाच अत्याचार होत आहेत.'' त्यावर अनेक वेळा प्रकाशझोत टाकूनही अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही व 'आंबेडकर आमचे' 'आंबेडकर आमचे,' असे भजन करणाऱ्या सरकारने त्याविरुद्ध कठोर पावले टाकलेली नाहीत. उलट, वर्ण व जातीयव्यवस्थेला खतपाणी घालणाऱ्या मनुस्मृतीचा जाहीर पुनरुच्चार केला जात आहे. अशा मनःस्थितीत देश २०४७ पर्यंत विकसित होणार कसा? मोदी सब का साथ सब का विकास म्हणतात, तो नेमका कुणाचा, हा प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. 'द पीपल्स पोस्ट'च्या १६ ते ३१ जुलैच्या अंकात ''मनुची प्राणप्रतिष्ठा करणारे मुक्त विद्यापीठ बंदच करा'' या मथळ्याखालील संपादकीयात 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील' जातीयवाद भक्कम करणाऱ्या मनुस्मृतीचा कसा शिरकाव झाला, यावर जोरदार प्रकाशझोत टाकला आहे. मनुस्मृतीचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वांविरुद्ध जनमत जागृत करण्याची गरज आहे. आपली पुराणमतवादी विचारसरणी हळूहळू अभ्यासक्रमात प्रवेश करते आहे. त्याबाबत समाजाने जागरूकता दाखवायला हवी. कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाला मदरशाचे स्वरूप येण्यापासून रोखले पाहिजे. याचदृष्टीने हिंदी व मातृभाषेचा अभिमान बाळगत विकसित राष्ट्र व्हावयाचे असेल, तर इंग्रजी भाषेचा तितकाच कसून अभ्यास व्हावयास हवा. मनुस्मृतीच्या शिक्षणाबाबत यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील प्रशासकांनी जशी 'नरो वा कुंजरोवा'ची भूमिका घेतलेली दिसते, तसेच दुसरीकडे बिल्किस बानोच्या गुन्हेगारांना सोडण्याविषयी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगात होणाऱ्या संभाव्य विचारविनिमयाबाबत त्यातील सारे सदस्य मूग गिळून गप्प बसलेत. काही ना काही कारण सांगून त्याबाबत बोलण्याचे ते टाळत आहेत. 'बोललो तर सदस्यत्व धोक्यात येईल,' याची चिंता त्यांना वाटते, हा कातडी बचावण्याचा प्रकार होय.

भाजपने २०२० मध्ये तामिळनाडूतील विदुथलाय चिरुथैगल काची (व्हीसीके लिबरेशन पँथर्स) पक्षाचे प्रमुख थोल थिरुमवलवम यांच्यावर महिलांविरोधी भाषण केल्यावरून जोरदार टीका केली होती; परंतु भाजपच्या हे ध्यानात आले नाही, की ज्या मनुस्मृतीबाबत त्यांना नितांत आदर आहे, त्या महिलांना निकृष्ट मानणाऱ्या मनुस्मृतीबाबत ते बोलत होते. मनुस्मृतीवर बंदी आणावी, यासाठी व्हीसीके पक्षाने निदर्शने केली.

**देवांच्या जाती कोणत्या यावर वाद?**

आता देवांच्या जाती कोणत्या, यावर वाद सुरू झालाय, तो जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या नव्या उपकुलगुरू श्रीमती शांतिश्री धुलिपदी पंडित यांनी केलेल्या वक्तव्यावरून. एका समारंभात त्या म्हणाल्या, ''कोणताही ईश्वर ब्राह्मण नाही. शंकर (महादेव), तर अनुसूचित जाती जमातीचे असावेत. कारण ते एका सापाबरोबर स्मशानात बसलेले असतात.'' ''मनुस्मृतीत महिलांना दिलेले स्थान हे शूद्रवत असल्याने, ती प्रतिगामी आहे. देव हे उच्च जातींचे नाहीत,'' असे विधान त्यांनी केले. त्यावर बरेच चर्वितचर्वण होईल. अलीकडे कृष्णाष्टमी झाली; परंतु कृष्ण हा गवळी व यादव समाजाचा होता, असे मानले जाते. लाखो योनी व कोट्यवधी देवांच्या या देशात उपकुलगुरूंसारखे विचारवंत जातीपातीचा विचार करू लागले, तर पंतप्रधान मोदी म्हणतात, तसे जय अनुसंधान (इनोव्हेशन) कसे होणार? लाल किल्ल्यावरून बोलताना ते म्हणाले होते, 'जय जवान, जय किसान' हा शास्त्रीजींचा मंत्र होता, अटल बिहारी वाजपेयी 'जय विज्ञान' म्हणाले होते. आता जय अनुसंधान म्हणायला हवे. आता आपण ५ जी, ऑप्टिकल फायबर, डिजिटल इंडियाबाबत बोलत आहोत. डिजिटल इंडियाबाबत माझे एक स्वप्न आहे. गावागावांत ते साकार झाले पाहिजे. शिक्षणात आमूलाग्र क्रांती होणार असून,




डिजिटल युग अवतरणार आहे. हे दशक तंत्रज्ञानाचे आहे.


एकीकडे मोदी यांचा हा आधुनिक विचार व दुसरीकडे त्यांच्या अनुयायांची देशाला गर्तेत लोटण्याची चाललेली बुरसट विचारांची चढाओढ यांची सांगड त्यांनाच घालावी लागेल. आवरही त्यांनाच घालावा लागेल. त्याचबरोबर, 'सरकारकडून आपल्याला न्याय मिळतो,' ही भावना जनतेत रुजवावी लागेल. उलट, दिल्लीचे महसूलमंत्री म्हणतात, ''मोदी यांचा विचार एकाच दिशेने जातोय, की उद्या कोणत्या विरोधी पक्षनेत्याला सीबीआयच्या जाळ्यात अडकावयाचे; अथवा एनफोर्समेन्ट डायरेक्टोरेटची कारवाई कुणावर करावयाची.''

विरोधकांना पूर्णपणे नष्ट; अथवा नेस्तनाबूत न करता, 'सब का साथ' या न्यायाने निदान महत्त्वाच्या राष्ट्रीय समस्यांबाबत सर्वपक्षीय सहमती करण्यासाठी मोदी यांनी उदार मनाने पाऊल टाकले, तर विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास साह्य मिळेल. सार्वत्रिक निवडणुका दीड वर्षावर येऊन ठेपल्या आहेत. दोन सैन्ये एकमेकांविरुद्ध उभी राहावीत, तसे सत्तारूढ व विरोधक वेगवेगळ्या पवित्र्यात उभे आहेत. अशा स्थितीत ते साध्य होणार का, हा यक्षप्रश्न अनुत्तरित राहिला आहे. ●●●

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# ‘अशी जिंकली ओबीसी राजकीय आरक्षणाची लढाई’

**महाराष्ट्र विधानसभेत ओबीसी जनगणनेचा ठराव २८८ आमदारांनी एकमताने मंजूर केलेला आहे. शेकडो परिषदा, आंदोलने, संस्था, संघटना ओबीसी जनगणनेचा आग्रह धरीत आहेत. जोवर ओबीसी जनगणना नाही, तोवर या मागास समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी मिळणार नाही. धोरणे आणि योजना बनणार नाहीत. ज्या देशात कोंबड्या, बकऱ्या, मेंढरे, गायी, म्हशी यांची गणना होते, तिथे ओबीसींची गणना होऊ नये?**



**प्रा. हरी नरके**

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंबंधी गेले अनेक दिवस वेगवेगळ्या चर्चा सुरू होत्या. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंबंधी दिलेल्या निकालाने ओबीसी आरक्षण शाबूत राहिले आहे. याचे श्रेय घेणाऱ्यांमध्ये स्पर्धा सुरू आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाविषयी जनजागरण करण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने महाराष्ट्रभर प्रबोधन शिबिरे आयोजित केली होती. या शिबिरांतून ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे, प्रा. हरी नरके, रावसाहेब कसबे यांनी ओबीसी समाजाला त्याच्या हक्कांची जाणीव व जागृतीसाठी केली. या शिबिरातून ओबीसी समाज हा ‘निर्मिक’, निर्माण करणारा असल्याने राष्ट्रनिर्मितीचा कणा आहे. देशाच्या नैसर्गिक, निर्मित मालमत्तेत सर्वांना समान वाटा मिळाला पाहिजे. ओबीसींनी अडाणीच राहावे यासाठी व्यवस्था राबविली जात आहे. या प्रबोधन शिबिरांतून लोक विचार करायला लागतील. प्रश्न विचारतील आणि आपल्या शरीरावर आपला मेंदू असलेले डोके वापरतील. ओबीसींचा सर्वांगीण विकास हा त्यांचा घटनात्मक हक्क आहे. त्यांच्या विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी ओबीसींची जनगणना होणे आवश्यक आहे. त्यांच्या जनगणनेला नकार देणे किंवा जनगणनेची उपलब्ध असलेली आकडेवारी देण्यास नकार देणे ही कृती घटनाविरोधी असल्याचे सांगत यासंबंधी अनेक संदर्भ, पुरावे, दाखले समोर ठेवत निर्भीडपणे मुद्दे देत जनजागृती केली. त्यातून एक चळवळ उभी राहिली. जनतेचा रेटा पाहून सरकारला भूमिका घेणे भाग पडले. प्रा. हरी नरके यांनी या सगळ्या प्रवासात आरक्षण टिकवण्यासाठी महाराष्ट्रभर प्रबोधनपर व्याख्याने देत, मीडियामधून सातत्याने निर्भीडपणे अभ्यासपूर्ण भूमिका मांडत जागल्याची भूमिका पार पाडली.





**ओबीसी राजकीय आरक्षणाच्या श्रेयवादाची धुळवड**

राज्यात श्रेयवादाची धुळवड रंगलेली आहे. आघाडी व युती ही दोन्ही सरकारे आमच्यामुळे ओबीसी आरक्षण मिळाले, असा दावा करीत आहेत. नागरिकांचा मागास वर्ग यांचे पंचायत राज्यातील राजकीय आरक्षण गेले होते. त्यामुळे राज्यात तीव्र असंतोष पसरलेला होता. गेले सव्वावर्ष भटके विमुक्त, इतर मागास वर्गीय, विशेष मागास वर्गीय यांचे हे आरक्षण न्यायालयाने स्थगित केले होते. त्यामुळे इंपिरिकल डेटा शास्त्रीय आधारावर जमवलेली माहिती आणि तीन कसोट्यांचे पालन हे परवलीचे शब्द बनले होते. उद्धव ठाकरे यांच्या आघाडी सरकारने मार्च महिन्यात समर्पित आयोग नेमून हे काम पूर्ण केले. हा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्वीकारला. हे आरक्षण फेरप्रस्थापित झाले. या आरक्षणासह पुढील निवडणुका घेण्याचे आदेश दिले. मिनी विधानसभांमधले आरक्षण

परत मिळाल्याने राज्यात आनंदाचे वातावरण आहे.

हा अहवाल तयार झाला व तो टंकलिखित केला जात असताना शिंदे सरकार आले. त्यानंतर फक्त एकच आठवड्यात तो न्यायालयाला सादर केला गेला; पण आपणच हे आरक्षण दिल्याचे दावे केले गेले. हे म्हणजे नऊ महिन्यांच्या गरोदर महिलेशी लग्न करून एक आठवड्यात मूल जन्माला आले, तर म्हणे मुलाचा पिता मीच. हा निर्माणकर्ता समाज (ओबीसी) व्होटबँक म्हणून सर्वच राजकीय पक्षांना हवाय. म्हणूनच तर आरक्षण आम्हीच दिले अशी जाहिरात सगळे करीत आहेत. यावेळी जे फटाके वाजवीत होते, पेढे भरवून फुगड्या घालत होते, ते या लढाईत नव्हते; पण श्रेय घ्यायला सगळ्यात पुढे.

महाराष्ट्रात हे आरक्षण लागू झाले १९९४ ला. शरद पवार नि छगन भुजबळ यांच्यामुळे. पवार तेव्हा मुख्यमंत्री होते, तर भुजबळ मंत्री. १९९० मध्ये व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोग लागू केला. ७३/७४ वी घटना दुरुस्ती करून पंचायत राज्यातले ओबीसी आरक्षण आणले राजीव गांधी व नरसिंह राव यांनी. संघ परिवाराची भूमिका आरक्षण मुक्त भारताची आहे. न्यायालयाने मागितलेली माहिती राज्यांना देऊन हे आरक्षण वाचवता आले असते. Secc २०११ ची आकडेवारी जमा करण्यासाठी देशाचे ५ हजार कोटी रुपये खर्च झालेत. ओबीसींना आपली खरी लोकसंख्या कळू नये म्हणून ही झाकपाक. ओबीसींची खरी संख्या कळाली तर विकासासाठी निधी द्यावा लागेल. शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा या मूलभूत गोष्टींसाठी तरतूद करावी लागेल. म्हणून आजही ओबीसी जनगणनेला श्री. फडणवीस व श्री. मोदी विरोध करताहेत. व्होटबँक तर हवी; पण ओबीसींनी मापात राहायला हवे. जास्त मागण्या करायला नकोत असा बहुतेक राजकीय पक्षांचा व्यवहार आहे.

११ मार्च २०२२ रोजी ठाकरे सरकारने समर्पित आयोग नेमला. अध्यक्षपदासाठी निवृत्त सनदी अधिकारी जयंत कुमार बांठिया यांचे नाव प्रशासनाने सुचवले. महेश झगडे, नरेश गीते, एच.बी. पटेल व दोन संस्था प्रतिनिधी, पंकज कुमार-सदस्य सचिव, असे ७ जण आयोगात होते. आयोगाचे इंपिरिकल डेटा व ट्रिपल टेस्टबाबतचे सर्व संशोधन शिंदे सरकार येण्याआधीच पूर्ण झालेले होते. अहवाल लेखनही पूर्ण होत आलेले होते. नवे सरकार आले तेव्हा टंकलेखन चालू होते. नवीन सरकारने अहवाल न्यायालयात सादर केला. वकिलांना या ७८१ पृष्ठांच्या अहवालाचे ब्रिफिंग करण्यासाठी झगडे हे दिल्लीत तळ देऊन बसले होते. केंद्र सरकारचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांची उपस्थिती महत्त्वाची ठरली. त्याचे श्रेय फडणवीस यांना आहे.

ठाकरे-पवार, शिंदे-फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्या प्रयत्नातून ओबीसींच्या राजकीय आरक्षणाची फेर प्रस्थापना झाली. सर्वांत मोठे योगदान महेश झगडे यांचे आहे. हे आरक्षण लागू झाल्यापासून गेल्या २८ वर्षांत अद्याप शिक्षण, सरकारी नोकऱ्या, धोरण निर्मिती व निर्णयप्रक्रियेत या समूहांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नसल्याचे बांठिया अहवाल सिद्ध करतो.

### बांठिया अहवालातील गंभीर चुका

बांठिया यांनी ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्क्यांवरून थेट २७ ते ३७ टक्क्यांपर्यंत कमी करून दाखवलीय. सर्वपक्षीय ओबीसी नेते व संघटनांचा या सदोष अहवालाला तीव्र विरोध आहे. याचे अनेक गंभीर आणि विपरीत परिणाम होतील. अहवालात पुढील गंभीर चुका आहेत. १) २०११ च्या सामाजिक, आर्थिक, जात जनगणनेतील आकडेवारीच्या आधारे गोखले इन्स्टिट्यूटने ओबीसींची लोकसंख्या राज्यात ४८.६ टक्के दाखवलेली आहे. ही नोंद बांठियांनीच अहवालात केलीय; पण तरीही निष्कर्ष काढताना याकडे डोळेझाक करून २७ ते ३७ टक्के लोकसंख्येचा निष्कर्ष



काढणे ही लबाडी आहे. २) बांठिया अहवालानुसार जिल्हानिहाय ओबीसी लोकसंख्या, भंडारा ७२.४%, बुलडाणा ६२%, चंद्रपूर ५८.३%, धुळे ४९.२%, जळगाव ६१.४%, रत्नागिरी ६६.३%, ठाणे ५६.३%, वर्धा ६३%, वाशिम ६१%, यवतमाळ ५५.९%, भिवंडी मनपा, ५१% आणि इतर अनेक जिल्हे, तरीही अंतिम निष्कर्ष मात्र २७ टक्के हा विसंगत आहे. ही चक्क फसवणूक आहे. ३) बांठिया ओबीसी आणि सामाजिक न्याय यांच्याबद्दल द्वेश बाळगीत असावेत, याचे असंख्य पुरावे या अहवालात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओबीसी प्रश्नांवर स्वतंत्र पुस्तक लिहिले असून, त्यात ओबीसींची लोकसंख्या ५५ टक्के असल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्येक जनगणनेत अनु. जाती-जमाती व इमावची स्वतंत्र नोंद झालीच पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब म्हणतात. बांठिया या पुस्तकातील माहिती दडवण्यासाठी हे पुस्तकच बेदखल करतात. ४) महात्मा फुले यांनी दीडशे वर्षांपूर्वी सामाजिक न्यायासाठी आरक्षण मागितले व अनु. जाती-जमाती, तसेच इमावच्या दु:खांना वाचा फोडली. त्यांनी भटके विमुक्त, बलुतेदार, कुणबी, माळी, आग्री, कोळी, वंजारी, धनगर आदींवर विपुल लेखन केलेले असतानाही बांठिया हे सगळे लेखन दडवतात. जोतीरावांनी या घटकांचा उल्लेखसुद्धा केलेला नाही, असा भास या अहवालात निर्माण करतात. ५) सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती-जमाती व नागरिकांचा मागासवर्ग ना.मा.व. यांना आरक्षण देताना एकत्रितपणे ५०% ची मर्यादा घातलेली आहे. अनेक

जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती-जमातींची संख्या कमी व ना.मा.व.ची लोकसंख्या जास्त आहे. उदा. अकोला, अहमदनगर, अमरावती, धुळे आणि इतर अनेक जिल्हे. तिथे ५०% च्या मर्यादेत राहून ना.मा.व.ना त्यांच्या लोकसंख्येइतके आरक्षण द्यायला न्यायालयाची मान्यता आहे. बांठिया मात्र मुद्दाम कमी आरक्षण देतात. हा अन्याय का? ६) राजकीय पक्ष या यादीत बांठिया चक्क गवळी या एका व्यक्तीला स्वतंत्र स्थान देतात व तशी नोंदही करतात. ७) महाराष्ट्रात देशमुख समितीच्या शिफारशीनुसार १९६७ साली ना.मा.व. आरक्षण सुरू झालेले असताना ते १९६४ ला सुरू झाल्याची चुकीची माहिती बांठिया देतात.

**...तर बांठियांनी ओबीसींची संपूर्ण राजकीय कत्तल केली असती**

एखाद्या स्मरणिकेत द्यावेत तसे बांठियांनी पान पानभर स्वत:चे फोटो या शासकीय अहवालात छापलेत. कळस म्हणजे कार्यालयाकडे जाण्याचा रस्ता, रस्त्यावरची वाहने, कर्मचारी यांच्या फोटोंसाठीही डझनावारी पृष्ठे वाया घालवली आहेत. हा काय पोरकटपणा आहे? कालेलकर, मंडल किंवा अन्य कोणत्याही अहवालात असले स्वत:भोवती आरती ओवाळण्याचे उद्योग आढळत नाहीत. अबोध मनात जातीय भावना कशी काम करते त्याचा पुरावा म्हणजे बांठिया ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र यांच्यासाठीच्या मनुस्मृतीतल्या तरतुदी विस्ताराने नोंदवतात; पण वैश्यांना मात्र त्यातून वगळतात. आणखीही असंख्य दोष आहेत. जर श्री. झगडे या आयोगात नसते, तर बिनकण्याचे इतर सदस्य आणि ओबीसीद्वेष्टे बांठिया यांनी ओबीसींची संपूर्ण राजकीय कत्तल केली असती. देशमुख समितीने १९६४ साली इमावची राज्यातली लोकसंख्या अवघी दहा टक्के दिल्याची लोणकढी थाप बांठिया अहवालात मारतात. मी स्वत: या आयोगासमोर गेलो होतो. बांठियांनी मला मराठीत बोलायला बंदी केली. माझा निम्मा वेळ शिल्लक असतानाही वेळ संपली, असे सांगून मी मांडत असलेल्या पुराव्याविषयी सांगू दिले नाही. बांठीया यांनी या कामासाठी वारेमाप पैसा खर्च केलेला असून, त्याची चौकशी व्हायला हवी.

**ओबीसी जनगणना हाच यावरचा उपाय होय**

या चुकीच्या अहवालामुळे ओबीसींचे शिक्षण व शासकीय नोकरीमधले आरक्षणही संकटात सापडू शकते. ओबीसी जनगणना हाच यावरचा उपाय होय. आयोगाने तशी शिफारस केलेली आहे. विधानसभा व लोकसभेतही ना.मा.व.ना आरक्षण द्यावे, असेही आयोगाने म्हटले आहे. राष्ट्रहितासाठी ओबीसी जनगणना आवश्यक ठरते. बिहार, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओरिसा, तामिळनाडू अशा अनेक राज्यांनी ओबीसी जनगणना केलेली आहे किंवा काम सुरू आहे. त्यांच्या राज्याच्या विकासासाठी त्यांचा उपयोग झालेला आहे. ही जनगणना सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. देशातील अनुसूचित जाती व जमातींची जातवार जनगणना गेली दीडशे वर्षे होत आलेली आहे. त्या माहितीच्या आधारे या वर्गाच्या विकास योजना, कल्याणकारी कार्यक्रम आणि आर्थिक तरतूद केली जाते. ओबीसी, भटके विमुक्त, विमाप्र नागरिकांचा मागास वर्ग यांच्यासाठी मंडल आयोगाने १९८० मध्ये केलेल्या शिफारशींनुसार देशात हा तिसरा मागास समूह मान्यताप्राप्त ठरला. मात्र, त्याला घटनात्मक संरक्षण नाही. कारण जनगणना नसल्याने लोकसंख्या माहीत नसल्याचे कारण दिले जाते.

कालेलकर, मंडल, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, १९९४ यांनी ओबीसी जनगणना आवश्यक असल्याची शिफारस केलेली आहे. संसदेतील सा.आ.जा. जनगणनेवरची २०१० ची चर्चा व समर्थन विरोधपर लेखांचा समावेश असलेले पुस्तक मी २०१२ साली प्रकाशित केले. केंद्रीय नियोजन आयोगाने ओबीसींचे शिक्षण, रोजगार, निवारा, आरोग्य यासाठी धोरणे आखण्यासाठी ओबीसी जनगणना करावी, असा ठराव केलेला आहे. संसदेच्या सामाजिक न्याय विभागाच्या स्थायी समितीने (सुमित्रा महाजन समिती) ओबीसी जनगणनेची शिफारस केलेली होती. महाराष्ट्र विधानसभेत ओबीसी जनगणनेचा ठराव २८८ आमदारांनी एकमताने मंजूर केलेला आहे. शेकडो परिषदा, आंदोलने, संस्था, संघटना ओबीसी जनगणनेचा आग्रह धरीत आहेत. जोवर ओबीसी जनगणना नाही, तोवर या मागास समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी मिळणार नाही. धोरणे आणि योजना बनणार नाहीत. ज्या देशात कोंबड्या, बकऱ्या, मेंढरे, गाया, म्हशी यांची गणना होते, तिथे ओबीसींची गणना होऊ नये?



राजकीय आरक्षण हे ना.मा. वर्गाचे राजकीय प्रशिक्षणाचे केंद्र आहे. आज देशात सुमारे ७० कोटी संख्येच्या या समूहातील अकरा लाख प्रतिनिधींना हे शिक्षण मिळते आहे. राज्यात आजवर ३ लाख कुटुंबांना याचा लाभ मिळालेला आहे. त्यातून लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट होत आहे. ●●●

**(लेखक राज्य मागास वर्ग आयोग व केंद्रीय नियोजन आयोगाच्या सल्लागार गटाचे माजी सदस्य आहेत.)**






# 2025 : चिंतेचे साल

**२७ सप्टेंबर १९२५ रोजी भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. या क्षणाला शंभर वर्षे पूर्ण होत असता भारतीय समाजव्यवस्थेची, अर्थव्यवस्थेची, शिक्षणव्यवस्थेची आणि सांस्कृतिक उन्नयनाची शंभरी भरणार आहे आणि त्यासाठी त्यांना २०२४ साली सर्वसत्ता आपल्या हाती पाहिजे आहे. २०२४ साली सत्ता मिळविण्यासाठी आतापासूनच ते कामाला लागले आहेत.**



**ज.वि. पवार**

भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करताना १९२५ ते १९३० हे पंचक फारच महत्त्वाचे ठरते. एखाद्या चळवळीच्या स्थापना दिनाला महत्त्व न देता तिच्या कर्तृत्वाला महत्त्व दिले पाहिजे, असे काही लोक म्हणत असले, तरी एखाद्या संघटनेची वा चळवळीची स्थापना झालीच नसती, तर ती चळवळ आकाराला आली नसती, याचे भान या विचारवंतांना नसते. चळवळच काय; परंतु व्यक्तीची जन्मतारीखही महत्त्वाची ठरते. ती व्यक्ती अमुक एका तारखेला जन्मली अन् पुढील आयुष्यात तिने हे हे काम केले, हे सांगण्यासाठी जन्मतारखा धुंडाळल्या जातात अन् त्याच्यावरून वादविवादही होतात. क्रांतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मतारखांना महत्त्व देऊन या तारखांनुसारच त्यांच्या कर्तृत्वाचा मागोवा घेतला जातो. भारतातच नव्हे, तर जगभरात अशा महनीय व्यक्तींच्या कर्तृत्वाबरोबरच त्यांच्या जन्मतारखांना महत्त्व दिले जाते अन् त्याचमुळे त्यांच्या जन्मदिनी सार्वत्रिक सुट्या जाहीर केल्या जातात. एवढेच नव्हे, तर स्थापना दिनाला वा जन्मदिनाला महत्त्व न देणारे आपले वाढदिवस साजरे करतातच ना. ते आपल्या जन्मदिनाची का आठवण काढतात. याचाच अर्थ व्यक्ती असो, वा संस्था असो, तिच्या जन्मदिनाला महत्त्व असतेच. काही तर याचमुळे रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव, अमृत महोत्सव, जन्मशताब्दी महोत्सव साजरे केले जातात अन् त्या पार्श्वभूमी 'मागे वळून' पाहतात अन् पुढील कार्यक्रम ठरवतात. असाच एक अत्यंत महत्त्वाचा महोत्सव भारत देशात २०२५ साली होणार आहे. दि. २७ सप्टेंबर १९२५ रोजी भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. या क्षणाला शंभर वर्षे पूर्ण होत असता भारतीय समाजव्यवस्थेची, अर्थव्यवस्थेची, शिक्षणव्यवस्थेची आणि सांस्कृतिक उन्नयनाची शंभरी भरणार आहे आणि त्यासाठी त्यांना २०२४ साली सर्वसत्ता आपल्या हाती पाहिजे आहे. २०२४ साली सत्ता मिळविण्यासाठी आतापासूनच ते कामाला लागले आहेत.

२. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या वेळी भारतात 'हिंदुराज्य' प्रस्थापित करण्याचे ठरविण्यात आले होते. मुस्लीम लीग, डॉ. बाबासाहेबांची चळवळ आणि ब्रिटिशांची सुधारणावादी प्रवृत्ती यामुळे ही मनीषा पूर्णत्वास जाईल, असे वाटले नव्हते. याचे कारण क्रांतिबा फुले, छत्रपती शाहू महाराजांनी महाराष्ट्राची भूमी आपल्या विचार शिंपणाने सुपीक केली होती अन् तिचा परिणाम देशभरच्या मातीवर झाला होता. या मातीतून जे अंकुरित झाले होते ते तथागत गौतम बुद्धांच्या वैचारिकतेशी नाते सांगणारे होते. ब्रिटिश राजसत्तेचा अंमल पूर्ण भारतभूमीवर होता. त्यामुळे सुधारणांचे वारे वाहू लागले होते. पूर्ण देशाला एका सूत्रात गुंफता-गुंफता देशात समतेची झुळूक निर्माण केली. अल्प किमतीतील पोस्ट कार्ड देशभर संदेश पोहोचवीत होते. त्या धर्तीवर समतेचेही बीजारोपण केले जात होते.

ब्रिटिश भारतात आलेच नसते, तर इथली जमीन कायमची नापीक ठरली असती. स्वतःच्या राज्यकारभारासाठी का होईना या नापीक जमिनीवर शिक्षणाचा शिडकाव केला, तेव्हाच इथला उच्चवर्णीय वाघिणीचे दूध प्याल्याच्या आविर्भावात गुरगुरू लागला. इंग्रजांचे येणे इथल्या ९७-९८ टक्क्यांना आपल्या प्रगतीची पहाट वाटू लागली. त्यांच्या गर्द काळोखी जीवनाला ती मंगलमय वाटू लागली. काळोख कितीही गडद असो, त्याला चिरण्याचे काम इवलासा काजवाही करू शकतो. अज्ञानाचा गडद अंधार या काजव्याने चिरलाच; परंतु ब्राह्मणांच्या कमरेला अडकलेल्या ज्ञानाच्या चाव्या हिसकावल्या आणि आत्मतेजाची एक नवी वाट मळली. रयत शिक्षण संस्थांसारख्या अनेक मळवाटा निर्माण झाल्या.

३. या सगळ्यांचा ईप्सित परिणाम म्हणून भारत देश प्रगतिपथावर चालू लागला; परंतु वर्चस्ववाद हा ज्यांच्या रक्ताचा स्थायिभाव होता त्यांनी या प्रगतीस विरोध केला आणि सनातनी मार्ग स्वीकारला. आपण जिवापाड जोपासलेल्या सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक वर्चस्वाला आव्हान देण्यात येऊ लागले. तेव्हा धर्माची साथ घेण्यात आली, 'हिंदुधर्मसत्ता' स्थापण्याची गर्जना करण्यात आली. कारण भारतीय माणूस धर्मश्रद्ध असतो, देवधर्मासाठी प्राणही हाती घ्यायला तयार असतो. तसे पाहता एखाद्या देशातील समाजव्यवस्था बदलण्यासाठी शंभर वर्षे म्हणजे काहीच नाही; परंतु महाराष्ट्रातील समाज क्रांतिकारकांना प्रत्युत्तर म्हणून प्रतिक्रांती करण्याचा मनसुबा ठरविण्यात आला. मंदिर आणि ग्रंथ यासाठी साधन म्हणून वापरले जाते. यासाठी काहींना मंदिर प्रवेश दिला; परंतु ग्रंथापासून दूर ठेवले, तर काहींना मंदिर आणि ग्रंथ या दोन्हींपासून दूर ठेवले. महिलांना तर दोन्हींपासून दूर ठेवले. महिला मंदिराची पुजारीण होऊ शकत नाही, आजही तिला गाभाऱ्यात जायला बंदी आहे. तिच्या हातात दोरी होती ती फक्त पाळण्याची. शिक्षणाची नव्हती. महिला कितीही उच्चपदस्थ असो, ती दलितच असते आणि म्हणून काही दशकांपूर्वी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या दक्षिणेतील एका मंदिराच्या परिसरातील सचेल स्थानाने आगडोंब उसळविला होता.




४. मंदिराचे आणि ग्रंथाचे मालक आता लोकशाहीचा पदर धरून देशात अस्थिरता निर्माण करीत आहेत. १९२५ साली निर्माण झालेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याचेच अपत्य म्हणून दि. २१ ऑक्टोबर १९५१ रोजी जन्मास आलेले भारतीय जनसंघ आणि आताचा भारतीय जनता पक्ष. हा पक्ष भारतीय लोकशाहीला नख लावता-लावता तिला तो हद्दपार करीत आहे. १९५० च्या दशकात ज्या राजकीय पक्षाला केवळ दोन लोकसभा सदस्यांच्या बळावर राजकारण करावे लागत होते, तो पक्ष सत्ताधारी होऊन इतर पक्षांना आपले आश्रित करीत आहे. भारतात संविधान आहे; परंतु ते फक्त मंत्रिपदासारखे सत्तापद ग्रहण करण्यापुरते. भारत देश गौतम बुद्धांच्या काळापासून लोकशाहीच्या संवर्धनासाठी सुप्रसिद्ध होता, तो आता यासाठीच जगभर कुप्रसिद्ध होत आहे. करोडो रुपयांचे घोटाळे करणारे लोक देशाबाहेर या लुटीचा आनंद उपभोगत आहेत आणि भारतातला सर्वसामान्य माणूस दोन वेळच्या जेवणासाठी उसासत आहे अन् आपण महाकाय सत्तेचे स्वप्न बघत आहोत.

५. यातील वेदना देणारी बाब म्हणजे काही लोक सुपात असल्याचा आनंद लुटत आहेत. भारत हा जातिप्रधान देश असल्यामुळे काही जातीतले लोक जातीयवाद्यांना बळ देत आहेत. अगदी बंडखोरीच्या आविर्भावात ते विसरतात, की आज आपण सुपातले आहोत; परंतु उद्या आपली रवानगी जात्यात होणार आहे. यातून ओबीसींचीसुद्धा सुटका नाही. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वाभिमानाचे बाळकडू पाजले, त्यातील काही पोटार्थी लोक सनातन्यांच्या दावणीला बांधले गेले आहेत. त्यांचा अपवाद गृहीत धरून असे म्हणता येईल, की देशाच्या देशपणाचे संरक्षण फुले-आंबेडकर विचारधाराच करेल. स्वार्थासाठी वा सत्तेसाठी सहमती देणाऱ्यांकडून नाही. वर्चस्ववाद्यांना साथ देणारे अस्तनीतले निखारे निपजणार नाहीतच असे नाही. ते अल्पसंख्याक उद्या बहुसंख्याक झाले तर... तर प्रातःस्मरणीय हेडगेवार, गोळवलकर होतील, शाळांच्या प्रार्थना बदलल्या जातील, अभ्यासक्रमातून गांधी, आंबेडकरांना गचांडी दिली जाईल, सावरकर-गोळवलकर हेच महापुरुष ठरतील, असेंबल्या, पार्लमेन्ट केवळ भत्ता घेण्यासाठी अस्तित्वात राहतील, सभागृहातील चर्चा हा लोकशाहीचा गाभा असला तरी, चर्चेला तिलांजली दिली जाईल, सरकारी कार्यालयात एस.सी., एस.टी., मागासवर्गीयांचे नामोनिशाण मिटेल, सर्व उद्योगधंदे मूठभर लोकांच्या मुठीत जातील, न्यायालयांना काय निकाल द्यावा याचे डिक्टेशन दिले जाईल, सरकारच्या विरुद्ध कोणी ब्र काढला, तर तो कायमचा जेलवासीय ठरेल, खाण्यावर-पिण्यावर-फिरण्यावर-कपड्यावर सरकारी 'जीआर' निघतील, फुले-ठाकरे-आंबेडकर यांचे साहित्य जाळले जाईल, संविधानाची होळी आणि मनुस्मृती या पुराणाची पोळी केली जाईल. देश ओळखला जाईल तो शंकराचार्यांच्या वा गुरुजींच्या नावाने. कदाचित यापेक्षाही जास्त घडेल २०२५ साली. त्याला प्रतिरोध करायचा असेल, तर भाजपेतर पक्षांनी मूठ आवळली पाहिजे. ती वज्रमूठ ठरली पाहिजे... अन्यथा अश्मयुगाची पुनरावृत्ती होईल. •••

**(लेखक दलित पँथरचे सहसंस्थापक, साहित्यिक व विचारवंत आहेत.)**

# हर घर तिरंगा, हर घर संविधान


**केंद्र सरकारने घर घर तिरंगा असे अभियान जाहीर करत यावर्षी १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्टदरम्यान भारतात प्रत्येक घरावर तिरंगा फडकवला जावा, असे आवाहन केले होते. आपल्या राष्ट्रध्वजाला भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या प्रदीर्घ संघर्षाचा इतिहास आहे. डौलाने फडकणाऱ्या भारतीय राष्ट्रध्वजाकडे आपण जेव्हा अभिमानाने पाहतो तेव्हा नकळत स्वातंत्र्यलढ्याचा संघर्षशील आणि प्रेरणादायी इतिहास आपल्या डोळ्यासमोरून पुढे सरकत असतो.**



**सुभाष वारे**

आताचा जो आपला राष्ट्रध्वज आहे त्याला भारताच्या संविधानसभेत २२ जुलै १९४७ रोजी स्वीकारण्यात आले आहे. अर्थात, तिरंगी राष्ट्रध्वजाचा इतिहास त्याहून फार जुना आहे. इंग्रजांच्या विरोधातील संघर्षात तिरंगी झेंडा हाती घेऊन भारताच्या स्वातंत्र्याचा जयजयकार करत अनेकांनी लाठ्या खाल्ल्या, कित्येकांनी तुरुंगवास पत्करला, तर अनेक शूरवीरांना शहीद व्हावे लागले.

डौलाने फडकणाऱ्या राष्ट्रध्वजाला सलामी देताना आपल्याला सतत आठवत असतात नंदुरबारचे हुतात्मा शिरीषकुमार आणि त्यांचे सहकारी, सोलापूरचे मल्लप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, श्रीकिशन सारडा आणि जगन्नाथ शिंदे आणि अर्थातच आठवतात शहीद भगतसिंग, शहीद सुखदेव, शहीद राजगुरू. या क्रांतिकारकांसह असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या असीम त्यागाने आपल्या राष्ट्रध्वजाला सतत मानाने फडकण्याचा अधिकार मिळवून दिलाय.




आताच्या राष्ट्रध्वजाला सर्व जण तिरंगा म्हणत असले, तरी प्रत्यक्षात त्यात चार रंग आहेत. राष्ट्रध्वजातील केसरी रंग हा साहस आणि शौर्याचे प्रतिनिधित्व करतो. आपले राजकीय नेते आणि आपणा सर्वांकडूनही स्वार्थरहित त्यागाची अपेक्षा तो करतो. पांढरा रंग हा आपल्या मनाच्या शुद्धतेचा, शांततामय सहजीवनाचा आणि पारदर्शी परस्परव्यवहारांचा निदर्शक आहे. हिरवा रंग हा मातीशी, झाडांशी, शेतीशी, पीकपाण्याशी आणि पर्यावरणाशी नाते सांगतो. जमिनीच्या सुपीकतेतून येणाऱ्या समृद्धतेचा तो निदर्शक आहे. राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी असलेले निळ्या रंगातील अशोकचक्र हे ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात मौर्य साम्राज्याच्या सम्राट अशोकांनी सारनाथ येथे उभारलेल्या नीतिचक्राच्या इतिहासाशी आपल्याला जोडते. अशोकचक्र आपल्याला सतत गतिमानतेचे आणि परिवर्तनाचे महत्त्व सांगत असते. थांबला तो संपला याची आठवण करून देत असते.

**भारतीय संविधान व राष्ट्रध्वज हे दोन्ही आपल्यासाठी अभिमानाचे विषय**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात जाती, धर्माचे भेद विसरून एकत्र आलेल्या भारतीयांच्या एकजुटीने महाकाय ब्रिटिश सत्तेला नमवले. एक राष्ट्र म्हणून ही एकजूट होऊ शकली. कारण भारताच्या स्वातंत्र्यलढ्याने इथल्या शेतकऱ्यांना, कामकऱ्यांना, महिलांना, आदिवासींना, जातीव्यवस्थेने मागे ठेवलेल्या समूहांना, स्वतःची ओळख शोधत असलेल्या भटक्या समूहांना, सर्वधर्मीय भारतीयांना एक स्वप्न दाखवले होते. तुम्ही कुणीही असा, स्वतंत्र भारतात तुम्हाला दोन पायऱ्या वर चढण्याची संधी नक्की मिळेल. तुमचा जन्म गावात झाला की शहरात, तुम्ही महिला आहात की पुरुष, तुम्ही जातीव्यवस्थेच्या खालच्या पायरीवर अहात की वरच्या, तुमच्या श्रद्धा वा उपासना पद्धती भलेही वेगवेगळ्या असोत; पण या कशाचाही विचार न करता स्वतंत्र भारतात तुम्हाला तुमचे आयुष्य घडविण्याची समान संधी मिळेल. तुमच्यातील लपलेल्या क्षमतांना विकसित करत माणूसपणाच्या वरच्या पायऱ्या गाठण्याची सर्वांना समान संधी असेल. हा शब्द दिला होता स्वातंत्र्यलढ्याने सर्व भारतीयांना. त्या



आधीच्या भारतात हे नव्हते. मूठभर जातदांडगे आणि धनदांडगे यांनाच तेव्हा मान होता, त्यांनाच पुढे जायची संधी होती. नवा भारत मात्र सर्वांना सोबत घेऊन जाणारा बनवायचा असा स्वातंत्र्यलढ्याचा संकल्प होता. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी ज्यांनी काहीतरी सोसले अशा सर्व देशभक्तांनी तिरंगा हातात घेऊन याच संकल्पाच्या दिशेने कूच केले होते. नव्या भारताची ही संकल्पना इंग्रजांबरोबरच्या लढ्यात विकसित होत गेली. तीच संविधानसभेच्या माध्यमातून भारतीय संविधानात शब्दबद्ध झाली. सर्व जाती-धर्मांच्या स्त्री-पुरुषांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी बहाल करणारे भारतीय संविधान आणि आपला राष्ट्रध्वज हे दोन्ही आपल्यासाठी अभिमानाचे विषय आहेत.

**भारतीय राष्ट्रध्वजाला आपले मानले नव्हते**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकारने घर घर तिरंगा हे अभियान जाहीर केले आहे. आज सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाने व त्यांच्या समविचारी संघटनांनी कितीतरी वर्षे भारतीय राष्ट्रध्वजाला आपले मानले नव्हते, हे वास्तव आहे. मूठभरांचे विशेषाधिकार निरस्त करत, सर्वांना बरोबरीला आणण्याचे स्वप्न पाहणारे संविधान बदलण्याची भाषा अधूनमधून त्यांचे काही मंत्री, कार्यकर्ते करत असतात. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रध्वजाने भारतीयांच्या मनामनांत पेरलेल्या स्वप्नाशी जोडून घेण्याचे आवाहन आता त्यांच्या नेतृत्वातील सरकार करत असेल, तर त्याचे स्वागत करूया. या अभियानात घरोघरी फडकले जाणारे ध्वज खादीचेच असतील अशी पूर्वतयारी केली असती, तर जास्त चांगले झाले असते. आता हे आवाहन म्हणजे केवळ एक घोषणा राहू नये, फक्त एक इव्हेंट बनून जाऊ नये, याची काळजी मात्र आपल्याला घ्यावी लागेल. आपण घरोघरी राष्ट्रध्वजाला जरूर अभिवादन करूया; पण या अभिवादनाचा नेमका अर्थ जर पुढे न्यायचा असेल, तर भारतीय स्वातंत्र्यलढ्याने उद्याच्या भारताबद्दल भारतीयांच्या मनात पेरलेल्या त्या स्वप्नाचीही उजळणी करूया. ते स्वप्न ज्या भारतीय राज्यघटनेत सामावलेले आहे त्या भारतीय राज्यघटनेलाही अभिमानाने आपल्या मनात जागा देऊया. जातिभेदाला संपविण्याची इच्छाशक्ती दाखवूया, परधर्म द्वेषाला गाडून टाकूया, धर्मश्रद्धेला व्यक्तिगत जीवनापुरते मर्यादित ठेवूया आणि आपल्या सार्वजनिक जीवनाची वाटचाल संविधानाच्या प्रकाशातच करण्याचा निर्धार करूया.

**नव्या भारताच्या उभारणीसाठी शपथबद्ध होण्याचा निर्धार**

राष्ट्रध्वजाचा सन्मान करायचा म्हणजे काय करायचे, हे समजून घेऊया. राष्ट्रध्वजाला सलामी म्हणजे भारताच्या बहुविध संस्कृतीचा सन्मान, राष्ट्रध्वजाला अभिवादन म्हणजे आर्धी आबादी असलेल्या महिलांच्या न्याय्य अधिकारांचा सन्मान, राष्ट्रध्वजाचा अभिमान म्हणजे भारताचे पाडे, तांडे, झोपडी आणि पालापर्यंत शिक्षण आणि रोजगाराचा अधिकार पोहोचावा हा आग्रह धरायचा, राष्ट्रध्वज फडकावणे म्हणजे मूठभरांच्या उपभोगासाठी गरीब आदिवासींची जगण्याची साधने हिसकावून घेतली जाणार नाहीत याचा आग्रह धरायचा. राष्ट्रध्वजाचा आदर म्हणजे संविधानाला अपेक्षित नव्या भारताच्या उभारणीसाठी शपथबद्ध होण्याचा निर्धार.

भारत सरकारच्या घर घर तिरंगा आवाहनाला साथ देताना आपण आणखी दोन पावले पुढे चालूया आणि म्हणूया, 'हर घर तिरंगा, हर घर संविधान'.

**(लेखक ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते आहेत.)**

# समान शत्रूविरोधात तरी समान मित्र बना!

**भाजपचं सत्ताधारी राहणं हे केवळ एका राजकीय पक्षाचं सत्ताधारी होणं एवढंच नाही, तर भारताच्या स्वातंत्र्य संग्रामासह, स्वतंत्र भारतानं उभारलेल्या संविधानिक संसदीय लोकशाहीस, धर्मनिरपेक्ष विचारधारेस उखडून परंपरावादी, पुनरुज्जीवनवादी, धर्मांध, एकरेषीय, गणवेशधारी राजवट प्रस्थापित करणं आहे. त्यामुळं सर्व भाजपेतर पक्षांनी पक्षीय अभिनिवेश, धोरणं, सत्ताकांक्षा बाजूला ठेवून एकत्र येत या देशातील लोकशाही, धर्मनिरपेक्षता, केंद्र-राज्य संबंधातील सौहार्दता टिकविण्यासाठी एकत्रितपणे भाजपला सत्तेबाहेर करणं याला प्राथमिकता दिली पाहिजे.**



संजय पवार

भाजपचं केंद्रातलं सरकार सरकार चालविण्यापेक्षा विरोधी पक्षांची सरकारं पाडता कशी येतील याचाच सदासर्वकाळ विचार व तसा आचार करीत असतं. आज भाजपची आहे त्यापेक्षा अधिक राष्ट्रव्यापी व अधिक मजबूत अशी काँग्रेसची सत्ता या देशात ५० वर्षांहून अधिक काळ होती. तो विक्रम वा इतिहास सहजासहजी मोडता येणारा नाही! अजून भाजपला राजीव गांधींच्या ४००+ या विक्रमाची बरोबरी करता आलेली नाही, तसेच काँग्रेसही अजून केवळ २ खासदार या भाजपच्या नीचतम पातळीवर संख्येने घसरलेली नाही!

**...तरच सामायिक शत्रूला नामोहरम करता येईल!**

अवघ्या पाच-सात वर्षांतच आपण नेपोलियन झाल्याच्या दर्पात भाजप नेते वावरू लागलेत. त्यांना एकमेवाद्वितीय व्हायचे वेध लागलेत. जे संघात ते आता देशात या बढाईखोर स्वप्नरंजनातून भारतीय मतदार कधी जमिनीवर आणतील याचा अदमास त्यांना नाही असं नाही; पण सध्याचा भाजप 'मुमकीन है'च्या मोडवर आहे. असो बापडा. भाजपचं जे चालू आहे त्याच्या अगदी विरोधी राजकारण भाजपेतर पक्ष करताना दिसतात. भाजपच्या वाढत्या व लोकशाहीविरोधी वर्चस्वाला एकत्रितपणे आव्हान देण्याऐवजी



हे पक्ष भाजपच्या जाळ्यात अडकून एकमेकांविरोधात लढण्यातच धन्यता मानत आहेत. प्रत्येकाच्या चुली स्वतंत्र व इतक्या भक्कम आहेत, की 'खाईन तर माझ्याच चुलीवर शिजवून' या अट्टहासातून आपला म्हणून एक समान शत्रू आहे, त्याला पराभूत करायचं, तर आपल्या चुलीचं अस्तित्व काही काळ बाजूला ठेवून एका सामायिक चुलीवर येऊन काही शिजवलं, तरच सामायिक शत्रूला नामोहरम करता येईल, असा साधा चौथी-पाचवीला असणारा एकीचं बळ शिकविणारा धडा यांच्या अभ्यासात होता की नाही, असाच प्रश्न पडावा!

**देशभरात सर्वोत्तम कामगिरी**

अगदी ताजं महाराष्ट्राचंच उदाहरण घेऊया. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन पक्षांनी काही अपक्षांसह महाविकास आघाडी बनवून सरकार स्थापन केलं. सरकार स्थापन झालं आणि तिसऱ्या महिन्यात कोरोना महामारी सुरू झाली, ती जवळपास दीड वर्ष थैमान घालून गेली. या काळात आयुष्यात प्रथमच थेट आमदार व प्रथमच थेट मुख्यमंत्री झालेल्या शिवसेना अध्यक्ष उद्धव ठाकरेंनी कसलाही पूर्वानुभव नसताना हा महामारीचा काळ चोख हाताळला. देशभरात सर्वोत्तम कामगिरी करीत त्यांनी महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याचं नाव राखलं. मुंबईसारख्या देशाच्या



आर्थिक राजधानीचं आरोग्यही नीट सांभाळलं. या धावपळीत त्यांची स्वत:ची प्रकृतीही बिघडली. चिंता वाटावी इतपत बिघडली; पण त्यातूनही ते दुरुस्त झाले.

जागतिक महामारी व व्यक्तिगत आजारपणावर मात केलेल्या मुख्यमंत्र्यांना स्वपक्षाचं प्रशासन मात्र सांभाळता आलं नाही. महामारीचा प्रकोप, त्याचं यशस्वी नियोजन, याच्या कोडकौतुकात व नंतरच्या आजारपणात ते आपण एका पक्षाचे प्रमुखही आहोत, हेच विसरून गेले. त्यांना महाआघाडीतील महानेते शरद पवार व सोनिया गांधी यांच्याशी संवाद राखण्यातच इतिकर्तव्यता वाटू लागली. त्यात आपल्या अनअनुभवी चिरंजीवासही थेट आमदार व थेट कॅबिनेट मंत्री करून त्यांनी पक्षात व मंत्रिमंडळातही समांतर सत्ताकेंद्र निर्माण केलं होतं.

**भाजपनं आमदारांसह खासदारांनाही वश केलं**

सत्तेचं पद घेत ठाकरी बाणा मोडून ठेवलेल्या उद्धव ठाकरेंना सत्ता व संघटना वा पक्ष यातला समतोल राखता आला नाही. त्यांचा आपल्याच आमदार, मंत्र्यांशी संपर्क तुटला होता. आदित्य ठाकरेंचं महत्त्व वाढविताना जुन्या-जाणत्या नेत्यांना, नवनिर्वाचित आमदारांना त्यांनी इतकं गृहीत धरलं, की ते सर्व सत्ता गमावलेल्या दुखऱ्या भाजपच्या गळाला अलगद लागले! भाजपनं ज्या कुशलतेनं आमदारांसह खासदारांनाही वश केलं, ते पाहून वर्षा सोडणं, मुख्यमंत्रिपद सोडणं असल्या अराजकीय भावनिक खेळातच उद्धव ठाकरे व त्यांचे चिरंजीव व गिनेचुने लोकप्रतिनिधी मर्दानकी समजू लागले.

आपल्या या स्वपक्षीय अकार्यक्षमतेमुळं आपण एक आघाडी सरकार गमावून बसलोय, याचं गांभीर्यच त्यांच्या लक्षात आलेलं नाही. आजही ते 'माझा पक्ष, माझी निशाणी' यातच अडकलेत. ते अडकलेत हे आपण समजू शकतो. कारण सत्तेच्या राजकारणातले ते तसे अनअनुभवी खेळाडू; पण त्यांना गादीवर बसवणारे राष्ट्रवादी व काँग्रेस पक्ष हा सेनेचा पक्षांतर्गत प्रश्न म्हणून स्वत:ही निमूट सत्तेतून पायउतारही झाले!

**हा निर्धार २०२४ उजाडेपर्यंत टिकेल काय?**

सरकार गेल्याचा ना खेद ना खंत. नाही तरी अनपेक्षितपणे मिळालेला बोनसच होता तो. यात राष्ट्रवादीनं महत्त्वाची खाती मिळवली व सत्ता जाताच विरोधी पक्षनेतेपदही. काँग्रेसला विधान परिषदेतही नेतेपद न देता ते शिवसेनेने घेतलं. एका राष्ट्रीय पक्षाची दोन प्रादेशिक पक्षांनी (राष्ट्रवादी तांत्रिकदृष्ट्या राष्ट्रीय पक्ष आहे; पण त्यांची पकड एकाच राज्यात तीही मर्यादित आहे) केलेली ही बोळवण बघता, काँग्रेस पक्ष राष्ट्रीय स्तरावर भाजपला पर्याय म्हणून लोकांनी कसा पाहावा? याचा अर्थ, आजघडीला तरी राष्ट्रीय राजकारणात भाजपला आव्हान देण्याबाबत यांच्यात एकवाक्यता नाही. सध्या लोकसभा, विधानसभा एकत्रित लढविण्याचे ठरवताहेत; पण हा निर्धार २०२४ उजाडेपर्यंत टिकेल काय?

**ठाकरेंची शिवसेना भाजपला रोखण्याइतकी सक्षम आज तरी नाही!**

या तीन पक्षांतली शिवसेना तर २५ वर्षांहून अधिक काळ भाजपलाच सोबत घेऊन होती. आजही निर्वाचित आमदार/खासदार बहुसंख्येनं पक्षनेतृत्व झुगारून उघडपणे वेगळा गट करून आहेत. अगदी शिवसेना नावानं कार्यरत आहेत. त्यांच्या या पक्षांतरास युतीच्या मतदारांचा पाठिंबाच असणार! अशा वातावरणात उद्धव ठाकरेंची शिवसेना भाजपला रोखण्याइतकी सक्षम आज तरी नाही. राष्ट्रवादीचा जन्मच काँग्रेसमधून हकालपट्टीतून झालेला व पुन्हा सत्तेसाठी काँग्रेसचाच हात धरत मलईदार खाती मुख्यमंत्रिपदाच्या बदल्यात मिळवली व जवळपास १५ वर्षं सत्ता अक्षरश: उपभोगली! २०१४ ला मोदी लाटेत वाहून जाताना विधानसभा निवडणूक निकाल पूर्ण लागण्याआधीच भाजपला बाहेरून पाठिंबा देत सेनेची बार्गेनिंग पॉवरच निकालात काढली व भाजपला सत्ता दिली! २०१९ ला सेना भाजप भांडणात राष्ट्रवादीनं दोन शपथविधी केले! एक पहाटेचा भाजप+राष्ट्रवादीचा. नंतर तो मोडीत काढत शिवसेना+राष्ट्रवादी+काँग्रेस असा महाविकास आघाडी म्हणून नवा शपथविधी केला! हे बेरजेचं गणित अडीच वर्षं चालले. नंतर ते वजाबाकीत गेल्यावर राष्ट्रवादी पुन्हा विरोधी पक्षात बसत सत्ताधाऱ्यांशी हसतखेळत राजकारण करतेय. असा हा पक्ष भाजपला रोखण्याचा प्रयत्न करेल? किंवा तेवढी ताकद मतदार त्यांचा पूर्वेतिहास बघता देतील?

हे झालं महाराष्ट्रातलं. महाराष्ट्राबाहेर काय चित्रं दिसतं? भाजपला कसं रोखायचं याचा विचार करायला म्हणून जरी भाजपेतर पक्षांनी

भेटायचं ठरवलं, तरी बातमी कशाची होते, की हे आलेच एकत्र तर पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण? पुन्हा तीच घिसीपिटी नावं चर्चेत. शरद पवार, ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल (आता नव्यानं त्यात नितीश कुमारांची भर!) यांच्या अशा बैठकांचा कार्यक्रम जाहीर झाला, की केंद्र सरकार यांच्यापैकी कुणाच्या तरी राज्यात ईडी, सीबीआय सक्रिय करतं! की लगेच मीटिंगमधली एक दोन नावं गळपटतात! मग उर्वरित केंद्राचा सावध निषेध करीत पुन्हा भेटू म्हणून माघारी फिरतात!

**भाजप केंद्रीय यंत्रणांचा वापर करून विरोधकांना गारद करते**

भाजपेतरांच्या एकत्र येण्यात आणखी एक त्रांगडं असं आहे, की आप, तृणमूल, समाजवादी, राजद, बसपा, राष्ट्रवादी व काँग्रेस हे भाजपचे थेट राजकीय विरोधक; पण ईशान्य भारतासह दक्षिण भारतातले कम्युनिस्ट वगळता कुणीही थेट भाजपचे प्रतिस्पर्धी नाहीत, ना थेट राजकीय विरोधक. त्यांच्या राज्यात आजमितीस तरी भाजपचं आव्हान नाही. उलट राज्यात काँग्रेसच त्यांचा प्रतिस्पर्धी असतो! त्यामुळं ईशान्य भारतातले छोटे पक्ष, बिजू जनता दल, अण्णाद्रमुक, द्रमुक, तेलुगू देसम, टीसीआर यांचा पारंपरिक प्रतिस्पर्धी काँग्रेसच आहे. अशा परिस्थितीत या पक्षांना, राज्यांना केंद्राच्या मदतीसाठी केंद्रात काँग्रेसविरोधी पक्ष असणं सोयीचं असतं! आपलं उपद्रव मूल्य लोकसभा व राज्यसभेतील ते राज्याला निधी मिळविण्यासाठी व्यवस्थित वापरून घेतात. त्यामुळं भाजप विरोधात सामायिक आघाडी करण्यात यातला एखाददुसरा पक्षच स्वारस्य दाखवतो. साहजिकच एक देशव्यापी आघाडी उभारायच्या प्रयत्नाला आणखी एक भगदाड पडते. भाजपला विरोधकांमधल्या या दुफळ्या नीट माहीत असल्यानं ते उत्तर भारतासह मध्य भारतात केंद्रीय यंत्रणांचा वापर करून विरोधकांना गारद करते आणि ईशान्य व दक्षिण भारतात केंद्रीय निधीचा वापर करून तिथले सत्ताधीश अंकित करून घेते.

भाजप विचारांच्या पातळीवर निवडणुका जिंकण्याच्या भानगडीत न पडता ते थेट अंकगणित मांडून निवडणुका जिंकतात! उत्तर व मध्य भारताच्या खाली ते ईशान्य भारतातील लोकसभेच्या आठ-दहा जागा, शिवाय दीव-दमण इथल्या एक-दोन जागा, दक्षिणेतल्या चार राज्यांत मिळून पाच-सहा जागा, हे ते ठरवून मतदार याद्या घेऊन एक-एक मत मोजून जागा जिंकायचं गणितच मांडतात व अशा या पंधरा ते पंचवीस जागा निवडणूकपूर्व तयारीतच नक्की करून ठेवतात! याउलट भाजप विरोधक लोक भाजपला कंटाळून आपल्याला मत देतील या पूर्वापार समजुतीवर विसंबून राहतात व निकाल लागल्यावर जोरात तोंडावर आपटतात! नुसतेच आपटत नाहीत, तर थेट कोमात जातात. नंतर कुठं दिसतच नाहीत!

**भाजपचा खेळ सर्व चालींनी युक्त**

या सर्व भाजपेतर पक्षांना अगदी दक्षिणेतीलही पक्षांना हे कळत नाही, की भाजप निवडणूक अंकगणित पद्धतीनं, तर राज्य कारभार गोबेल्स नितीनं चालवतंय. त्यांचा खेळ सर्व चालींनी युक्त आहे. थेट विरोधकांना केंद्रीय यंत्रणांचा धाक दाखवून शरणार्थी करा किंवा तुरुंगात टाकून बदनाम, बेदखल करा. जिथं आपला प्रभाव नाही अशा ईशान्य व दक्षिण भारतात एखादा स्थानिक छोटा, मोठा पक्ष धरायचा, त्याला मखरात बसवायचं. आपण पुजारी बनून आरत्या ओवाळायच्या. नंतर आरती मोठी, पुजारी मोठा नि देवासकट मखर छोटा करून टाकायचा ही रणनीती आहे. जोडीला सामाजिक ध्रुवीकरण, समाजमाध्यमांवरच्या जल्पक टोळ्या, न्यायव्यवस्थेसह, पोलीस, माध्यमं यांनाही वापरत विरोधकातला छोटासा आवाजही पार नेस्तनाबूत करायचा.



भाजपचं सत्ताधारी राहणं हे केवळ एका राजकीय पक्षाचं सत्ताधारी होणं एवढंच नाही, तर भारताच्या स्वातंत्र्य संग्रामासह, स्वतंत्र भारतानं उभारलेल्या संविधानिक संसदीय लोकशाहीस, धर्मनिरपेक्ष विचारधारेस उखडून परंपरावादी, पुनरुज्जीवनवादी, धर्मांध, एकरेषीय, गणवेशधारी राजवट प्रस्थापित करणं आहे. त्यामुळं सर्व भाजपेतर पक्षांनी पक्षीय अभिनिवेश, धोरणं, सत्ताकांक्षा बाजूला ठेवून एकत्र येत या देशातील लोकशाही, धर्मनिरपेक्षता, केंद्र-राज्य संबंधातील सौहार्दता टिकविण्यासाठी एकत्रितपणे भाजपला सत्तेबाहेर करणं याला प्राथमिकता दिली पाहिजे.

भाजपच्या विनाशकारी विचारातून देश वाचला, तरच इतर राजकीय पक्ष व इतर संविधानिक संस्थांचं अस्तित्व टिकेल. त्यासाठी राष्ट्रीय गांभीर्याची गरज आहे. भाजपेतर पक्ष ती लवकरात लवकर ओळखतील, एवढीच एक लोकशाहीवादी नागरिक म्हणून अपेक्षा.

●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# भारतीय संविधानाचा वैज्ञानिक दृष्टिकोन

**आपल्या संविधानाची भूमिका पूर्णपणे वैज्ञानिक दृष्टिकोनाची आहे. धर्माच्या माणसांची संख्या वाढविण्यापेक्षा 'वैचारिक क्रांती' घडवू पाहणाऱ्या माणसांचीच क्रांती का घडवू नये. म्हणूनच 'ओबीसी धम्मक्रांतीचा' सूर्य डोके वर काढत आहे. त्याकडे सम्यक दृष्टीने पाहायला हवे.**



**अरूण वाघ**

आपल्या देशाचे राजकारण हा आपल्या सामाजिक व्यवहारांचा एक भाग असतो. अर्थातच समाजाची वैशिष्ट्ये आणि आकांक्षा यांचे प्रतिबिंब सातत्याने राजकीय क्षितिजावर पडत असते. एकूणच राजकीय स्वरूपामुळे, निर्णयामुळे सामाजिक व्यवहारांचे परिणाम घडलेले आढळून येतात. उदा. आपले सामाजिक व्यवहार आणि राजकारण एकमेकांशी संलग्न दिसतात. आपल्याला भारतीय राजकीय प्रक्रियांचे आकलन करून घ्यायचे असेल, तर आपल्याप्रमाणे असणारे भारतीय सामान्य नागरिक आणि त्यांच्या जीवनावर पडणारा राजकीय प्रभाव याबाबतच अध्ययन महत्त्वाचे ठरत असते.

प्रत्येक समाजातील राजकीय प्रक्रियेला त्या-त्या समाजातील राजकीय वातावरणाची पार्श्वभूमी लाभलेली असते. लोकांच्या दृष्टीने जे प्रश्न महत्त्वाचे असतात, ते जसेच्या तसे प्रत्यक्ष राजकारणात सहसा आढळत नाहीत. राजकीय प्रक्रियेच्या क्षमतेप्रमाणे त्या प्रश्नांची वेगवेगळी रूपे प्रत्यक्ष राजकारणात उमटताना आढळतात. भारताच्या राजकीय संस्कृतीचा विचार प्रामुख्याने चार मुद्यांसंदर्भात केला जातो. आपण भारतीय लोक राजकारणाचा विचार एक साध्य म्हणून करतो, की साधन म्हणून; आपला सत्तेविषयीचा दृष्टिकोन काय आहे, नेतृत्वाबद्दल आपण कोणत्या अपेक्षा बाळगतो आणि आपली राजकीय 'भाषा' किंवा राजकीय अभिव्यक्ती कोणत्या प्रकारची आहे. राजकारण हा आपल्या सार्वजनिक विश्वातील एक महत्त्वाचा घटक असला, तरी आपली राजकीय दृष्टी आपल्याच खाजगी भावविश्वातून आकाराला येत असते. मनुष्यप्राणी एकाकी राहण्यापेक्षा गटात, समूहात राहणे अधिक पसंत करीत असतो. त्यामुळेच माणसाला सामाजिक प्राणी म्हणतात. असे असूनही माणूस आपले खाजगी जीवनही जगत असतो. उदा. माणसाचे स्वतंत्र छंद, त्याच्या व्यक्तिगत आवडी-निवडी. अर्थातच, खाजगी जीवन आणि सामाजिक जीवन यामध्ये आपसूक अंतर असते.

### धर्माला जे मान्य, तेच चांगले, असे समजण्यातच लोकांचा कल अधिक

आपल्या सभोवतालचे जग आणि समाजजीवन विविध प्रश्न, माणूस म्हणून येणारी जाण महत्त्वाची असते. माणसाची 'धर्मश्रद्धा' हे आपल्या जीवनाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य समजले जाते. बरेच भारतीय लोक त्यांच्या धर्मावर विश्वास ठेवत असतात. नव्हे, तर धर्म त्यांना जीवनाचे अविभाज्य अंगच वाटते. चांगले-वाईट, नैतिक-अनैतिक याबाबतच्या भावनेतून ते




पाहत असतात. म्हणजे धर्माला जे मान्य असते, तेच चांगले असते, असे समजण्यातच लोकांचा कल अधिक प्रमाणात असतो. धर्मपरायण आणि धर्मावर श्रद्धा ठेवल्यामुळे माणसाच्या आयुष्यात चांगले बदल घडून येतात. ते असे समजतात, की त्यांच्या आयुष्याला 'आध्यात्मिक' अधिष्ठान प्राप्त होत असते आणि ही 'धर्मश्रद्धा' सर्वत्र सारख्याच प्रमाणात पाहायला मिळत असते. जगात कुठेतरी 'ईश्वरशक्ती' अस्तित्वात असल्याची कल्पना






माणूस गृहीत धरत असतो. असल्या प्रकारच्या श्रद्धेतून मग आपल्या दैनंदिन जीवनात प्रार्थना, पूजा, ईश्वरचिंतन, देवदर्शन, धर्मग्रंथांचे पारायण, यासारख्या सातत्यपूर्ण घडणाऱ्या गोष्टी म्हणजे विधी, समारंभ अशा कल्पना. या घटना परंपरा, घरगुती प्रथा, मागील पिढ्यांकडून मिळणारी शिकवणूक अशा प्रकारच्या प्रवासातून या गोष्टी आधुनिक माणसांकडे परावर्तित होत जातात.

**सार्वजनिक ठिकाणी चाललेले विकृत प्रदर्शन आजकाल सतत पाहायला मिळते**

एकूणच धर्माचे प्रमुख अधिष्ठान ईश्वरी कल्पनेशी संमिश्रित झालेले असते. जरी सर्व धर्मांतील या कल्पना वेगळ्या असल्या, तरी नतमस्तक होण्याची प्रवृत्ती सर्वत्र आढळते. ते असेही समजतात, की तो सर्वांचे नियंत्रण करीत असतो. या सर्व गोष्टी न करणाऱ्यामध्येही भीतीचे कल्पित भाव दिसतात. माणसे ईश्वराच्या कृपेवर आणि त्याच्या कोपावर विश्वास ठेवत असतात. घरात किंवा समाजजीवनात जे काही बरे-वाईट घडते, त्याकडे वरील दृष्टिकोनातून पाहतात. सध्या तरी धर्म ही केवळ व्यक्तिगत 'श्रद्धेची' गोष्ट न राहता 'प्रदर्शनीय' अथवा फक्त दाखवण्याची, मिरवण्याची बाब झाली आहे. घरगुती विधी, पूजा-अर्चा, हे जसे आपल्या धार्मिकतेचे आविष्कार आहेत, तसेच आता सार्वजनिक उत्सव, समारंभ यासारखे धर्मप्रदर्शन हेही धार्मिकतेचेच एक अंग होऊन बसले आहे. आजच्या स्थितीमध्ये उद्भवणारा सच्ची धर्मनिष्ठा, कडवी धर्मनिष्ठा, जाज्वल्ये, पक्के दाखवण्याची सदसद्विवेकबुद्धी नसणाऱ्या व्यक्तीमध्ये चढाओढ पाहायला मिळत असते. आपला धर्म दुसऱ्या धर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे, अशी भावना प्रबळ होते. आमचे आचार-विचार इतरांहून वेगळे आहेत, हे दाखवून देण्याचा सतत चालणारा आगाऊपणा, विचारचिंतन करण्यापेक्षा सार्वजनिक ठिकाणी चाललेले विकृत प्रदर्शन आजकाल सतत पाहायला मिळते.

**धर्माच्या आधाराने आपला तथाकथित 'संप्रदाय' प्रबळ करण्याचा प्रयत्न**

आधुनिक कालपर्वात या सर्व गोष्टी 'कालबाह्य' होण्याच्या मार्गावर असल्या तरी राजकारणात असल्या गोष्टींचा लीलया वापर होतो. या गोष्टी काही अचानक घडत नसतात. काळाप्रमाणे 'सांस्कृतिक' बदलातून समाजाची मानसिक जडण-घडण होत असते. आपला पंथ किंवा संप्रदाय हाच व्यक्तींच्या दृष्टीने त्यांनी गृहीत धरलेल्या धर्माचा गाभा वाटतो. परंपरा, धर्मगुरू, पोथी-पुराण, यातून ही सर्व धर्म नावाच्या गोष्टीची ओळख माणसाला होते आणि माणसाच्या व्यक्तिगत जीवनात 'धर्म' आपल्या व्यवहारांचे नियंत्रण करणारा घटक होऊ पाहत असतो. माणसे स्वयंस्फूर्तीने आदर्शाची निवड करीत नाहीत, तर ती त्या-त्या समाजजीवनातून, सांस्कृतिक मक्तेदारीतून ठरवून दिली जातात. नीती-अनीती यांची मार्गदर्शक परिभाषा इथेच ठरवली जाते. माणसाच्या व्यक्तिगत अध्ययनापलीकडे धर्म जातो आणि त्याचे स्वरूप सार्वजनिक व्यवहारात धर्म हे विविध प्रकारचे साधन होऊन बसते. त्याच्या आधाराने आपला तथाकथित 'संप्रदाय' प्रबळ करण्याचा प्रयत्न केला जातो.

ताण-तणावाच्या काळात माणसे आपापल्या धर्माचा आसरा शोधताना आढळतात. स्वधर्मीयांच्या सहवासात राहण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. अशा प्रकारे धर्माच्या वाटा सतत वेगळ्या जाताना दिसतात.

**विकासाच्या मार्गात सरकारने अडथळे निर्माण करू नयेत**

आपल्या घटनेत समाविष्ट केलेली मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे आपले जीवन 'अर्थपूर्ण' व्हावे, आपला सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी भविष्यकाळात सरकारने काय करावे, यासाठीचे निर्देश आहेत. आपल्या देशात सामाजिक व आर्थिक क्रांती घडून येण्यासाठी एका बाजूला राज्याचे व्यक्तिस्वातंत्र्यावरील जाचक निर्बंध कमी झाले पाहिजेत, स्वतःचा विकास घडवून आणण्याची आपणाला मोकळीक पाहिजे, हे जसे मूलभूत हक्कांच्या प्रकरणावरून दिसते, तसेच विकासाची संधी मिळवून देण्यासाठी राज्याने सकारात्मक कार्य केले पाहिजे, हे घटनेतील मार्गदर्शक तत्त्वामधून आपणाला दिसते. त्याद्वारे लोककल्याणाची सम्यक भूमिका स्पष्ट होते. खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात लोककल्याणाची जबाबदारी शासनाने उचलावी, हा वैचारिक संकल्प प्रकर्षाने पुढे आला. आपल्या घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचा विचार हा या दोन्ही गोष्टींशी सुसंगत असाच आहे. सरकारने हे निर्देश पाळावेत. कारण तो समस्त भारतीय नागरिकांचा हक्क आहे. ही तत्त्वे पाळण्यासाठी सरकारने कायदे करायला हवेत. नागरिकांच्या विकासाच्या मार्गात सरकारने अडथळे निर्माण करू नयेत, हे आपल्या मूलभूत हक्कांचे सूत्र आहे.

मूलतः आपले समग्र संविधान आधुनिक माणसाला आधुनिक धर्माप्रमाणे आहे. कारण त्यामध्ये धर्म, परंपरा, प्रांत, जात, यापलीकडे जाऊन समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय यांचा उपयोग घेण्याचा फायदा नागरिकांनी घेतला पाहिजे. सार्वजनिक जीवनात घडणारे लग्न सोहळे करण्यापेक्षा आपण सर्व समाजजीवनाने रजिस्टर्ड लग्न का करू नये. आपल्याला घटस्फोटासाठी कायदा लागतो, तर लग्नासाठी का नको. अर्थात, प्रत्येक समाजात वाढणारा पुरोहित वर्ग आणि त्याची संघटित दादागिरी सामान्य माणसाला पेलवणारी नाही. आपला धर्म, आपले संविधान असले तर भारतीय नागरिकांचे जीवन कितीतरी सुसह्य होईल. कारण आपल्या संविधानाची भूमिका पूर्णपणे वैज्ञानिक दृष्टिकोनाची आहे. धर्माच्या माणसाची संख्या वाढविण्यापेक्षा 'वैचारिक क्रांती' घडवू पाहणाऱ्या माणसांचीच क्रांती का घडवू नये. म्हणूनच 'ओबीसी धम्मक्रांतीचा' सूर्य डोके वर काढत आहे. त्याकडे सम्यक दृष्टीने पाहायला हवे. अगोदरच्या जात पंचायतींनी त्यांच्यासमोर अडचणी निर्माण करू नयेत. ●●●

**(लेखक मीमांसक आहेत.)**

# मोदी - शहांना गडकरी नकोसे का?

**सत्तेचे सर्वार्थाने केंद्रीकरण हे गुजरातमधील प्रारूप मोदी-शहांनी केंद्रात राबवले आहे, या प्रारुपाला शह देण्याची क्षमता असलेला पक्षांतर्गत स्पर्धक मोदी-शहांनी बाजूला केला आहे.**

**विचक्षण बोधे**

गेल्या वर्ष-दोन वर्षांपासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सातत्याने म्हणत असतात, की राजकारणातून निवृत्ती घ्यावी, असे वाटते! गडकरींना खरोखरच राजकारणापासून दूर जाऊन निवांत आयुष्य जगायचे आहे की, दिल्लीच्या राजकारणात ते वैफल्यग्रस्त झाल्यामुळे निवृत्तीची भाषा करत आहेत? राजकीय-सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारी कोणतीही व्यक्ती कधी निवृत्त होत नसते, निवृत्ती घेणे हा त्या व्यक्तीचा स्वभावधर्म नसतो. त्यामुळे गडकरींची निवृत्तीची भाषा भाजपच्या नेतृत्वाने त्यांची राजकीय कोंडी करण्याच्या प्रयत्नाला वैतागून होत असावी, असे दिसते. गडकरी यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि अनुभवी नेत्याची भाजपच्या संसदीय मंडळातून हकालपट्टी होणे कशाचे द्योतक ठरते? भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला म्हणजे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना गडकरी इतके नकोसे का झाले, हा प्रश्न पडतो. खरेतर या प्रश्नामध्ये भाजपच्या बदललेल्या संस्कृतीवर शंका उपस्थित होते.



### मंत्री म्हणून गडकरींनी क्षमता सिद्ध करून दाखवली

भाजपमध्ये वाजपेयी-अडवाणी युगानंतर मोदी-शहांचे राज्य सुरू झाले. भाजपच्या या दोन्ही युगांमध्ये कमालीचा फरक पाहायला मिळतो. वाजपेयी-अडवाणी यांनी भाजपचा विस्तार केला, प्रादेशिक पक्षांना जोडून घेतले, त्यातून राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) अस्तित्वात आली. वाजपेयींच्या नेतृत्वाखाली केंद्रात 'एनडीए'चे सरकार आले. त्यावेळी 'एनडीए'मध्ये शिवसेना, अकाली दलापासून तेलुगू देसम आणि तृणमूल काँग्रेसचाही समावेश होता. जॉर्ज फर्नांडिससारखे लढवय्ये नेते 'एनडीए'चे समन्वयक होते. देशाची धुरा अटल बिहारी वाजपेयी सांभाळत असत, तर भाजप सांभाळण्याची जबाबदारी लालकृष्ण अडवाणी यांच्यावर सोपवण्यात आली होती. वाजपेयींचे तत्कालीन सरसंघचालकांशी फारसे सूर जुळले नाहीत; पण अडवाणी यांनी संघाशी नाते टिकवून ठेवले, भाजपवरील पकड घट्ट केली. केंद्र सरकारमध्ये आणि भाजपमध्येही वाजपेयी-अडवाणी यांची सत्ता असताना नितीन गडकरी राज्याच्या राजकारणात सक्रिय

होते. शिवसेना-भाजपच्या युती सरकारमध्ये त्यांनी मंत्रिपद भूषवले. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे बनवून वाहवा मिळवली. मंत्री म्हणून गडकरींनी क्षमता सिद्ध करून दाखवली. तेव्हा राज्यात मुंडे-महाजन यांचे राज्य होते. त्यांच्या झंझावातातही गडकरी यांनी स्वतःचे अस्तित्व टिकवले. मुंडे-महाजनांनंतर गडकरी हेच राज्यातील भाजपचे मोठे नेते होते. गडकरी नागपूरचे, संघाच्या वैचारिक मुशीतून तयार झालेले. त्यांच्यावर संघाचा वरदहस्त होता.

**भाजपमधील काही ज्येष्ठांनी डाव रचून गडकरींचा काटा काढला**


मोहन भागवत सरसंघचालक झाल्यावर वाजपेयी-अडवाणी यांचे युग खऱ्या अर्थाने संपुष्टात आले. २००४ मध्ये भाजपने केंद्रातील सत्ता गमावली. भाजप नेतृत्वहीन दिसू लागला. सत्तेतून बाहेर फेकला गेलेला भाजप संक्रमण अवस्थेतून जात होता. तेव्हा संघाने नितीन गडकरी यांच्याकडे भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवली. गडकरींच्या रूपात भाजपला राष्ट्रीय स्तरावर नवा चेहरा मिळाला. गडकरींचा स्वभाव मोकळा-ढाकळा. ते भाजपमध्येच नव्हे, तर अन्य पक्षांतही लोकप्रिय होते; पण गडकरींची पक्षाध्यक्षपदी दुसऱ्यांदा नियुक्ती होऊ नये यासाठी भाजपमधील काही ज्येष्ठांनी डाव रचून गडकरींचा काटा काढला. या कटात सहभागी झालेले नेते मोदींच्या गटात सामील झाले, तर काही मार्गदर्शक मंडळात फेकले गेले; पण या कट-कारस्थानामुळे गडकरींचे राष्ट्रीय स्तरावर नुकसान झाले.

**संसदीय मंडळातून वगळून गडकरींची केली गळचेपी**

संघानेही मोदींच्या पाठीशी उभे राहत त्यांना पंतप्रधानपदाचा उमेदवार केले व मे २०१४ मध्ये मोदी पंतप्रधान झाले. त्याच वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये राज्यातील विधानसभेची निवडणूक होऊन शिवसेना-भाजपची सत्ता आली. मुख्यमंत्रीपदावर गडकरींचा दावा होता, त्यांना राज्यामध्ये सक्रिय होण्याची इच्छा होती; पण संघाचा पाठिंबा असलेल्या गडकरींना शह देण्यासाठी मोदी-शहांनी नागपूरच्याच देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती केली आणि गडकरींना केंद्रात मंत्री केले. गडकरींना केंद्रात आणून त्यांच्या राजकीय आकांक्षांना चाप लावला. मोदी-शहांनी आठ वर्षांपूर्वी गडकरींची कोंडी करण्यास सुरुवात केली होती, आता त्यांना संसदीय मंडळातून वगळून त्यांची पूर्ण गळचेपी करून टाकली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी दिली जाईल की नाही, याबाबतही शंका घेतली जात आहे.

**...हेच मोदी-शहांच्या भाजपचे एकमेव ध्येय**

गडकरी वा राजनाथ हे वाजपेयी युगाचे वारसदार आहेत; पण मोदी-शहांच्या भाजपमध्ये या वारसांना फारसे स्थान उरलेले नाही. असे का झाले? भाजपचे विद्यमान अध्यक्ष जे.पी. नड्डा म्हणाले, की भविष्यात फक्त भाजप हाच राष्ट्रीय पक्ष उरेल. प्रादेशिक पक्षांचे अस्तित्वही संपुष्टात येईल! संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांना स्थान असते, ही संकल्पनाच उधळून टाकणारे हे विधान आहे. मोदींनी 'काँग्रेसमुक्त भारता'चा नारा दिला होता. त्यानंतर भाजपमधील 'क्रमांक- दोन'चे नेते अमित शहा यांनी भाजपने अजून शिखर गाठलेले नाही, असे म्हटले होते. ही विधाने पाहिली, तर भाजपचा देशव्यापी विस्तार करत असताना त्यातील इतर पक्षांचे व त्यांच्या नेत्यांचे अडथळे पूर्णतः संपवून टाकणे हेच मोदी-शहांच्या भाजपचे एकमेव ध्येय असल्याचे दिसते. वाजपेयींच्या वारसदारांनी मोदींच्या



मुशीत तयार झालेल्या महत्त्वाकांक्षी नेत्याला विचारले होते, की इतर पक्षांच्या नेत्यांमागे 'ईडी' वगैरेंचा ससेमिरा कशाला लावता? तुमची सत्ता गेल्यानंतर तेही असाच तुमचा बदला घेतील. त्यावर या नेत्याचे उत्तर होते, आता राजकारण बदलले आहे, 'ईडी'चा तगादा लावणे चुकीचे नाही!

**गडकरींची लोकप्रियता ही मोदी-शहांना खटकणारी!**

वाजपेयींचा भाजप इतका हटवादी आणि वर्चस्ववादी नव्हता, मोदी-शहांचा भाजप अतिकडवा बनलेला आहे. मोदी-शहांची भाजपमधील प्रत्येकावर जरब आहे. भाजपचे नेते, मंत्री बोलायला घाबरतात. विरोधी पक्षांची, त्यांच्या नेत्यांची अर्वाच्य भाषेत टिंगलटवाळी करणे, त्यांना राष्ट्रद्रोही ठरवणे, 'गोली मारो'ची भाषा



करणे यामध्ये भाजपच्या नेत्यांना गैर वाटत नाही. तसे केले तरच मोदींशी निष्ठावान असल्याची प्रतिमा उभी करता येईल आणि त्याचा राजकीय लाभ उठवता येईल, असे भाजपच्या नेत्यांना वाटते. अन्य पक्षांतील नेत्यांशी उत्तम संबंध असणे, प्रसारमाध्यमांशी बोलणे, स्वतःचे मत मोकळेपणाने बोलून पक्षांतर्गत स्तरावरही बोलून दाखवणे हे भाजपमधील कोणालाही आता शक्य नाही. मोदी-शहांचे भाजपवर पूर्ण नियंत्रण आहे आणि त्यांनी भाजपला पूर्णतः बंदिस्त केलेले आहे. मोदी-शहांची ही कडक शिस्त गडकरींवर मर्यादा घालू शकत नाही. गडकरींचे विविध पक्षांमधील नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. पक्ष बघून ते विकासाची कामे करत नाहीत. भाजपमधील नव्हे, तर अन्य पक्षांतील नेते, भाजपेतर मुख्यमंत्री दिल्लीत गडकरींना आवर्जून भेटतात. रस्ते व राष्ट्रीय महामार्ग विकास मंत्रालयाच्या कामांची गडकरींना सखोल माहिती आहे, हे त्यांच्या संसदेतील उत्तरांतून अनेकदा दिसले. सर्वपक्षीय खासदारांनीही त्यांची सभागृहांमध्ये स्तुती केली आहे. गडकरींची लोकप्रियता ही मोदी-शहांना खटकत नसेल, असे भाजपमध्ये कोणी म्हणू शकेल का? मोदी-शहांच्या राज्यात भाजपमध्ये गडकरी वगळता स्वतःचे वेगळे अस्तित्व कोणा नेत्याकडे आहे?

**...गडकरींची उपस्थिती मोदी-शहांवर अकुंश ठेवणारी**

मतभेदांची जाहीर वाच्यता करण्याची संघात पद्धत नसल्याने गडकरीही मोदी-शहांनी अन्याय केला, तरी जाहीरपणे बोलत नाहीत; पण गडकरींचा स्वभाव निमूटपणे सहन करण्याचा नसल्याने ते जाहीर कार्यक्रमांमध्ये मोदी-शहांच्या कार्यपद्धतीवर अप्रत्यक्ष टीका-टिप्पणी करतात. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोदींना प्रश्न विचारण्याचे वा प्रत्युत्तर देण्याचे धाडस कोणी करत नाही; पण गडकरींनी मोदींच्या मुद्यांना उघडपणे आक्षेप घेतल्याचे काहींचे म्हणणे होते. भाजपचे संसदीय मंडळ ही पक्षाच्या निर्णयप्रक्रियेतील सर्वोच्च समिती आहे, तिथे गडकरींची केवळ उपस्थिती मोदी-शहांवर अकुंश ठेवणारी होती. केंद्रीय निवडणूक समितीमध्येही विरोधी मत देण्याची ताकद गडकरींकडे होती. या दोन्ही समित्यांमधून गडकरींना डच्चू देऊन मोदी-शहांनी भाजपवर पोलादी पकड मिळवली आहे. पक्षांतर्गत विरोधाचा सूर आणखी क्षीण झाला आहे. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागल्यानंतर मोदींना पर्याय म्हणून गडकरींचे नाव घेतले जात असे. त्या काळात गडकरीही जाहीर भाषणांमध्ये आक्रमक बोलत असत. कधी-कधी अन्य पक्षांच्या नेत्यांची स्तुती करत असत. त्यांच्या या कृतीतून गडकरी मोदी-शहांना शह देण्याचा प्रयत्न करत; पण २०१९ मध्ये मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपने अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर मोदी-शहांनी गडकरींवरील दबाव वाढवत नेला. पहिल्या पाच वर्षांच्या काळात गडकरींकडे जलसंपदा, बंदर विकास आदी पाच-सहा मंत्रालये होती; पण आता त्यांच्याकडे केवळ रस्ते विकासाचे मंत्रालय उरले आहे. लघु उद्योग मंत्रालयाचा कारभारही त्यांच्याकडून काढून घेण्यात आला. केंद्र सरकारच्या वा भाजपच्या निर्णयप्रक्रियेत आता गडकरींचा सहभाग किती, हे शोधून काढावे लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**पक्षांतर्गत स्पर्धक मोदी-शहांनी बाजूला केला**

गडकरी आता दिल्लीत कमी, नागपूरमध्ये जास्त दिसतात. त्यांनी आपले काम बरे आणि आपण बरे अशी भूमिका घेतलेली आहे. गडकरींचा आक्रमकपणा कमी झालेला आहे, ते राजकारणातून निवृत्ती घेण्याची भाषा करू लागले आहेत. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये मोदी-शहांनी गडकरींचा परीघ आकसून टाकला असल्याचे दिसते. संघाचे पाठबळ असल्याने त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून काढून टाकण्याचे धाडस अजून मोदी-शहांनी केलेले नाही; पण त्यांची संसदीय मंडळातून आणि केंद्रीय निवडणूक समितीतून हकालपट्टी करून आगामी काळात भाजपमध्ये गडकरींचे भवितव्य काय असेल, याची स्पष्ट जाणीव करून देण्यात आलेली आहे. सत्तेचे सर्वार्थाने केंद्रीकरण हे गुजरातमधील प्रारूप मोदी-शहांनी केंद्रात राबवलेले आहे. या प्रारुपाला शह देण्याची क्षमता असलेला पक्षांतर्गत स्पर्धक मोदी-शहांनी बाजूला केला आहे. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# मराठवाड्याचे मागासलेपण कधी पुसले जाणार?

**मराठवाड्यात औद्योगिक विकास, मजुरांचे स्थलांतर, शेतमालाला योग्य बाजार आणि दुष्काळमुक्ती, दर्जेदार शैक्षणिक संस्था हे सर्वांत महत्त्वाचे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यास राजकीय नेतृत्व आणि प्रशासनाला अपयश आले आहे. या प्रश्नांना सातत्याने दुजाभाव करणारी वागणूक मिळालेली आहे.**



**डॉ. सोमीनाथ घोळवे**


१७ सप्टेंबर २०२२ रोजी, मराठवाडा विभाग हैदराबादच्या निजाम राजवटीपासून स्वतंत्र होऊन ७४ वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा मागे वळून पाहताना मराठवाडा विभाग विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आलेला दिसून येत नाही. या विभागाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक, असे विविध बाबतीत मागासलेपण सहज दिसून येते. ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील इतर विभागांत ज्याप्रमाणे आधुनिकतेची मूल्ये, संचारसाधने, दळणवळणाचे मार्ग, औद्योगिकीकरण आणि शिक्षणाचे वारे (शिक्षण संस्था) होते, हे सर्वच मराठवाड्यात बरेच उशिरा पोहोचले. याशिवाय सामाजिक सुधारणा चळवळ आणि राजकीय गतिशीलता या बाबतीत वनवा होतीच, तसेच शेतीपूरक धोरणाचा, औद्योगिक विकासाचा मागमूसही नव्हता.

**स्थलांतर आणि पाणीटंचाई या प्रश्नांची तीव्रता दिवसेंदिवस गंभीर**

निजाम राजवटीच्या पाडावानंतर मराठवाडा विभाग विनाअट संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. मात्र, निजामी राजवटीतील मागासलेपणाचे अवशेष शिल्लक राहिले. जमीन सुधारणा, हरितक्रांती, शेतीविकास, पीक पद्धतीतील नियोजन, कृषी बाजारपेठांचा विकास, पाणीसाठे नियोजन, पाणीसाठेनिर्मिती, नैसर्गिक साधनसंपती, औद्योगिक विकास या सर्व घटकांच्या विकासात्मक वाटचालीचा अभाव आहेच. याशिवाय सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पाणीटंचाईमुक्त (दुष्काळमुक्त) करणे आणि मजुरांचे रोजगारांच्या अभावी होणारे स्थलांतर कसे थांबवता येईल, हे दोन प्रश्न अत्यंत गंभीर बनलेले आहेत. हे प्रश्न सोडवण्यात अपयश आले. स्थलांतर आणि पाणीटंचाई या प्रश्नाला फारसे गांभीर्याने राजकीय नेतृत्वाने घेतले नाही. त्यामुळे गेल्या दोन दशकांपासून या प्रश्नांची तीव्रता दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

**विलासराव देशमुखांच्या अकाली निधनाने अनेक प्रकल्पांना खीळ!**

मराठवाड्यात ७० च्या दशकात विकासाची संकल्पना मांडून आंदोलन करण्यात आले होते. मात्र, आंदोलन ग्रामीण भागात रुजवण्यास आंदोलक नेतृत्व कमी पडले. या विकास आंदोलनास




लोकसहभाग आणि जागृतीचे फारसे पाठबळ मिळाले नाही. हे आंदोलन मर्यादित स्वरूपात औरंगाबाद, जालना आणि नांदेड या शहरांपुरतेच मर्यादित राहिले. या आंदोलनात प्रामुख्याने औद्योगिक व शैक्षणिक घटकांचे मुद्दे हाताळले. अगदी अलीकडे विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना लातूर शहराभोवती काही प्रमाणात औद्योगिक व उद्योगाचे प्रकल्प सुरू झाले. मात्र, त्यांच्या अकाली निधनाने या प्रकल्पांना खीळ बसली. बाकीचे जिल्हे आणि ग्रामीण भाग विकास प्रक्रियेपासून अलिप्त राहिला. मराठवाड्यात ग्रामीण भागात मंद गतीने चालू असलेली भौतिक विकासप्रकिया बहुतांश राज्यव्यवस्थेच्या सकारात्मक हस्तक्षेपाच्या (Affirmative

action) माध्यमातून घडून येत असल्याचे दिसून येते.

**लोकसहभाग, लोकजागृती आणि विकास प्रकियेमध्ये मरगळ**

मराठवाड्यात औद्योगिक विकास, मजुरांचे स्थलांतर, शेतमालाला योग्य बाजार आणि दुष्काळमुक्ती, दर्जेदार शैक्षणिक संस्था हे सर्वांत महत्त्वाचे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यास राजकीय नेतृत्व आणि प्रशासनास अपयश आले आहे. हे प्रश्न सोडवण्यास सातत्याने दुजाभाव करणारी वागणूक मिळालेली आहे. यासंदर्भातील उदाहरण. पुण्यातील 'द युनिक फाउंडेशन, पुणे' या संस्थेने २०१६ मध्ये मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन विभागांतील दुष्काळाचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. या अभ्यासात दुष्काळ निर्मूलन, मनरेगा या योजनेची अंमलबजावणी, चाराछावणीच्या बाबतील व्यवहार, पिण्याचे पाणीपुरवठा इत्यादी अनेक घटकांच्या बाबतीत मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात प्रभावीपणे अंमलबजावणी केली असल्याचे दिसून आले. का? तर राजकीय नेतृत्व आणि प्रशासन यंत्रणा ही प्रभावी आणि सक्षम असल्याचे दिसून आले. याच संस्थेच्या डिसेंबर २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या जलयुक्त शिवार अभियान योजनेचे मूल्यमापन: गावे दुष्काळमुक्त झाली का? या संशोधनात्मक अभ्यास अहवालातूनदेखील मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात या योजनेची कामे बऱ्यापैकी झालेली दिसून आली. असे का? तर मराठवाड्याच्या दुष्काळाला मागासलेपणाची किनार आहे. त्यामुळे पाणी साक्षरता, पाणीव्यवस्थापन, पाणी नियोजन, जलसंधारणाची कामे करणे, प्रबोधन, लोकजागृती, लोकसहभाग आणि लोकवर्गणी या सर्वांमध्ये मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र सरस (पुढे) आहे. दुसरे, पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे कालव्यांचे आणि पाटबंधारे यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर निर्माण केले आहे. त्याप्रमाणे मराठवाड्यात झालेले दिसून येत नाही. मराठवाड्यातील राजकीय नेतृत्व आणि प्रशासन यांच्या नकारात्मक मानसिकतेचा प्रभाव नागरिकांवर पडून लोकसहभाग, लोकजागृती आणि विकास प्रकियेमध्ये मरगळ निर्माण होण्यास भाग पडत आहे.

मराठवाड्यात शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. औरंगाबादमध्ये सर्वांत जास्त, तर परभणी या जिल्ह्यात सर्वांत कमी आहे. शिवाय औद्योगिक विकास अत्यल्प झाला आहे. एकूण महाराष्ट्रातील औद्योगिक प्रकल्पांपैकी केवळ ९.१४ टक्के प्रकल्प मराठवाड्यात आहेत. तेही औरंगाबाद या शहराभोवती केंद्रित आहेत. ज्या प्रकारे पश्चिम महाराष्ट्र काही भागांचा अपवाद वगळता खेडेगावांपर्यंत एमआयडीसी व इतर उद्योगांच्या माध्यमातून औद्योगिकीकरण आणि उद्योगाचे जाळे विणले गेलेले दिसून येते, तसे मराठवाड्यात दिसून येत नाही. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एमआयडीसीच्या स्थापना केल्या आहेत. मात्र, औरंगाबाद आणि जालना शहरांच्या भोवतालचा अपवाद वगळता, इतर जिल्ह्यांच्या एमआयडीसीमधील निम्म्यापेक्षा जास्त उद्योग बंद पडलेले आहेत. औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण आणि सुविधांची निर्मिती करण्यात अपयश आले आहे. यामागे राजकीय नेतृत्वाची उदासीनता आणि अनास्था असल्याचे दिसून येते.





**शेती आणि शेतमाल प्रकिया उद्योगाकडे दुर्लक्ष**

औद्योगिक विकास झाला नसल्याने मराठवाड्याची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे. ७० टक्के कुटुंबांना शेती आणि शेतीसंबधित जोडव्यवसाय, जोडउद्योग, जोडमजुरी यामार्फत मूलभूत गरजा पूर्ण कराव्या लागतात. शेतमजूर, अल्पभूधारक, भूमिहीन यांचे प्रमाणदेखील मोठे आहे. तरीही प्रामुख्याने शेती, शेतीवर आधारित इतर जोडउद्योग, जोडव्यवसाय, शेतीपूरक जोडव्यवसाय, शेतीमाल प्रक्रिया उद्योग, शेतीपूरक उद्योग क्षेत्र इत्यादींचा विकास करण्यात आला नाही. उदा. मराठवाड्यात दुग्धव्यवसाय विकासाचा पूर्णपणे अभाव आहे. दुसरे असे, की जिल्हा ठिकाणच्या कृषी उत्पन्न बाजार समित्या पूर्ण कार्यक्षम बनवल्या नाहीत, तसेच कृषी उत्पन्न बाजारपेठांचा विकास आणि शेतमाल प्रकिया उद्योगाकडे दुर्लक्ष केले आहे. अर्थात, अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर अवलंबून असताना याच क्षेत्राला सातत्याने दुय्यम

स्वरूपात ठेवण्यात आले. त्यामुळे शेतमाल कोठे विकायचा हा प्रश्न प्रत्येक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना आहे. कृषी बाजारपेठेचा प्रश्न सोडवण्याचादेखील फारसा प्रयत्न झालेला नाही.

मराठवाडा विभाग कृषी सधन असलेला आहे. मात्र, कृषी बाजारव्यवस्था, वाहतूकव्यवस्था, साठवणव्यवस्था, शेतमाल प्रकिया उद्योग हे सर्वच निर्माण करण्यास अपयश आले आहे. या विभागातील नैसर्गिक पीक पद्धतीकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले. उदा. एके काळी मराठवाडा विभाग ज्वारी उत्पादनासाठी अग्रेसर म्हणून ओळखला जात होता; पण आज काय अवस्था झाली आहे? अगदी तीन-चार महिन्यांत निघणारे ज्वारीचे पीक आहे. खरीप हंगामात मूग, उडीद, सोयाबीन, धने इत्यादी पिके घेता येतात आणि रब्बी हंगामात ज्वारीची लागवड करता येते. या पिकासाठी काळी जमीन असेल, तर सिंचनाची गरज नाही, थोडा जमिनीचा पोत कमी आणि ती हालकी असेल, तरीही दोन-तीन पाणी दिले (भिजवनावर) तरी शेतकऱ्यांच्या पदरात पीक पडणार याची खात्री. त्यामुळे शेतकऱ्यांना समृद्ध करणारे आणि उत्पन्नाची शाश्वती देणारे पीक म्हणून ज्वारीकडे पहिले जाते होते. यासंदर्भात वयस्कर शेतकरी कामाजी आंभोरे (ताडकळस, ता. पालम, जि. परभणी) सांगतात, की गोदावरी नदीच्या काठावरील गावांना गंगथडी म्हटले जात होते. हा परिसर ज्वारीसाठीच समृद्ध आणि प्रसिद्ध होता. ४०-५० वर्षांपूर्वी गंगथडी परिसरात ज्वारीच्या काढणी कालावधीत कोरडवाहू परिसरातून मजुरांची कुटुंबे स्थलांतरित होत होती. अडीच-तीन महिने ज्वारीची काढणी-मळणी करून बैलगाडीने मजुरीच्या बदल्यात धान्य घेऊन जात होती. इतकी समृद्ध अशी परंपरा पीक पद्धतीची होती; पण अलीकडे ज्वारी या पिकाकडे आणि पिकाच्या प्रकिया उद्योगाकडे राजकीय नेतृत्वाने दुर्लक्ष केले आणि स्वार्थी साखर कारखानदारीमुळे उसाचे क्षेत्र वाढवले. परिणामी, ज्वारीचे लागवडीचे क्षेत्र कमी कमी झाले. अशीच कहाणी कापूस आणि सोयाबीन या पिकांची आहे. मराठवाडा विभागात शेती क्षेत्रात प्रकिया उद्योग आणि प्रभावी कृषी बाजारव्यवस्था निर्माण न झाल्याने रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या नाहीत, तसेच शेती क्षेत्रात पेचप्रसंगदेखील निर्माण झालेला दिसून येतो. याचे प्रतिबिंब शेतीच्या मागासलेपणात आहे.



मराठवाड्यातील जवळपास ९० टक्के नेतृत्व खाजगी आणि सार्वजनिक सभेत स्वतःचा वारसा आणि व्यवसाय शेती असल्याचे सांगत असतात; पण शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत नाहीत. आतापर्यंत शेती विकासाचे आणि शेतमालाला हमीभाव किंवा चांगला भाव मिळवून देण्याचे प्रयत्न झाले नाहीत. मोठ्या प्रकल्पांच्या परिसरात पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचे अनुकरण करत साखर कारखाने काढले गेले; पण दुष्काळी स्थितीत अनेक साखर कारखाने बंद ठेवावे लागतात. आता मराठवाड्यातील एकही साखर कारखाना सुरळीत आणि नफ्यात चालत नाही. सर्वच साखर कारखाने कर्जबाजारी झालेले आहेत. याशिवाय ग्रामीण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोसायट्या यांची स्थितीदेखील खूपच घसरलेली आहे. उदा. अपवादात्मक वगळता सर्वच सहकारी संस्था तोट्यात किंवा बुडीत निघण्याच्या मार्गावर आहेत. मराठवाड्यातील सर्वच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या तर गॅसवर आहेत. एकाही जिल्ह्यातील सहकारी बँक सुव्यवस्थित व्यवहार करणारी नाही. परिणामी, मराठवाड्यातील ग्रामीण भागात शेती आणि जोडव्यवसायला लागणाऱ्या कर्जपुरवठ्याची मोठ्या प्रमाणावर उणीव आहे.

**सिंचन क्षेत्राकडे दुर्लक्ष**

नाथसागर, इसापूर, येलदरी, माजलगाव, विष्णुपुरी, धनेगावचा प्रकल्प उभारणीबरोबरच ऊसशेतीदेखील निर्माण केली. पीक पद्धतीचे, पाणीव्यावस्थापनाचे, पाणी नियोजन आणि काटकसरीने वापर या घटकांवर भर दिलेला नाही. परिणामी या प्रकल्पांचा सिंचन विकास आणि शेतीविकासासाठी फारसा उपयोग झालेला दिसून येत नाही. अनेक मध्यम आणि मोठ्या प्रकल्पांचा उद्देश हा शेती सिंचन असताना उद्योगाला पाणी दिले असल्याचे दिसून येते. प्राधान्यक्रमात शेतीला तिसऱ्या स्थानी टाकले, तर उद्योगाला शेतीच्या ठिकाणी प्राधान्यक्रम दिला आहे. दुसरे असे, की एकही मोठ्या प्रकल्पातील पाणी नियोजन आणि व्यवस्थापन केले नाही. उदा. नाथसागर प्रकल्पामुळे ओलिताखाली येणारे सिंचन क्षेत्राचे नियोजन आणि पाणीव्यवस्थापन योग्यरीत्या केले नाही, असे अनेक अभ्यासक आणि पाणीतज्ज्ञ यांनी सातत्याने सांगितले आहे. अशीच स्थिती इतर प्रकल्पांची आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील शेतीची अवस्था खराब (खारपट, नापीक) झाली आहे, तर कोरडवाहू शेतीविकासाचा प्रयत्न

एकाही राजकीय नेतृत्वाने केला नाही. परिणामी, मराठवाड्यातील शेती क्षेत्र मागासलेले राहिले आहे. जवळजवळ ८२ टक्के क्षेत्र हे कोरडवाहू असल्याचे दिसून येते. केवळ पावसाळी हंगामातील एकच पीक शेतकऱ्यांना घेता येते. त्यामुळे या क्षेत्राला किमान पातळीवर आठमाहीतरी सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मराठवाड्यातील राजकीय नेतृत्वाने शेतीविकासासाठी व्यावहारिक पातळीवर नवनवीन प्रयोग करायला हवे होते, तसेच शेतीला जोडव्यवसाय असणारे विकास करणे गरजेचे होते. शेतीमालावर प्रकिया आणि दुय्यम प्रकिया क्षेत्र उभे करून शेतीकेंद्रित उद्योग व्यवसाय उभे करणे आवश्यक असताना केले गेले नाहीत. मराठवाड्याची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून असल्याने शेतीमालावरील प्रक्रिया उद्योग व्यवसायाचा विकास करणे आवश्यक बनले आहे. उदा. तेल उत्पादन, सूतगिरण्या, सोयाबीनवर प्रकिया उद्योग, डाळीनिर्मिती प्रकल्प, रेशीम उद्योग, बियाणे निर्मिती इत्यादी, तर शेतीला जोडव्यवसायात दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन, शेततळ्यात मत्स्य व्यवसाय इ. या सर्वांचा विकास होणे आवश्यक आहे.







**स्थलांतरितांचा प्रश्न**

मराठवाड्यात शेती क्षेत्रात निर्माण झालेल्या पेचप्रसंग आणि रोजगारांच्या अपुऱ्या संधी या कारणाने शेतमजूर आणि सुशिक्षित बेरोजगारांचे लोंढे पुणे, मुंबई आणि औरंगाबाद, अशा मोठ्या शहरांच्या ठिकाणी जास्त स्थलांतर होत आहेत. नोकरी, खाजगी क्षेत्रात मजुरी, रोजंदारी, बिगारीकाम, मदतनीस, छोटे-छोटे व्यवसाय, पेटी व्यवसाय, हातावरील कलाकुसरीची कामे इ. अशा असंघटित क्षेत्रातील हे मजुरी करत असल्याचे दिसून येते.

मराठवाड्यातून सर्वाधिक मजूर उसतोडणीच्या मजुरीसाठी इतर विभाग आणि राज्यात हंगामी स्वरूपात स्थलांतर करतात. या मजुरांच्या मागण्या आणि समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आणि गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेत. ऊसतोड मजुरांना केवळ भाववाढीच्या मागणीला थोडासा प्रतिसाद देण्यात येतो; पण विमा सुविधा, सुरक्षा, शिक्षण इत्यादी सुविधांच्या आणि कल्याणकारी मागण्यांना फारसा प्रतिसाद मिळवून देण्याचे प्रयत्न राजकीय नेतृत्वाकडून केले नाहीत. त्यामुळे मजुरांच्या तीन-तीन पिढ्या या ऊसतोडणी मजुरीत आहेत. या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असो, की इतर कामगारांप्रमाणे मिळणाऱ्या सोयी-सुविधा देण्यासाठी कोणतेही नेतृत्व पुढे आले नाही, तसेच उसतोड मुक्तीच्या दृष्टीने पर्यायी मजुरी क्षेत्र निर्माण करण्याचे प्रयत्न झाले नाहीत. हे या ऊसतोड मजुरांचे दुर्दैव आहे.

**मराठवाडा विकास महामंडळ स्वप्नाळू संस्था म्हणून कार्यरत!**

मराठवाड्याच्या विकास प्रश्न सोडवण्यासाठी मराठवाडा वैज्ञानिक विकास महामंडळ स्थापन झाले. या महामंडळाला आर्थिक निधीच्या तरतुदीअभावी प्रभावीपणे विकासाचा प्रश्न सोडवण्यासाठी उतरता आले नाही. केवळ बैठका, मागासलेपणाचा आढावा, प्रशासकीय नेमणुका आणि कामकाज या भूमिकेतून प्रत्यक्ष व्यावहारिक पातळीवर हे महामंडळ आले नाही. त्यामुळे हे महामंडळ आता विकासासाठी स्वप्नाळू संस्था म्हणून मराठवाड्यात कार्यरत आहे.

सारांशरूपाने, विकासाच्या राजकरणाऐवजी जातीय आणि अस्मितेच्या राजकरणाचा आधार राजकीय नेतृत्वाकडून घेतला गेला. दुसरे, बीड जिल्ह्याचा अपवाद वगळता इतर जिल्ह्यांमध्ये मराठा समाजाच्या राजकीय नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर (जिल्हा पातळीवर) काही नेतृत्वाचा अपवाद वगळता, राजकीय नेतृत्वांकडून कधी अनुसूचित जातींना विरोध, कधी मुस्लीम समाजाला विरोध, तर कधी मराठा आरक्षणाचा प्रश्न, असे जातीय आणि अस्मितेचे मुद्दे पुढे करून विकासाच्या प्रश्नाला सातत्याने बगल दिली आहे. विविध पक्षांचे ४८ आमदार पक्षभेद विसरून विधिमंडळात मराठवाड्याच्या दुष्काळ प्रश्न सोडवणे, सिंचनाचा अनुशेष, औद्योगिक विकास, उच्च शिक्षणाच्या कॉलेजची संख्या कमी असणे, स्थलांतरितांचे प्रश्न सोडवणे, रोजगारनिर्मितीचे प्रयत्न करणे, शेतमाल प्रकिया उद्योग-व्यवसाय निर्मितीचे प्रयत्न इत्यादी प्रश्नांवर कधीही दबावगट निर्माण करताना दिसून आले नाहीत. किमान मतदारसंघातील दुष्काळी कामे, शेती प्रश्न सोडवणे, पाणीसाठेनिर्मिती, व्यवस्थापन-नियोजन इत्यादींवर एकत्र येताना दिसून येत नाहीत. संपूर्ण मराठवाड्याचे विकासाच्या प्रश्नांवर नेतृत्व करेल, असे एकही नेतृत्व पुढे येत असल्याचे दिसून येत नाही. प्रत्येक नेतृत्व हे स्वतःच्या जिल्ह्यामध्ये किंवा मतदारसंघात मर्यादित झाले आहे. विकास प्रश्नांना हाती घेऊन सर्वसमावेशक भूमिका घेणाऱ्या नेतृत्वाची पोकळी मराठवाड्यात निर्माण झाली आहे.

●●●

**(लेखक शेती, दुष्काळ, पाणी प्रश्नांचे अभ्यासक असून 'द युनिक फाउंडेशन, पुणे' येथे वरिष्ठ संशोधक आहेत.)**

# आंबेडकरवादी जाणिवांचा ऊर्जास्त्रोत : गनीम


'वाद' हा शब्द अभिधा (वाचार्थ) अर्थाने नाही तर ती तत्त्वज्ञानातील एक संकल्पना आहे. राष्ट्रवाद, जीवनवाद, कलावाद, मानवतावाद... हा जसा एक विचार आहे तसा मानवमुक्ती, समता व विश्वबंधुत्व, जाती-धर्मविरहित माणूस म्हणून, जगण्याचा मार्ग म्हणून आंबेडकरवादी विचारधारेकडे पाहिले जाते. कधी-कधी काही पारंपरिक संकल्पना त्या-त्या सांस्कृतिक मानसिकतेतून उदयास आलेल्या असतात. त्या शुद्ध हेतूने प्रेरित नसतात. त्या संकल्पना जोपासण्यामध्ये, टिकवून ठेवण्यामध्ये व त्यास प्रवाहित ठेवण्यामध्ये एक छुपा अजेंडा असतो. 'दलित साहित्य' या संकल्पनेकडे या अर्थाने पाहता येईल. साधारणतः सामान्य माणूस किंवा वाचकांना यातील मर्मभेद सहजपणे लक्षात येत नाही; पण विचारवंत, अभ्यासक, प्रतिभावंत, संशोधक अशा बुरसटलेल्या संकल्पनेला छेद देऊन कालानुरूप नव्या संकल्पना उदयास आणतात. या संकल्पना मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. 'आंबेडकरवाद' ही संकल्पना या गरजेतून, मानवी मूल्यांच्या पेरणीतून उदयास आली आहे. ही तात्त्विक संकल्पना ललित साहित्यातून व्यक्त करणे अतिशय कठीण कार्य आहे; पण ही संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले व मराठीतील एक प्रभावशाली कवी डॉ. उत्तम अंभोरे यांनी 'गनीम' कवितासंग्रहाच्या निमित्ताने यशस्वी व जबाबदारीने लीलया पेलली आहे.



प्रा. डॉ. शंकर विभुते

### कविता हा अतिशय गांभीर्याने घेण्याचा विषय

'पत्ता बदलत जाणारा गनीम' व 'धगीवरची अक्षरं' या दोन कवितासंग्रहांतून मराठी वाचकांना कवी उत्तर अंभोरे यांची ओळख यापूर्वीच झालेली आहे. नुकताच त्यांचा 'गनीम' हा नवीन कवितासंग्रह वाचकांच्या हाती आला आहे. मानवमुक्तीच्या विचाराला शिरोधार्य मानणारी, कुठल्याही अंधविश्वासाला, श्रद्धेला बळी न पडता विवेक बुद्धीचे सतेज ज्ञान समाजात प्रवाहित करणारी, स्वयंप्रकाशित होण्यासाठी मर्म सांगणारी ही कविता आहे. या कवितासंग्रहाविषयी मनोगतात कवी लिहितात, जे वाटते ते सगळे शब्दांत बांधता येत नाही. काव्यात बांधण्याची कदाचित माझ्यात कुवतही नाही; पण जेवढे कळते तेवढेसुद्धा सांगणे महत्त्वाचे वाटले, म्हणून हा प्रयत्न! यातील बऱ्याचशा कविता स्वपरीक्षणाच्या, टोकदार वास्तवाच्या नि ढोंगीपणाचे बुरखे फाडणाऱ्या दिसतील. जे आहे, जे कळले ते मांडत गेलो. स्वतःशीही भांडत गेलो. कविता हा अतिशय गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. या भूमिकेतून हे लेखन झालेले आहे.




### कवितासंग्रहाचे बलस्थान

सौरव प्रकाशन औरंगाबादने प्रकाशित केलेला हा काव्यसंग्रह मुखपृष्ठापासून वाचकांना आकर्षित करतो. पुस्तकाचे पहिले पान उघडताच एक वाक्य डोळ्यासमोर भेदून जाते. मी माझीच कविता दुरुस्त करीत चालतो. या वाक्याचे अनेक अन्वयार्थ वाचकांच्या मनाला स्पर्शून जातात. ही फक्त कविता दुरुस्ती नाही, तर कालानुरूप आपण आपल्याला दुरुस्त करता आले पाहिजे, हा संदेश मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करतो. आपण अजून थोडे पुढे गेलो, की सुप्रसिद्ध कवी, वक्ते, समीक्षक अर्जुन डांगळे यांची प्रस्तावना तर या कवितासंग्रहाचा अर्क आहे. प्रस्तावना वाचताच संपूर्ण कवितासंग्रह वाचल्याशिवाय वाचक हे पुस्तक खाली ठेवू शकत नाही. विशेष बाब म्हणजे, संपूर्ण कवितासंग्रह वाचल्यानंतरही या कविता रसिकांना सोडत नाहीत, तर त्या सदैव मेंदूत घुसळण चालू ठेवतात, हे या कवितासंग्रहाचे बलस्थान आहे.

### 'गनीम'ची जान आणि भान

'गनीम' हा कवितासंग्रह पाच भागांत विभागलेला आहे.

एकूण शंभर कविता या संग्रहात आहेत. वीस-वीस कवितांचे पाच भाग या अर्थाने ही संख्यात्मक विभागणी केली नाही, तर परिवर्तन.. या पाच अक्षरांच्या अवकाशात सर्व कविता सामावलेल्या आहेत. ही पाच अक्षरे एकत्र करताच एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो 'परिवर्तन.' हा शब्द कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करतो. काळानुरूप आपल्यात परिवर्तन झाले पाहिजे, परंपरागत चौकटीत तयार झालेली मिथके तपासून घेतली पाहिजेत, ही कवीची इच्छा आहे. कवितेचे शीर्षकेही या अर्थाने बोलके आहेत. कविता अपरिहार्यतेच्या, अन्वयार्थ, लखलाभ, गद्दार, संभ्रमित, चळवळ : कालची आजची, अकलेच्या चड्डीचं बक्कल, तुटलेल्या बुद्धिवादी मेंदूला नाल, जिभेला लगाम, समरसता, मूक इशारा, इरादा, होपलेस, रिक्शन कविता : भारतरत्न... या नावातच सूचकत्व आहे. कवितासंग्रहाच्या शीर्षकाबद्दल प्रस्तावनेत ज्येष्ठ साहित्यिक अर्जुन डांगळे म्हणतात, 'गनीम' म्हणजे मानवमुक्तीच्या लढ्यात खोडा घालणाऱ्या प्रवृत्ती होत. असे तत्त्वज्ञान, अशा संघटना आणि त्यांची कृती ही 'फॅसिझम'कडे झुकणारी असते. या गनिमाचा प्रतिकार करावयाचा असेल, तर या गनिमाचे नेमके स्वरूप काय आहे, हे ओळखायला हवे आणि त्याबाबतची परिपूर्ण समज अंभोरे यांच्या कवितेला आहे. कविला या 'गनीम'ची जान आणि भान आहे, म्हणून ते लिहितात,

**आता थोडं सावध व्हायलाच हवं**
**पाठीशी उभं असणारावर नि**
**पाठीवरून हात फिरवणाऱ्यावरही शंका घ्यायला हवी.**

कारण शत्रू नव्या रूपात वावरतोय. आपण शत्रूच्या छावण्यांची पुराणी ठिकाणे तीच तीच समजून आपल्याच पायावर आपण दगड मारून घेत आहोत. 'हे रस्ते, जमीन, इमारत, झाडे, पाने, फुले आपलीच आहेत, असे पिंजऱ्यात राहून फक्त हो हो म्हणायचे,' ही हवा पालटलेली लोकशाही आहे. हे कळत असूनही जर तुम्ही कुणालाही न दुखवता मोठेपणाचे तत्त्व बाळगत असाल, तर कवी म्हणतो,

**तुम्हाला लखलाभ**
**फुल्यांच्या घोषणेतच अडकायचं असेल तर**
**तुम्हाला लखलाभ**
**भीमाच्या पुण्याईतच मानायची असेल कमाई**
**तर तुम्हाला लखलाभ.**

गावाबाहेर आणि गावातच व्यथांचे डोंगर उभे असताना तुम्ही बुद्ध, फुले आंबेडकरांचा पीर करण्यात धन्यता मानत असाल, तर हे जगणे तुम्हालाच लखलाभ असो, असे कवी चिडून म्हणतो. पेटणारा वणवा आणि जळणारी पायवाट यांचा आपला काय संबंध आहे असे वाटत असेल, तर 'आता आपलं चांगभलं ' असं कवी उपहासाने म्हणतो.

आज आपण एका अनाकलनीय व्यवस्थेतून वाटचाल करीत आहोत आणि आपले नेते, वक्ते, समाजसुधारक, जनता या चक्रात सहज अडकले जात आहेत. ही भीती कवीला वाटते आहे. म्हणून कवी उपहासाने, तर कधी उपरोधाने चिमटा काढतो. 'वक्तापुरता वक्ता नि कालचाच तक्ता' कवितेत कवी म्हणतो, शत्रू नेहमीच चांगला बोलतो. आपला इतिहास, संघर्षमय गाथा शब्दाशब्दांत रंगवतो. तोंडपाठ बोलणे हा त्यांचा धंदा आहे; पण वांधा आपला होतो.

**करायचेच असेल क्रांतिपुरुषांना**
**'बाबा'**
**अवतारीपुरुष'**
**तर ते**
**गुलाल-नारळ फोडतील'**

असे मतलबी समाजवादी कवींना सगळीकडेच दिसतात. यांच्यात आणि बेडकामध्ये काही फरक कवींना वाटत नाही. बेडूक उभयचर असतो, तर हा समचर असतो, एवढाच काय तो फरक. 'भाजप, काँग्रेस, लाल निशाण किंवा कुठलाही गामी-आगामी-पुरोगामी-प्रतिगामी सर्वत्र याचा संचार असतो' यास आजचे विचारवंतही अपवाद नाहीत, असे कवीला वाटते. कुठल्याच दावणीला विरोध न करणारे आपण 'जरीला' झालोय ही खंत कवीला आहे.

**डोळ्याला झापड**
**मेंदूला नाल**
**जिभेला लगाम**
**लावणं जमलं की**
**सारंच सुजलाम सुफलाम होतं**

सावल्या सावल्यांनीच जगायचे म्हटल्यावर उन्हात पाय कुणी ठेवायचा? चौकटी कुणी मोडायच्या, हरवलेल्या वाटा कुणी शोधायच्या? असा प्रश्न कवी विचारतो. सावल्या सावल्यातच बा गेला असता, तर त्याचा बाबासाहेब झाला असता का? हा प्रश्न तर आपल्या मेंदूत घुसळण करून जातो.

आपणास प्रश्न पडले पाहिजेत. व्यवस्थेने लादलेल्या संकल्पना तपासून घेता आले पाहिजे. त्याचा अन्वयार्थ लावता आला पाहिजे, ही भूमिका कवीची आहे.

कवी जसा आपणास व्यवस्थेतील कुटिल चाली उलगडून दाखवतो, तसा तो आम्ही जागरूक झालोय, हे प्रस्थापितांना आणि विषमतावादींना प्रतिमांच्या भाषेत सांगतो,

**तहान भागविण्याची कला**
**कावळे शिकलेत**
**खडे उचलून उचलून घामाघूम होण्यापेक्षा**
**पाण्याचाच नवा साठा शोधण्याच्या गोष्टी ते**
**कोवळ्या कावळ्याला शिकविताहेत**

या अर्थाने अनेक मिथकांना कवीने दिलेले उत्तर वाचकांना विचार करायला भाग पाडणारे आहेत.

थोडक्यात, उत्तम अंभोरे यांचा गनीम कवितासंग्रह म्हणजे आपल्या जगण्याच्या पद्धतीला, मोठेपणाच्या गर्वाला, परंपरागत विषमतावादी मूल्ये रुजविणाऱ्या मिथकांना उघडी पाडणारी आहे. एक वैचारिक मंथनातून तयार झालेली ही कविता बुद्ध, कबीर, फुले, मार्क्स, आंबेडकर यांची पायवाट रुजविणारी आहे. ●●●

**(लेखक साहित्यिक आहेत.)**

# १५ ऑगस्ट ४७ : लाल किल्ल्याबाहेर काय, काय आणि का घडत होतं...

पंधरा ऑगस्ट १९४७ ला भारताचे पहिलेवहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लाल किल्ल्यावरून केलेले पहिले वहिले भाषण देशाच्या इतिहासात अजरामर आहे. सध्याच्या भाजपने नेहरूंची कितीही निंदानालस्ती केली, सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कितीही खोटे बोलण्याच्या मोहिमा चालवल्या, स्वतःच्या पक्षातील घराणेशाही टोपलीखाली दाबून काँग्रेसच्या घराणेशाहीवर कितीही टीका केली, तरीही नेहरूंचे हे अजरामर भाषण आणि त्यांचे देशाप्रती व्यक्त झालेले कर्तृत्व कुणालाही पुसून काढता येणार नाही. ज्यांचा स्वातंत्र्याशी संबंधच आला नाही, ते तरी कधीच हे पुसून टाकू शकणार नाहीत. जेव्हा नेहरू लाल किल्ल्यावरून सांगत होते, की अनेक वर्षांपूर्वी आपण नियतीशी करार केला होता, याची पूर्तता आज पूर्णपणे नसली तरी थोडीबहुत आपण करत आहोत. मध्यरात्रीचा टोला पडताच सारे जग शांततेने झोपलेले असताना भारत स्वातंत्र्याच्या नव्या युगात जन्म घेत आहे. आज आपल्या दुर्दैवाची अखेर होत आहे. पुन्हा एकदा नव्या भारताचा शोध घेत आहे. ही वेळ क्षुद्र आणि विधायक टीकेला मूठमाती देण्याची आहे, एकमेकांविषयी दुष्ट हेतू किंवा दोष ठेवण्याची नाही. आपल्याला स्वतंत्र भारताचा उत्तुंग असा एक प्रासाद उभा करायचा आहे. ज्यामध्ये देशाची लेकरे सुखाने नांदतील. चिंब पावसात, ढगांच्या कडकडाटात नेहरूंची ही घोषणा, हा निर्धार जगभराने ऐकला (फ्रीडम ॲट मिडनाईट पान. १९० - लॅपिए-कॉलिन्स)

एका नव्या देशाची, नव्या समाजाची आणि अर्थातच नव्या माणसाची आखणी, मांडणी नेहरू करत होते. तेव्हा पुण्यातल्या एका मैदानावर अंदाजे पाचशे लोकांची गर्दी झाली होती. दिल्लीत तिरंगा फडकवला गेला. इथेही ध्वजारोहण झाले; पण तिरंगा नव्हता. स्वस्तिक कोरलेले होते. जे हुकूमशहा आणि वंशशहा हिटलरचे चिन्ह होते. हे सर्व लोक स्वतःला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. सिंधू नदीच्या तीरापासून ब्रह्मदेशाच्या पूर्व सीमेपर्यंत, तिबेटपासून केप कामोरिंगपर्यंत अखंड हिंदुस्थानचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगलेले होते. या उपखंडावर हिंदूंची सत्ता राहिली पाहिजे आणि हिंदू-मुस्लीम भाई भाई ही घोषणा गैर आहे, असे त्यांना वाटत होते.

या मेळाव्यासमोर एक तरुण भाषण करण्यास उभा राहिला. त्याचे नाव नथुराम गोडसे. १५ ऑगस्ट, १९४७ या स्वातंत्र्य दिनानिमित्त शोक, राग व्यक्त करण्यासाठी त्याने हिंदुराष्ट्र या आपल्या दैनिकातील अग्रलेखाची जागा मोकळी ठेवली होती. या जागेला काळी चौकट केली होती. हाच तरुण भाषण करण्यासाठी उभा राहिला. तो म्हणाला, आज जो भारतीय स्वातंत्र्याचा विजयोत्सव आहे, तो हिंदू बांधवांवर



होत असलेल्या अन्यायावर घातलेले पांघरूण आहे. भारताचे विघटन म्हणजे भविष्यात लिहून ठेवलेले भीषण, यातनापूर्ण आणि अस्मानी संकट आहे. याला जबाबदार दोघे आहेत. एक काँग्रेस आणि तिचे नेते गांधी. माझ्या जन्मभूमीसाठी प्राणार्पण करण्याची माझी तयारी आहे, अशी प्रतिज्ञा घेण्यात आली. पुढे नथुरामने अशीही एक प्रतिज्ञा घेतली, की हिंदुराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी त्याच्या आड येणाऱ्या दुष्ट शक्तीचे पारिपत्य करण्यासाठी आपला जन्म आहे, अशा आशयाची ती प्रतिज्ञा होती. (फ्रीडम ॲट मिडनाईट. पान. २०७) पुढे साडेपाच महिन्यांनी नथुरामने ३० जानेवारी १९४८ ला म. गांधींची हत्या केली. १५ ऑगस्ट १९४७ ला मिळालेल्या स्वातंत्र्याचा एका अर्थाने निषेध करण्यासाठी जमलेल्या गर्दीत आणि छातीपर्यंत आडवा हात धरलेल्यांच्या एका म्होरक्याने ही हत्या केली. उरला प्रश्न काँग्रेसचा. स्वातंत्र्यानंतर ६७ वर्षांनी भारत काँग्रेसमुक्त करण्याची म्हणजे तिला संपवण्याची घोषणा मोदींनी केली. तिचा पुनरुच्चार स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी म्हणजे १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून केला. घराणेशाहीचे नाव घेऊन.

तिसरा प्रसंग १४ ऑगस्ट १९४७ ला म. गांधींच्या सायंकाळच्या सभेने सुरू झाला. ब्रिटिशांच्या राजवटीखाली असलेल्या भारतातील ही शेवटची प्रार्थना सभा होती. गांधींच्या सभेला प्रचंड गर्दी होती आणि दहा हजारांहून अधिक जनसमुदाय जमला होता. उद्याची प्रार्थना स्वतंत्र भारतात होणार होती. आदल्या दिवसाच्या अगोदरपासूनच धार्मिक दंगलींनी नखे वर काढली होती. परस्परांच्या गळ्यात ती घुसवली जात होती. म. गांधी सर्वांकडून अहिंसेचा करार करून घेत होते. उद्या स्वतंत्र भारत जन्माला येणार आहे, याची जाणीव करून देत होते. प्रार्थनेसाठी आलेल्या जनसमुदायासमोर ते म्हणाले, उद्यापासून आपण ब्रिटिशांच्या गुलामीतून मुक्त होणार आहोत आणि मध्यरात्रीपासून देश दुभंगला जाणार आहे. उद्या जसा आनंद तसे दुःखही असेल (भारत-पाक फाळणीमुळे). स्वातंत्र्यानंतर आपल्या

सर्वांच्या शिरावर ओझेही पडणार आहे. जर कलकत्त्याचा बंधुभाव शाबीत राहिला, तर भारत मोठ्या संकटातून वाचेल. जर हिंसाचाराने देश वेढून टाकला, तर नवजात स्वातंत्र्य कसे टिकून राहणार? उद्याचा स्वातंत्र्य दिन मला व्यक्तिशः आनंद देऊ शकत नाही, हे सांगताना मला खूप दुःख होत आहे. माझ्या अनुयायांनी उद्याचा दिवस उपोषण, प्रार्थना यात खर्च करावा. शक्य तेवढा वेळ सूतकताई करावी. भारताला वाचवण्यासाठी आण भाकावी. (फ्रीडम ॲट मिडनाईट. पान.१८०-१८१)

दिल्ली आनंदाच्या, उत्साहाच्या कळसावर पोहोचली होती. नव्या नवरीप्रमाणे सजवली गेली होती. देशातल्या अनेक शहरांतही असेच वातावरण होते. खेड्यापाड्यांतील लोक गावातील एखाद्या रेडिओसमोर गर्दी करून उभे होते. नव्या भारताचे स्वप्न नेहरू कसे मांडतात याविषयी त्यांना उत्सुकता होती आणि इकडे म. गांधी... त्यांच्या दृष्टीने हा पंधरा ऑगस्ट अतिशय क्लेशदायक ठरत होता. फाळणीवरून उसळलेल्या महा भयानक दंगलीमध्ये हजारो नागरिक कापले जात होते. अनेक ठिकाणी रक्ताचे थारोळे निर्माण झाले होते. म. गांधींनी झोपडीत कोंडून घेतले होते. मध्येच ते आक्रोश करायचे. भेटण्यासाठी आलेल्यांच्या मनगटावर अहिंसेचे कंकण बांधण्याचा प्रयत्न करायचे. जे राष्ट्रपिता होते, ते स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य दिनापासून, दिल्लीतल्या झगमगाटापासून, घोषणांपासून एका अर्थाने अंधार भरलेल्या झोपडीत होते. पुण्यातल्या त्या पाचशे लोकांनी १५ ऑगस्टला मिळालेल्या स्वातंत्र्याला, ते सांगणाऱ्या तिरंग्याला नकार दिला होता. स्वतंत्र झेंडा, स्वतंत्र मार्ग आणि स्वातंत्र्याचे खोटे पांघरूण घालणाऱ्यांचा द्वेष करत निघाले होते. नेहरू नव्या भारताचे विज्ञानवादी, समाजवादी, बंधुतावादी भारताचे स्वप्न रंगवण्यात गुंग होते. नियतीशी कसा करार होतोय, हेही खलवून-खलवून सांगत होते. म. गांधी स्वातंत्र्याच्या पुढे एक महत्त्वाचे पाऊल टाकण्याच्या प्रयत्नात होते. ते स्वप्न होते स्वराज्याचे. स्वातंत्र्य मिळणारच होते आणि त्यात गांधींना फारसा रस नव्हता. त्यांच्या छोट्या डोळ्यात स्वराज्याची मोठी स्वप्ने तरळत होती. या अगोदरच सांगितल्याप्रमाणे ती साडेपाच महिनेच टिकली. जिथून स्वप्नांचा जन्म होतो त्या काळातच गोडसेने गोळ्या घातल्या, ज्याला त्याचे चाहते आज महानायकाच्या भूमिकेत नेण्याचा प्रयत्न करत आहेत. या सर्वांत स्वराज्याचा विसर बहुतेक सगळ्यांना पडला आहे. १५ ऑगस्टचा अर्थ समजून घेण्याची मानसिकता अनेकांकडे नाही. १५ ऑगस्ट केवळ एक राजकीय घटना नव्हती, तर नवा देश, नवा माणूस तयार करण्याचा तो प्रयत्न होता आणि आहे. नव्या राष्ट्राऐवजी आपण हिंदुराष्ट्राच्या घोषणा ऐकत आहोत आणि पुण्यात जमलेल्या त्या समुदायाकडे आपण समाज नेण्याचा प्रयत्न करत आहोत की काय, हे लक्षात घेतले पाहिजे.

## हॅलोसाठी 'वंदे मातरम्' तर 'बाय बाय'साठी कोणते वंदे?

काय झाडी, काय गाडी म्हणत आणि राजकीय बंड करणाऱ्या घटकाबरोबर सत्तेवर आलेल्या महाराष्ट्रातील नव्या सरकारमध्ये आता कडवे हिंदुत्ववादी आणि



प्रतिहिंदुत्ववादी, असे दोन पक्ष आहेत. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे हिंदुत्व सौम्य व्हायला लागले म्हणून त्यांच्या चाळीस सहकाऱ्यांनी बंड केले. वेडात दौडले सात याप्रमाणे वेडात दौडलेले चाळीस आणि आणखी काही यांचे हिंदुत्व उतू जाणाऱ्या दुधाप्रमाणे आहे. भाजपचे हिंदुत्व शांत तापणाऱ्या दुधाप्रमाणे आहे. पुन्हा येईल असे आश्वासन पंधरा कोटींच्या महाराष्ट्राला देणारे देवेंद्र एक पायरी खाली हा होईना; पण आले. या दोघांचे हिंदुत्व विजयी झाले. स्वाभाविकच भाजपला हिंदुत्वाचा विचार वेगवेगळ्या प्रतीकांमध्ये बसवण्याची घाई झाली. सरकार किती काळ टिकेल, याचे उत्तर सरकार स्थापन करणाऱ्यांकडेही नसल्याने जे काही करायचे ते हिंदुत्वाच्या, मातृभूमीच्या नावाने करून घ्या, या भावनेतून आता तोच जुना संस्कृतीचा, मातृभूमीप्रेमाचा पाठ शिकवण्याचा प्रयत्न होतो आहे. मातृभूमीचा पाठ खूप संवेदनशील असतो. एकदा या पाठात लोक शिरले, की लोक भूक, तहान विसरतात. जगण्या-मरण्याचे प्रश्न विसरतात. एकदिलाने वंदे मातरम् म्हणायला विसरतात. संघाला जन-गण-मन ऐवजी वंदे मातरम् हेच मुख्य राष्ट्रगीत हवे होते; पण तसे तेव्हा घडले नाही. आता त्याचे अधिक उदात्तीकरण करून ते हिंदुराष्ट्राशी जोडता येऊ शकते का, याचा प्रयत्न महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी करून पाहिला. फोनवर हॅलो म्हणण्याऐवजी वंदे मातरम् म्हणा, असा त्यांचा आग्रह आहे. फोन हा इंग्रजी शब्द आहे. तो आपल्या संस्कृतीला पूरक नाही आणि शिवाय जेवढ्या वेळेला आपण फोन करू किंवा घेऊ, तेवढ्या वेळेला आपोआपच आपल्याला मातृभूमीवर प्रेम व्यक्त करण्याची म्हणजेच वंदे मातरम् म्हणण्याची शुभ संधी मिळणार आहे. राष्ट्रभक्ती करण्याची संधी मिळणार आहे. अर्थात, कल्पना चांगली असली, तरी अन्यधर्मीयांच्या दृष्टीने ती अडचणीची ठरणार आहे. तिसेक वर्षांपूर्वीही वंदे मातरम् सर्वांनी म्हणजे शाळकरी पोरांनी म्हणणे सक्तीचे करावे, अशी चर्चा दक्षिणेकडे सुरू झाली. ख्रिस्ती धर्मीयांच्या शाळांमध्ये वंदे मातरम् म्हणण्याची सक्ती नव्हती. यावरून खूप वाद झाला. जे वंदे मातरम् म्हणणार नाहीत, ते राष्ट्रभक्त, राष्ट्रप्रेमी नाहीत, असे समीकरण तयार करण्यात आले. कोणीच विचार केला नाही एखाद्याने भक्तिमय जगणे चांगले असते; पण भक्ती हा सक्तीचा विषय नसतो. भक्ती चळवळ भराला आल्याच्या काळातही सक्तीच्या भक्तीची भाषा कोणी करत नव्हते. भक्ती हा परमेश्वराकडे पोहोचण्याचा एक मार्ग असतो आणि सर्वांनी परमेश्वराकडे पोहोचलेच पाहिजे, असा कायदा कोणी करत नाही. दुसरी गोष्ट, रोज दहा वेळा, शंभर वेळा वंदे मातरम् म्हणणारे प्रत्यक्षात राष्ट्रप्रेमी बनतात किंवा असेही नाही. मुनगंटीवारांना काय

साध्य करायचे होते किंवा आहे, हे कळायला मार्ग नाही. नुसतीच हूल उठवली की हिंदुराष्ट्राच्या अजेंड्यातील एक पत्ता बाहेर काढला, हे त्यांनाच ठाऊक.

हिंदुत्वाचा नारा देत सत्तेवर आलेल्या सरकारला असे काही तरी रोज करावे लागणार आहे. कर्नाटकात भाजपच्या सरकारने गावगन्ना असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा फतवा काढला आणि राबवला. गावोगावच्या पुजाऱ्यांना श्रेष्ठ धर्मसेवक असे समजून त्यांना मानधन सुरू केले. महाराष्ट्रातही आता दहीहंडीला खेळाचा दर्जा दिला जाणार आहे. दहीहंडीसुद्धा कृष्णापर्यंत पोहोचण्याचा एक अवघड मार्ग आहे. या प्रकारात जोखीम असते. अनेक गोविंदा ती घेत असतात. किती अवघड कडे पार करून तुझ्या भक्तीच्या शिखरापर्यंत पोहोचतोय, हे भक्तिगीतेच गाऊन सांगत असतात. उद्या आता या भक्ती प्रकाराचाही खेळ होईल. त्याचे आयोजक येतील कदाचित मॅचफिक्सिंगसारखे कटू प्रकारही घडू लागतील. शेवटी दहीहंडी रोज रचायची गोष्ट नसते. कृष्णाच्या नावाने वर्षातून एकदा मोठ्या श्रद्धेने रचायची असते. आता श्रद्धेचे द्वेषात रूपांतर होईल. मुनगंटीवार यांचा हॅलोला आक्षेप आहे; पण रोज त्यांच्या ओठावर येणाऱ्या शेकडो इंग्रजी शब्दांना नाही. फोन संपवताना बाय बाय म्हणतात. आता त्याऐवजी काय म्हणायचे? फोन इंग्रजांनी केला हे खरे आहे; पण परकीयांनी तयार केलेल्या वस्तू, औषधे वापरूच नका अशी टोकाची भूमिका कुणालाच परवडणार नाही. जो निर्माण करतो, तोच आपल्या निर्मितीला नाव देत असतो. हॅलो, बाय बाय, मोबाइल, टेबल, हे सगळे त्यातच आहे. ज्यांनी हॅलो शब्द जन्माला घातला, त्यांनी हॅलोऐवजी आपल्याला देवाचे, धर्माचे नाव घ्या, असे का सांगितले नाही. त्यांना ठाऊक आहे, की कोणतीही गोष्ट धर्मात मिसळल्यास धर्माचेच अवमूल्यन होण्याची शक्यता असते. आता हे मुनगंटीवारांना कोण सांगणार? मातृभूमीला वंदन करण्याचा एवढा साधा-सरळ आणि कमी महत्त्वाचाच मार्ग त्यांनी का निवडावा, हेही त्यांनाच ठाऊक. आपल्याला चिन्हांकित, प्रतीकात्मक, वन डे मॅचसारखा झटपट मार्ग हवा आहे, की देश, प्रेम, मातृवंदन याविषयी गांभीर्य निर्माण करणारा मार्ग हवा आहे?

## सरस्वतीच्या मंदिरातच जातिवादातून विद्यार्थ्याचा बळी

राजस्थानात कोणतेही सरकार सत्तेवर आले तरी तेथील मातीत रुजलेला प्रतिगामी, जातिवाद आणि धर्मवादाचा घटक काही कमी होऊ शकत नाही, हे पुन्हा एकदा राजस्थानने सिद्ध केले आहे. रूपकुंवर नावाची सती याच राज्यात आणि तीही आधुनिक काळात, सती प्रतिबंधक कायदा मंजूर झाल्यानंतर जवळपास शंभर वर्षांनी जन्माला आली होती. याच राज्यात गाईवरून खूप दंगली झाल्या. याच राज्यात सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या दलितांवर, वरातीत घोड्यावर बसणाऱ्या दलितांवर अन्याय-अत्याचार झाले आहेत. भवरीबाईवर अमानुष बलात्काराचे प्रकरण येथे घडले. वीरांची, लढवय्यांची भूमी असलेल्या या प्रदेशात सामाजिक विषमता इतकी का चिकटून बसली आहे, हे संशोधक शोधतही असतील; पण दरम्यानच्या



काळात अन्याय-अत्याचाराच्या घटना काही थांबत नाहीत. अशीच एक घटना जी मानवतेला, मनावी हक्कांना, माणुसकीला काळिमा फासणारी आहे, ती राजस्थानात घडली.

ज्या शाळेचे नाव सरस्वती आहे, त्याठिकाणी ही घटना घडली. या शाळेत तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या इंद्रकुमार या अस्पृश्य मुलाने वीस जुलैला तहान लागली म्हणून शाळेत ठेवलेल्या भांड्यातील पाणी प्याले. हे भांडे शाळेचा एक शिक्षक आणि याच खाजगी शाळेचा मालक असलेल्या छैलसिंग याच्यासाठी राखीव होते. अजाणतेपणातून इंद्रकुमारच्या हातून ही गोष्ट घडली. सवर्णांचे भांडे स्पर्श केल्याबद्दल त्याला बेदम मारण्यात आले. वीस दिवसांच्या उपचारानंतर म्हणजे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या फक्त दोन दिवस अगोदर इंद्रकुमार मरण पावला. आपल्याला न्याय मिळावा म्हणून आई-वडील आणि समाजाने या चिमुकल्याचा मृतदेह घेऊन आंदोलन केले. आंदोलक भडकू नये म्हणून सरकारने सायला तालुक्यात असलेल्या सुराणा गावाला पोलिसांचा वेढा टाकला. इंटरनेट सेवा बंद केली. खरंच इंद्रकुमारने भांड्याला स्पर्श केल्याने मारहाण झाली का, याचा शोध पोलीस घेत आहेत. उद्या संशोधनाच्या फायली तयार होतील आणि त्यांच्या ढिगाऱ्याखाली कारण हरवलं असे जाहीर केले जाईल. स्वातंत्र्यानंतर आणि त्याही अगोदर जातीला रोखण्यासाठी ती संपवण्यासाठी इतके कायदे झाले; पण व्यवस्था नमायला किंवा या कायद्यांना गिनायला तयार नाही. कर्नाटकात गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये २१ तारखेला अशीच घटना घडली. दोन वर्षांचा पोरगा नजरचुकीने मंदिरात गेला म्हणून मंदिर बाटले, अशी तक्रार सवर्णांनी केली. आता मुलगा दोन वर्षांचा. ना त्याला मंदिर ठाऊक, ना जात, ना धर्म आणि ना देव! कोपाल तालुक्यातील मियापूर गावातील सवर्ण ही गोष्ट समजून घ्यायला तयार नव्हते. त्यांनी मुलाच्या वडिलाला मारहाण तर केलीच, शिवाय मंदिराचे शुद्धीकरण करण्यासाठी तीस-चाळीस हजार रुपये दंड भरण्याची शिक्षा सुनावली. गरीब वडील इतकी रक्कम कोठून आणणार आणि कशासाठी? विशेष म्हणजे, अस्पृश्यांच्या पैशातून मंदिर कसे शुद्ध होईल? अस्पृश्य पोरामुळे मंदिर बाटते, तर त्यांच्या पैशांमुळेही बाटायलाच हवे ना! व्यवस्था असा प्रश्न निर्माण करत नाही. शूद्र जातीत जन्माला येणेच हा काहींचा गुन्हा ठरतो. कर्नाटकात आणि केंद्रात भाजपची सत्ता आहे. केंद्रातले कारभारी गेल्या आठ-नऊ वर्षांत घडलेल्या अशा सर्व गोष्टींचा लाल किल्ल्यावरच्या भाषणात उल्लेख करतील असे वाटले होते; पण कसचे काय... ●●●

**– पंक्चरवाला**

# अभिनंदन ! तुम्ही केस जिंकली...

पासंगालाही न पुरनारं अवसान
घेऊन
दर सुनावनीवक्ती
न्यायाच्या मंदिराची चढली आशाळभूत
नजरेनं पत्थरदिल पायरी
जिच्यावर पहिलीबार गेलो तवा टेकीलं होतं
मस्तक

दिवसायवर दिवस गेले
तारखायवर तारखा
कितीक आभाळायनी बदलली पानं

वकिलाची फी
जानं येनं
कागदायची तजवीज
साक्षीदारायची खुशामत
यांनी दिली नाई कसलीच सूट

सोबत नेलेली फरकुटातली भाकर
तिनंच काय तो केला पोटाचा खोळंबा शांत
कोर्टाभाईरल्या झाडाखाली

आन् एके दिशी



झाली सुनावनी
परकल्पात
गेलेल्या रानाची नुकसानभरपाई म्हणून
आले दीडदमडीचे धा हजार
जे कव्हाच बुडाले होते
फी आन् उलट्या खरचायच्या डव्हात

कोर्टाभाईर भेटताच
हातात ठेवत तो चेक
वकील तोऱ्यात बोलला
अभिनंदन ! तुम्ही केस जिंकली...

**– अमोल विनायकराव देशमुख, परभणी**

# बेटा...

बेटा...
उद्याचा सूर्य तुला बघता यावा
म्हणून मी पेटवतोय आज
माझ्यातला सूर्य नित्यनियमानं
तू बंडाची भाषा विसरू नकोस हं
उद्या तुलाच सांभाळायचीय ही धुरा
हा क्रांतीचा सूर्य पाठीवर घेऊन
तुलाच चालायचंय
या मळकटलेल्या व्यवस्थेवरून
अहिंसेचं बोट धरून...

तेव्हा,
तू करून घे इंस्टॉल
करप्ट न होणारं
समतेचं सॉफ्टवेअर
तुझ्या हार्डडिस्कमध्ये
या कीबोर्डवरची बटनं
हाताळायचीत पुढं तुलाच...

बेटा...
माझ्यावर फारसा
राहू नको तू अवलंबून
मी उद्या असेन नसेन
पण
बुद्ध दाखवीत राहील
तुला कायमच मार्ग
अजरामर आहे
बाबासाहेबांचं दिशादर्शक बोट
अत्त दीप भवचा मंत्र मात्र
आयुष्यभर जपून ठेव.

**– बुद्धभूषण साळवे, नाशिक**

# ...पण उरायचे आहेच पुरून

सारेच पाय
मातीचेच आहेत
लोखंडाचे
नाहीच कोणी

समजू नका
कृपा करून
वाचवणारा एकच
असेल कोणी

टिकवायचा आहे त्यासाठी
साऱ्यांचा साऱ्यांवरचा विश्वास
टिकवायचा आहे
प्रत्येकाचा श्वास न् श्वास

टिकल्यावर पुन:
बघायचेही आहेच की
घेतला जाणार नाही
स्वातंत्र्याचा आपल्या घास

सारेच धर्म, सारेच देव
त्यांच्या प्रार्थनांची देव-घेव
विज्ञानाचे धरून बोट
सध्यातरी दूरच राखले आहे

नकाशावर जशा
आखल्या आहेत तशा
उरलेल्याच नाहीत
सीमा आता ढगाला

मात्र कठीण जाणार आहे पुढे
असेच टिकणे, टिकवणे
शिकणे, शिकवणे नव्याने
नव्या उरल्यासुरल्या जगाला

तरीही झाल्यावर
सारी पडझड
इथली जाळून
पुरून

दुरून दुरून
का होईना
पण उरायचे
आहेच पुरून

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

